कृषीवल

१९३७-२०२६ वर्ष ९०

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | रविवार | दि. २५ ऑक्टोबर २०२६ | अंक १३९ | पृष्ठे १० | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

बोरघाटात रिक्षाचा अपघात



खोपोली : जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरील बोरघाटात शिंग्रोबा मंदिराच्या समोरील खिंडीत रिक्षाचा अपघात होऊन तिघेजण जखमी झाल्याची घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, रिक्षा ही लोणावळा येथून मोहोपाडा येथे जात असताना बोरघाटातील खिंडीत हा अपघात झाला. या अपघातात रिक्षाचे प्रचंड नुकसान झाले असून, रिक्षातील तिघेजण जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने खोपोली नगरपालिका रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले.

'गलथान कारभार ज्ञानेश कुमारांनाच शोभतो'

मुंबई : उत्तर प्रदेशातूनही मतदारयादीचा घोळ समोर आला आहे. 'मूर्ख' व 'बी.कॉम' अशी चुकीची नावे मतदार यादीत पाहायला मिळत आहे. या प्रकारानंतर विरोधकांनी एकच संताप व्यक्त केला असून, रोहित पवार यांनीही निवडणूक आयोगाच्या कारभाराचे वाभाडे काढले आहेत. ''एवढा गलथान कारभार ज्ञानेश कुमार यांनाच शोभतो'', अशा शब्दात रोहित पवार यांनी निशाणा साधला आहे. त्यांनी, सोशल मिडीयावर पोस्ट करत म्हटले की, उत्तरप्रदेशमधील इलाहाबाद-झासी पदवीधर मतदारसंघ निवडणुकीत समोर आलेला निवडणूक आयोगाचा धक्कादायक अजबगजब कारभार. मतदाराचे नांव 'राम ने यादव को मारा,' तर वडिलांचे नांव •➤पान २ वर

32,480 झाडांची कत्तल

टोरंटसाठी राखीव, संवेदनशील क्षेत्रात जंगलतोड

दररोज ५०० झाडांचा बळी; स्थानिकांमधून संताप व्यक्त

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील पाली तर्फे कोतवाल खलाटीमध्ये सायडोंगर येथे टोरंट हायड्रॉलिक वीज प्रकल्प उभारला जाणार आहे. या प्रकल्पासाठी सरकारने ६४० एकर वन जमीन दिली असून, त्या जमिनीवरील हजारो झाडे तोडली जाणार आहेत. ही झाडे तोडण्यासाठी पाच महिन्यांचा कालावधी लागणार असून, पालघर जिल्ह्यातील वाडा आणि मोखाडा तालुक्यातील लाकूडतोड्यांकडून ही झाडे तोडली जात आहेत. विशेष म्हणजे वन विभागाचा संवेदनशील आणि संरक्षित वन क्षेत्र असलेल्या भागातच वन विभागाने झाडे तोडण्याची कारवाई सुरू केली आहे. त्यामुळे या सर्व प्रकाराबद्दल स्थानिकांसह जिल्ह्याभरातून संताप व्यक्त होत आहे. •➤पान २ वर





पंतप्रधान मोदींच्या स्वागताची तयारी

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे हायड्रॉलिक प्रकल्पाच्या भूमिपूजन सोहळ्यासाठी येणार असल्याची चर्चा आहे. प्रशासनाकडून त्यांच्या संभाव्य दौऱ्याची तयारी सुरू असून, पुलाची वाडी येथे भूमिपूजन सोहळा होण्याची शक्यता आहे. तसेच, त्यांच्या व्हीव्हीआयपी सुरक्षेचे दृष्टीने कार्यक्रम स्थळापासून ५ कि.मी. अंतरावरील कडाव येथे हेलिपॅड उभारण्याच्या तयारीला वेग आला आहे.

मुंबईत आज कँडल मार्च

जातीय भेदभावाविरोधात आवाज उठविणार

। मुंबई । प्रतिनिधी ।

आयआयटीमध्ये शिक्षण घेणाऱ्या साहिल वाकोडे यांच्या मृत्यू प्रकरणात न्याय मिळावा आणि शैक्षणिक संस्थांमधील कथित जातीय भेदभावाच्या प्रश्नाची निष्पक्ष चौकशी व्हावी, या मागणीसाठी प्रोग्रेसिव्ह स्टुडंट्स युनियनच्यावतीने रविवारी (दि.२५) मुंबईत कँडल मार्चचे आयोजन करण्यात आले आहे. हा मार्च सायंकाळी ५.३० वाजता दादर येथील चैत्यभूमी परिसरातून काढण्यात येणार आहे. विद्यार्थी, सामाजिककार्यकर्ते, नागरिक आणि न्यायाच्या बाजूने उभे राहणाऱ्या सर्वांनी या मार्चमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन संघटनेच्यावतीने करण्यात आले आहे.



साहिल वाकोडे यांच्या मृत्यूच्या पार्श्वभूमीवर शैक्षणिक संस्थांमधील कथित जातीय भेदभाव, विद्यार्थ्यांची प्रतिष्ठा आणि संस्थात्मक उत्तरदायित्व याबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. या प्रकरणात न्याय मिळावा, संबंधित घटनांची निष्पक्ष चौकशी व्हावी आणि कायद्यानुसार जबाबदारी निश्चित केली जावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. या प्रकरणात प्राध्यापक सत्यनारायण दूला आणि आयआयटी मुंबईचे संचालक केदार यांच्यावर कारवाई व अटकेबाबतही आंदोलनकर्त्यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. या संदर्भातील आरोप आणि मागण्यांची स्वतंत्रपणे अधिकृत पडताळणी होणे आवश्यक आहे. शैक्षणिक संस्था या विद्यार्थ्यांना समान संधी, सुरक्षित वातावरण आणि सन्मान देणाऱ्या असाव्यात. कोणत्याही विद्यार्थ्याला जातीय भेदभावाचा सामना करावा लागू नये, तसेच अशा तक्रारींची निष्पक्ष चौकशी होऊन दोषींवर कायद्यानुसार कारवाई व्हावी, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली आहे.

वे|घ|क

२७, २८ ऑक्टोबरला पावसाचा अंदाज

मुंबई : महाराष्ट्रात सध्या दुष्काळ आहे. रबी हंगामातील पिकांसाठी एखादा चांगला पाऊस पडावा, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे. पुढच्या काही दिवसांत महाराष्ट्रात पाऊस होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. सध्या बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार होत आहे. या क्षेत्रात पुढच्या दिवसात वाढ होणार आहे. त्यामुळेच महाराष्ट्रात काही ठिकाणी पाऊस होऊ शकतो. कमी दाबाचे हे क्षेत्र वाढल्यास याचे चक्रीवादळातही रुपांतर होऊ शकते. याच चक्रीवादळाच्या वाटचालीवर महाराष्ट्रातील पावसाचे भवितव्य ठरणार आहे. सध्याच्या ताज्या अंदाजानुसार येत्या २७ ते २९ ऑक्टोबरच्या काळात विदर्भ तसेच मराठवाड्यात पाऊस बरसू शकतो. पावसाचे हे प्रमाण नेमके किती असेल, हे अद्याप स्पष्टपणे सांगता येणार नाही.

बनावट युरिया विक्रीप्रकरणी गुन्हा

पनवेल : तालुक्यातील गव्हाण फाटा परिसरात टाटा मोटर्सच्या डिझेल एक्झॉस्ट फ्लुइड उत्पादनाच्या विक्रीसंदर्भात कॉपीराइट कायद्यांतर्गत दोघांविरुद्ध पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी मारुती सुर्वे (५४) आणि कैलास भोपे (४४) यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गव्हाण फाटा येथील स्वराज ऑटोमोबाईल आणि साईप्रसाद स्पेअर पार्ट्स या ठिकाणांशी संबंधित प्रकरणात टाटा मोटर्सच्या डिझेल एक्झॉस्ट फ्लुइड उत्पादनाच्या एकूण नऊ प्लास्टिक बकेट जप्त करण्यात आल्या. या मुद्देमालाची एकूण किंमत ३२ हजार ८९५ रुपये असल्याचे नोंदीत नमूद आहे.

जेएनपीटीतुन पाकिस्तानी बिया जप्त

कोडधारकाच्या मुलासह पुतण्याला अटक

। चिरनेर । प्रतिनिधी ।

महसूल गुप्तचर संचालनालयाने 'ऑपरेशन डीप मॅनिफेस्ट' अंतर्गत, पाकिस्तानमधून आयात होणाऱ्या किंवा पाकिस्तानात तयार होणाऱ्या मालावरील भारताच्या बंदीला टाळण्याचा आणखी एक प्रयत्न उधळून लावला आहे. दि.११ सप्टेंबर ते २२ ऑक्टोबर दरम्यान केलेल्या कारवाईत, दुबईमार्गे आणलेल्या आणि मूळच्या यूएई असल्याचे खोटे घोषित केलेल्या, पाकिस्तान-निर्मित सुमारे २५,००० किलो टरबूज बियाण्यांचा साठा जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे.

प्राथमिक तपासात मालाचे खरे मूळ लपवण्यासाठी हेतुपुरस्सर



केलेली माल हस्तांतरणाची व्यवस्था उघड झाली. या बिया सुरुवातीला पाकिस्तानमधील कराची बंदरातून दुबईमधील जेबेल अली बंदरापर्यंत एका जहाजावरील कंटेनरच्या एका संचातून पाठवण्यात आल्या होत्या. तेथे मालाची अदलाबदल झाल्यानंतर, तो माल दुसऱ्या कंटेनरमध्ये भरून भारताकडे पुढील पाठवणीसाठी एका वेगळ्या जहाजावर चढवण्यात आला. कंटेनर आणि जहाजांमधील हा बदल, तसेच मूळ देशाबद्दलची चुकीची घोषणा आणि बनावट आयात कागदपत्रे, या सर्वांमागे मालाचे पाकिस्तानी मूळ लपवण्याचा हेतू होता. तपासात महत्त्वपूर्ण कागदोपत्री पुरावे मिळाले, त्यावरून माल पाकिस्तानमधून दुबईमार्गे भारतात आल्याचे स्पष्टपणे सिद्ध झाले.

पुढील तपासात, पाकिस्तानमधून येणाऱ्या किंवा निर्यात होणाऱ्या सर्व वस्तूंची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आयात किंवा पारगमन प्रतिबंधित आहे. दुसरे म्हणजे, १ जुलै २०२४ पासून भारतात टरबूज बियांच्या आयातीवर निर्बंध घालण्यात आले आहेत. त्यानुसार, अंदाजे २.०२ कोटी रुपये बाजारमूल्य असलेली मालाची खेप १४ ऑक्टोबर रोजी जप्त करण्यात आली. तसेच, आयातदाराने फेब्रुवारीमध्ये त्याच दुबईस्थित पुरवठादाराकडून २२,००० किलो खरबुजाच्या बियांची एक पूर्वीची खेप आणली होती आणि ती वस्तू यूएई-निर्मित असल्याचे घोषित केले होते. तसेच, ही खेप देखील दुसऱ्या देशात •➤पान २ वर

नवी मुंबई विमानतळ बंद पाडणार

दिबांच्या नावासाठी प्रकल्पग्रस्त आक्रमक

। उरण । प्रतिनिधी ।

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि.बा. पाटील यांचे नाव मिळावे म्हणून प्रकल्पग्रस्त पुन्हा एकदा आक्रमक झाले आहेत. उरणमधील दि.बा.पाटील यांच्या जासई या जन्म गावी शनिवारी (दि.२४) समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली निर्णायक बैठक पार पडली.

या बैठकीमध्ये, पुढील तीन महिन्यांमध्ये गावागावात जाऊन संपर्क करून एक मोठे जनं आंदोलन उभारले जाईल. हे आंदोलन उग्र स्वरूपाचे असून, विमानतळ बंद पाडले जाणार असल्याचे यावेळी आंदोलकांनी सांगितले. तसेच, जोपर्यंत विमानतळ बंद केले जात नाही, तिथे जाणाऱ्या गाड्या



रोखल्या जात नाहीत, तोपर्यंत शासन याची दखल घेणार नाही. अनेक वेळेला शासनाने फसवणूक करून आश्वासनांची कोणतीही पूर्तता केली नसल्याचे भूमिपुत्रांनी सांगितले. त्यामुळे विमानतळ बंद पाडणे हेच उद्दिष्ट असून, तशाप्रकारचे नियोजन पुढील दोन ते तीन महिन्यात करून आंदोलनाची हाक दिली जाईल, अशा इशारा सर्वांनुमतेदेण्यात आला.

यावेळी •➤पान २ वर

इंटरनेटसह सर्व्हर डाऊनमुळे कार्ड असतानाही पुर्ण तिकीटचा भार | महिलांसह ज्येष्ठ प्रवाशांना नाहक त्रास

एसटीच्या स्मार्ट प्रवासाला तांत्रिक खोडा

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

एसटी महामंडळाने कारभार पारदर्शक व्हावा, यासाठी स्मार्ट कार्ड (एनसीएमसी) योजना सुरु केली. मात्र, स्मार्ट कार्ड असतानाही सर्व्हर डाऊनमुळे प्रवाशांना पूर्ण तिकीट काढावे लागत आहे. कार्डमध्ये शिल्लक रक्कम असतानाही इंटरनेट, कार्ड सिंक न होणे अशा कारणांमुळे स्मार्टकार्डचा तांत्रिक खोडा डोकेदुखी बनत आहे. स्मार्ट कार्ड येऊनही प्रवासात काहीही सुधारणा झाल्या नाहीत. त्यामुळे प्रवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागत असल्याचा मुद्दा समोर आला आहे.

एसटी महामंडळाने २०१६ साली प्रवाशांसाठी स्मार्ट कार्ड प्रणाली केली होती. मात्र, दोन वर्षांतच ही योजना फेल ठरली. आता एसटी महामंडळाने महिला व ज्येष्ठ नागरिक प्रवाशांसाठी(एनसीएमसी) स्मार्ट कार्ड देण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. रायगड जिल्ह्यात स्मार्ट कार्ड नोंदणीची प्रक्रीया मार्च महिन्यात सुरु केली. •➤पान २ वर



> प्रवाशांना स्मार्टकार्डद्वारे तिकीटची व्यवस्था व्हावी यासाठी शेवटच्या स्थानकापर्यंत प्रयत्न केले जातात. त्यामध्ये कार्डची समस्या असल्याने हा प्रश्न गंभीर होत आहे. वाहकांना रिचार्ज करण्यापासून सर्व प्रकारचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.
> **– सुनील चौरे, विभाग नियंत्रक, रायगड**

> एसटी महामंडळाने स्मार्ट योजना सुरु करून खऱ्या अर्थाने डिजीटल कामाला गती दिली आहे. या उपक्रमाचे स्वागत केले जात आहे. मात्र, एसटीतील वाहकांकडे देण्यात आलेल्या तिकीट मशीनमधील तांत्रिक बिघाडाचा प्रश्न सतत भेडसावत आहे. त्यामुळे स्मार्ट कार्डद्वारे सवलतीमधून प्रवास करताना प्रचंड त्रास होत आहे. एसटी महामंडळाने हा प्रश्न मार्गी लावे पर्यंत आधारकार्ड सवलतीसाठी ग्राह्य धरणे गरजेचे आहे.
> **– अशोक पवार, ज्येष्ठ नागरिक**



शेकापतर्फे महिलांचा सन्मान

खेळ पैठणीसह महागरब्याचे आयोजन

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

शेतकरी कामगार पक्षाच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील पुरस्कृत शेकाप अलिबाग तालुका महिला आघाडीच्यावतीने तसेच पीएनपी सांस्कृतिक कलाविकास मंडळ, अलिबाग आणि चेंढरे मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आशा सेविकांचा स्नेहमेळावा आणि महागरबा या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा अलिबागमधील पीएनपी नाट्यगृहामध्ये रविवारी (दि.२५) दुपारी ३ वाजल्यापासून रंगणार आहे. कोजागिरी निमित्त कार्यक्रमांचे खास आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, शेकाप महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे आणि अलिबागच्या नगराध्यक्षा अक्षया नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने शेकाप अलिबाग तालुका महिला आघाडीच्यावतीने दूपारी ३ वाजल्यापासून 'आशा सखी' स्नेह मेळावा होणार आहे. यावेळी 'खेळ पैठणीचा' हा खेळ रंगणार असून, 'पैठणी क्वीन' ही स्पर्धा देखील होणार आहे. या खेळाबरोबरच मनोरंजन आणि महिलांचा पैठणी देऊन सन्मान केला जाणार आहे. तसेच, पीएनपी सांस्कृतिक कलाविकास मंडळ, अलिबाग •➤पान २ वर





अलिबागच्या विकासाचा 'फिल्ड रिपोर्ट'

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग शहरातील नागरिक तसेच पर्यटकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सुरू असलेल्या विविध विकासकामांना गती देण्यात येत आहे. अलिबाग नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष तथा वीज व बांधकाम सभापती प्रशांत नाईक यांनी शहरातील विविध ठिकाणी सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी करून कामांच्या प्रगतीचा आढावा घेतला.



- **प्रशांत नाईक यांच्याकडून विविध कामांची पाहणी**
- **नागरिकांसह पर्यटकांच्या सुविधांना प्राधान्य**

अलिबाग शहराच्या पर्यटन विकासाच्या दृष्टीने समुद्रकिनारा हा महत्त्वाचा घटक असून, येथे येणाऱ्या पर्यटकांना आकर्षक आणि सुरक्षित सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे. तसेच, शहरातील पर्यटन, सार्वजनिक सुविधा, बाजारपेठा आणि मूलभूत सोयी-सुविधांचा समतोल विकास साधत अलिबागला अधिक सुंदर, सुविधायुक्त आणि पर्यटकाभिमुख शहर बनविण्याच्या दिशेने नगरपरिषदेकडून प्रयत्न सुरू आहेत. यावेळी प्रशांत नाईक यांनी अलिबाग समुद्रकिनारी सुरू असलेल्या खुल्या रंगमंचाच्या कामाची तसेच समुद्रकिनारी उभारण्यात आलेल्या रणगाड्यांच्या रंगकामाची पाहणी केली. तसेच, श्रीबाग स्मशानभूमी परिसरात काळी-पिवळी टॅक्सी उभी करण्यासाठी सुरू असलेल्या कामाचीही पाहणी करण्यात आली. म्हाडा कॉलनी येथील 'आपला म्हाडा' नामकरणाच्या कामाची माहिती घेऊन संबंधित कामे दर्जेदार आणि नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना देखील त्यांच्याकडून देण्यात आल्या.

दरम्यान, प्रशांत नाईक आणि अलिबाग नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे यांनी अलिबाग मासळी बाजार तसेच भाजी मंडईच्या इमारतीच्या सुरू असलेल्या कामाची पाहणी केली. या कामांच्या प्रगतीबाबत संबंधितांकडून माहिती घेत नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन सुविधा विकसित करण्यावर भर देण्यात आला.

अलिबाग नगरपरिषद विकासकामांच्या बाबतीत अग्रेसर असून, शहरातील नागरिकांसोबतच अलिबागला भेट देणाऱ्या पर्यटकांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. विकासकामांमध्ये कोणतीही कमतरता राहू नये आणि कामे वेळेत व दर्जेदार पद्धतीने पूर्ण व्हावीत, यासाठी आवश्यक ती तत्परता दाखवली जात आहे, असे प्रशांत नाईक यांनी यावेळी सांगितले.



वडके महाविद्यालयात पदाधिकाऱ्यांचा सत्कार

। चोंढी । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील चोंढी येथील श्री. स.म. वडके महाविद्यालयात शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या आदर्श शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा तसेच संस्थेच्या नवनिर्वाचित पदाधिकारी व संचालक मंडळातील सदस्यांचा सत्कार सोहळा पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे नवनिर्वाचित अध्यक्ष राजेंद्र ठाकूर यांनी भूषविले होते.

या कार्यक्रमात संस्थेच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. त्यामध्ये संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र ठाकूर, उपाध्यक्ष सुनील थळे, कायम सदस्य रवींद्र ठाकूर, कार्यवाह प्रमोद पाटील, खजिनदार राजेंद्र शिंदे, सहकार्यवाह किरण ठाकूर, मुख्याध्यापिका सुवेगा पाटील यांच्यासह संस्थेचे संचालक मंडळातील सदस्य ॲड. प्रवीण ठाकूर, जगन्नाथ पेढवी, राजेंद्र नार्वेकर, मनोहर म्हात्रे, प्रमोद पाटील, संजय शिंदे, संदेश पाटील, जनार्दन सुरेकर, शाम काठे, राजेंद्र पाटील, शुभम ठाकूर, रवींद्र बेर्डे आणि नितीन वेलणकर यांचाही सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर संस्थेच्या शिक्षक-सेवक प्रतिनिधी लीना सचिन पाटील यांच्यासह शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचाही विशेष गौरव करण्यात आला. त्यामध्ये शिक्षिका संजना म्हात्रे, अनिता थळे, स्नेहल वार्डे, पेडणेकर, सचिन गोंधळी, कामिनी राऊळ आणि किरण मोकल यांचा समावेश होता.

या सर्व सन्मानार्थींना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि वृक्षारोपणाचा संदेश देणारे रोपटे प्रदान करून गौरविण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका सुवेगा पाटील, मुख्याध्यापक संदीप पाटील, मुख्याध्यापिका घरत, मुख्याध्यापिका पावशे, उपमुख्याध्यापिका नम्रता म्हात्रे, पर्यवेक्षिका स्वागता पाटील, सत्रप्रमुख नाशिक पेढवी, सचिन बालघरे, सत्रप्रमुखा राठोड, सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष विकास पवार, उपाध्यक्षा मनिषा नांदगावकर, तसेच सर्व विभागातील शिक्षकवृंद उपस्थित होते.

महिलांच्या कलागुणांना मिळाले व्यासपीठ

। मुंबई । प्रतिनिधी ।

दिवाळीच्या सणानिमित्त मुंबईतील चुनाभट्टी परिसरात दीपोत्सवाचे उत्साहपूर्ण वातावरण पाहायला मिळत आहे. आशापुरा प्रबोधन संस्था व पावनभूमी प्रतिष्ठान यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'दीपोत्सव शुभारंभ'च्याकार्यक्रमात महिला आणि लहान मुलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या उपक्रमातून दिवाळीचा आनंद साजरा करण्याबरोबरच महिलांच्या कलागुणांना आणि त्यांच्या स्वावलंबनाला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

या उपक्रमातून 'चला करूया दिवाळीची खरेदी, महिला उद्योजकांना सहकार्य करूया' हा संदेश देण्यात आला. महिला उद्योजकांनी तयार केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, स्थानिक व्यवसायांना चालना मिळावी आणि नागरिकांनी स्थानिक विक्रेत्यांकडून खरेदी करावी, हा या आयोजनामागील मुख्य उद्देश आहे. कार्यक्रमस्थळी दिवाळीच्या सजावटीने आकर्षक वातावरण निर्माण करण्यात आले आहे. दि.२४ते २७ ऑक्टोबरपर्यंत हा दीपोत्सव चालणार आहे. मनोरंजनासोबत विविध स्पर्धांचे सुद्धा आयोजन करण्यात आले आहे. लहान मुलांचा सहभाग आणि महिलांचा उत्साह यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. दिवाळीच्या निमित्ताने सामाजिक एकोपा वाढविण्यासोबतच महिला सक्षमीकरणाचा संदेशही या उपक्रमातून देण्यात आला आहे.

पनवेलची तहान भागवण्यासाठी अरविंद म्हात्रे मैदानात

। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी ।

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील वाढत्या पाणीटंचाईवर पर्यायी जलस्रोतांचा आधार घेण्याची गरज असताना, विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांनी जांभिवली धरणाकडे लक्ष वेधले आहे. या धरणातून पनवेलकरांना दररोज सुमारे १५ एमएलडी पाणी उपलब्ध होऊ शकते, असा अंदाज व्यक्त करत त्यांनी बुधवारी (दि.२१) धरणाची पाहणी केली. धरणातील पाणी पनवेलकरांसाठी उपलब्ध करून देण्यासाठी दोन्ही आमदारांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने आगामी काळात पाणीटंचाईची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत पनवेलकरांना पाण्यासाठी वणवण करावी लागू नये, यासाठी उपलब्ध पर्यायी जलस्रोतांचा



- **पर्यायी जलस्रोताच्या पार्श्वभूमीवर धरणाची पाहणी**

वेळीच विचार करण्याची गरज आहे. याच पार्श्वभूमीवर म्हात्रे यांनी जांभिवली धरणाची पाहणी करून या स्रोताच्या वापराची शक्यता तपासण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्यासोबत हरेश केणी, प्रकाश म्हात्रे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

जांभिवली धरण सुमारे १४८ एकर क्षेत्रात पसरले असून, या धरणातून दररोज सुमारे १५ एमएलडी पाणी मिळण्याची शक्यता असल्याने पनवेलच्या पाणीपुरवठ्याला पर्यायी आधार मिळू शकतो. मात्र, या पाण्याचा प्रत्यक्ष वापर करण्यासाठी उपलब्ध साठा, पाण्याची गुणवत्ता, तांत्रिक व्यवहार्यता आणि पाणी वाहून आणण्याची व्यवस्था यांचा अभ्यास करणे आवश्यक ठरणार आहे. धरणातील पाणी पनवेलकरांना उपलब्ध करून देता येईल का, याबाबत महानगरपालिका प्रशासनाशी पत्रव्यवहार करण्यात येणार असल्याचे म्हात्रे यांनी सांगितले. प्रशासनही या प्रस्तावाबाबत सकारात्मक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यापूर्वी म्हात्रे यांनी तीन जलस्रोतांची पाहणी केली असून, मागील आठवड्यात खैरवाडी परिसरातील मोरबे धरणाचीही पाहणी केली होती.

पाणीटंचाईवर केवळ तात्पुरत्या उपायांऐवजी पर्यायी जलस्रोतांचा नियोजनबद्ध वापर करण्याची गरज आहे. जांभिवली धरणातून पाणी उपलब्ध होण्याची शक्यता प्रत्यक्षात आणण्यासाठी आता महापालिका प्रशासन, संबंधित यंत्रणा आणि लोकप्रतिनिधी यांच्यात समन्वय होणे महत्त्वाचे ठरणार आहे. पाहणी आणि प्रस्तावाच्या पुढील टप्प्यातून पनवेलकरांना प्रत्यक्ष किती दिलासा मिळतो, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

शिवतीर्थवरील साहित्य गायब?

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा परिषदेच्या जुन्या इशिवतीर्थफ इमारतीचे पाडकाम झाले; मात्र, या इमारतीत वर्षानुवर्षे वापरात असलेल्या शासकीय साहित्याचे पुढे काय झाले, हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. शेकडो एसी, जनरेटर, पंखे, लोखंडी कपाटे, लाकडी खुर्च्या आणि अवजड फर्निचरची नोंद कुठे आहे? पुनर्वापरयोग्य साहित्याची विल्हेवाट कशी लावली? त्यातून मिळालेली रक्कम सरकारी तिजोरीत जमा झाली का? या प्रश्नांची उत्तरे अद्याप स्पष्ट नसल्याने पाडकामाच्या व्यवहारावर संशयाचे सावट निर्माण झाले आहे.

सुमारे चार मजली आणि ४० हजार चौरस फुटांच्या या इमारतीच्या पाडकामातून मोठ्या प्रमाणावर काँक्रीट, लोखंड आणि इतर साहित्य निघाले. मात्र, केवळ मलब्याचा प्रश्न नाही; इमारतीतील मौल्यवान शासकीय साहित्याचा अधिकृत हिशोब हा या प्रकरणातील महत्त्वाचा मुद्दा आहे. साहित्याची यादी, डेडस्टॉक नोंदवही, हस्तांतरणाच्या नोंदी, लिलाव प्रक्रिया आणि जमा झालेल्या महसुलाची माहिती समोर आल्याशिवाय या व्यवहाराचे संपूर्ण चित्र स्पष्ट होणार नाही. या प्रकरणाची दखल घेत जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने पाडकामाचे काम करणाऱ्या टी अँन्ड टी विक्रम इंन्फ्रा जीव्ही या कंपनीला नोटीस बजावल्याची माहिती समोर आली आहे. कार्यकारी अभियंता विनायक तेलंग यांच्या नोटिशीत पाडकामातून मिळालेल्या लोखंडी साहित्य, स्टील, लाकूड, दरवाजे, खिडक्या आणि इतर पुनर्वापरयोग्य साहित्याची विल्हेवाट कशी लावली, याचा सविस्तर अहवाल मागवण्यात आल्याचे समजते.

- **लोखंड, दरवाजे, खिडक्या आणि जुन्या साहित्याचा तपशील द्या**
- **बांधकाम विभागाची तातडीची नोटीस**

एसी, जनरेटर, फर्निचरची नोंद कुठे?

जुन्या इमारतीतील एसी, जनरेटर, पंखे आणि फर्निचरची पाडकामापूर्वी यादी तयार केली होती का? त्यांची किंमत आणि स्थिती निश्चित करण्यात आली होती का? वापरण्यायोग्य साहित्य सुरक्षित ठिकाणी हलवले की त्याचा लिलाव करण्यात आला? लिलाव झाला असल्यास त्याची जाहिरात, बोलीदारांची माहिती आणि जमा झालेल्या रकमेच्या पावत्या कुठे आहेत? तसेच, पाडकामातून मिळालेल्या लोखंड आणि स्टीलचे वजन किती होते? त्याची विक्री किंवा विल्हेवाट कोणत्या अटींनुसार झाली? कंत्राटदाराच्या करारात मलबा आणि भंगार साहित्याबाबत कोणत्या अटी होत्या? या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर प्रशासनाने द्यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी केली आहे.

कोट्यवधींचा संशय

पाडकामातून सुमारे १५० टन स्टील आणि ३,५०० टन मलबा मिळाल्याचे आकडे चर्चेत आहेत; मात्र, या प्रमाणाची अधिकृत कागदपत्रांवरून पुष्टी होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, एसी, जनरेटर आणि फर्निचरच्या कथित मूल्याबाबतही अधिकृत मूल्यांकनाशिवाय कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याची चर्चा अलिबागमध्ये सुरु आहे.

भारत सरकार, रेल्वे मंत्रालय
रेल्वे भरती बोर्ड

केंद्रीकृत रोजगार अधिसूचना (सीईएन) क्र. 08/2026

सूचक सूचना

स्टेशन मास्टर पदासाठी भरती

स्टेशन मास्टर पदासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सर्व बाबतींत पूर्ण असलेले अर्ज केवळ ऑनलाइन पद्धतीनेच सादर करावेत.अर्ज करण्यासाठी संकेतस्थळ: **https://www.rrbapply.gov.in**

ऑनलाइन अर्ज सुरू होण्याची तारीख : 27.10.2026 (तात्पुरती)
ऑनलाइन अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख : 25.11.2026, रात्री 23:59 वाजेपर्यंत (तात्पुरती)

पदाचे नाव	7 व्या केंद्रीय वेतन आयोगानुसार वेतन स्तर	वैद्यकीय मानक	दिनांक 01.01.2027 रोजी वय	तात्पुरती रिक्त पदे (सर्व RRB)
स्टेशन मास्टर	वेतन स्तर – 6	सविस्तर सीईएननुसार	सविस्तर सीईएननुसार	1250 (अंदाजे)

1. उमेदवारांना सल्ला देण्यात येतो की, ऑनलाइन अर्ज भरताना त्यांनी आधारच्या माध्यमातून आपल्या प्राथमिक तपशीलांची पडताळणी करून घ्यावी. आधारद्वारे पडताळणी न झालेल्या अर्जांची भरती प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर सखोल छाननी केली जात असल्याने होणारी गैरसोय व विलंब टाळण्यासाठी ही पडताळणी आवश्यक आहे.
2. आधारद्वारे यशस्वी पडताळणी सुनिश्चित करण्यासाठी, आधारमध्ये नोंदविलेले नाव व जन्मतारीख इयत्ता 10 वी उत्तीर्ण प्रमाणपत्रावरील संपूर्ण नाव व जन्मतारखेशी 100% जुळतील अशा प्रकारे अद्ययावत करावेत. त्याचप्रमाणे, ऑनलाइन अर्ज भरण्यापूर्वी आधारमधील नवीनतम छायाचित्र आणि अद्ययावत बायोमेट्रिक तपशील (बोटांचे ठसे व आयरिस) अद्ययावत केलेली असावी.
3. ही सूचना केवळ सूचक स्वरूपाची असून, संभाव्य उमेदवारांना आगामी सविस्तर केंद्रीयकृत रोजगार अधिसूचनेबाबत (सीईएन) माहिती देण्यासाठी तसेच अर्ज करण्यासाठी आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रे तयार ठेवता यावीत, या उद्देशाने प्रसिद्ध करण्यात येत आहे. हेदेखील स्पष्ट करण्यात येते की, भरतीसंबंधीचे सर्व नियम, अटी, पात्रता निकष, कार्यपद्धती आणि इतर आवश्यक बाबी या सविस्तर सीईएन क्र. 08/2026 नुसारच लागू राहतील. यामध्ये वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या शुद्धिपत्रकांचाही समावेश असेल.सदर सविस्तर अधिसूचना सर्व RRB च्या योग्य संकेतस्थळावरच प्रसिद्ध करण्यात येईल: **https://rrb.indianrailways.gov.in** उमेदवार या संकेतस्थळावरून संबंधित RRB च्या स्वतंत्र वेबपेजवर जाऊ शकतात.

क्र.: RRB/All/Advt./CEN/08/2026 **अध्यक्ष**
दिनांक: 25.10.2026 **रेल्वे भरती बोर्ड**

"दलाल, मध्यस्थ आणि नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखविणाऱ्या व्यक्तींपासून सावध राहा." 688

पान १ वरुन

'गलथान कारभार ज्ञानेश कुमारांनाच शोभतो'

'मूर्ख चंद्र यादव' आणि 'बी.कॉम' असे नमुद करण्यात आले आहे. तर अफजल अहमद नाव असलेल्या मतदाराच्या वडिलांचे नाव 'मोहम्मद इक्बाल भीक मांगते है' असे असून, एका मतदाराचे आणि वडिलांचे नांव 'टक्कर मारना' असे नमुद करण्यात आल्याचे म्हटले आहे. त्यामुळे हा गलथान कारभार नाही का? आणि एवढा गलथानपणा केवळ ज्ञानेशकुमार यांनाच शोभतो. एसआयआरमधील घोळ आणि निवडणूक आयोगाच्या गलथान कारभाराबद्दल परवा घेतलेल्या पत्रकार परिषदेत आम्ही जे मुद्दे मांडले त्यावर उत्तरप्रदेशमध्ये समोर आलेल्या घटनांनी शिक्कामोर्तबच झाले. निवडणूक आयोगाचा अघोषित प्रवक्ता असलेल्या भाजपने यावर उत्तर द्यावे, असे रोहित पवार यांनी म्हटले.

३२,४८० झाडांची कत्तल

पाली तर्फे कोतवाल खलाटी येथील सायडोंगर भागात टोरंट हायड्रॉलिक प्रकल्पासाठी वन विभागाने येथील राखीव वन सर्व्हे नंबर २८,२९ मधील ६४० एकर जमीन दिली आहे. या जमिनीवर असलेली ३२,४८० झाडे तोडण्याची परवानगी दिली आहे. ती झाडे तोडण्याचा ठेका पालघर जिल्ह्यातील वाडा आणि मोखाडा या तालुक्यातील झाडे कापणाऱ्यांना देण्यात आला आहे. दसऱ्याच्या मुहूर्तावर सायडोंगर भागातील राखीव वन भागातील संवेदनशील क्षेत्रातील झाडे कापण्यास सुरुवात केली असून, दररोज येथील ५०० च्या आसपास झाडे कापली जात आहे. दरम्यान, या झाडे कापण्याच्या मोहिमेला स्थानिक पातळीवर प्रचंड विरोध करण्यात येत आहे. विशेष म्हणजे जी जमिन वन विभागाने टोरंट प्रकल्पाला दिली आहे ती जमीन संवेदनशील वन क्षेत्र आहे. त्याच भागात जंगलतोड होत असल्याने वन विभागाच्या प्रत्यक्ष आदेशाला बासनात गुंडाळून ठेवण्याचा प्रकार तेथे सायडोंगर भागात सुरू असल्याचे बोलले जात आहे. तसेच, सायडोंगर भागात वन विभागाने 'सायडोंगर परिसर राखीव आणि संवेदनशील वन असल्याचे तसेच कोणत्याही व्यक्तीने प्रवेश करू नये,' असे फलक लावले आहेत. असे असतानाही कर्जतच्या वन विभागाकडून जंगलतोड करण्याची परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे वन विभाग स्थानिकांची फसवणूक करीत असल्याचे कर्जत पर्यावरण बचाव समितीकडून आरोप होत आहे.

झाडे कापणाऱ्यांना पळवून लावले

सायडोंगर जंगलातील ३२ हजार झाडे तोडण्यासाठी तेथे आलेल्या पालघर जिल्ह्यातील वाडा आणि मोखाडा तालुक्यातील लोकांना स्थानिकांमधून तिव्र विरोध करण्यात आला. झाडे तोडण्यास प्रचंड विरोध होत असल्याने ठेकेदार कंपनीने त्यांना पळून लावले. त्यामुळे सध्यातरी सायडोंगर जंगलात कोणीही झाडे तोडणारे दिसत नाहीत.

गुजरातच्या टोरंट पॉवर कंपनीच्या जलविद्युत प्रकल्पासाठी हजारो झाडांची बेसुमार कत्तल राजरोसपणे सुरू आहे. सायडोंगर परिसरातील समृद्ध निसर्ग संपवून, स्थानिकांच्या आणि पर्यावरणप्रेमींच्या विरोधाला पायदळी तुडवून ही कत्तल कुणाच्या आशीर्वादाने सुरू आहे? स्थानिकांचा आणि संपूर्ण महाराष्ट्राचा तीव्र विरोध असताना ह्या बेसुमार वृक्षतोडीची परवानगी वन विभागाने नेमकी कोणाच्या दबावाखाली दिली? महाराष्ट्राचा निसर्ग ओरबाडून खाजगी कंपन्यांचे खिसे भरण्याचा हा अजेंडा कधी थांबणार? नोव्हेंबरला होणाऱ्या भूमिपूजनाच्या घाईकरिता, महाराष्ट्राच्या पर्यावरणाचा बळी का दिला जात आहे? एक तर २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ आहे आणि त्यात जंगल कापून महाराष्ट्राला वाळवंट बनवण्याचा प्रयत्न भाजप राजवटीने हाती घेतला आहे.

– आदित्य ठाकरे, माजी पर्यावरण मंत्री

नवी मुंबई विमानतळ बंद पाडणार

समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, माजी आमदार मनोहर भोईर, माजी आमदार बाळाराम पाटील, माजी उपमहापौर जगदीश गायकवाड, नगराध्यक्षा भावना घाणेकर, कामगार नेते भुषण पाटील, उरण समितीचे अध्यक्ष सुधाकर पाटील, राजिप सदस्य डॉ. मनिष पाटील, पंचायत समितीचे सदस्य नरेश घरत, शेकापचे चिटणीस तथा कामगार नेते रवी घरत, सरपंच संतोष घरत, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष रामनाथ पंडित, रेखा घरत, राजाराम पाटील, नंदकुमार मुंगाजी सह सर्व पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, प्रकल्पग्रस्त, आजी-माजी नगरसेवक, सरपंच-उपसरपंच मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जेएनपीटीतुन पाकिस्तानी बिया जप्त

पाठवण्यात आली होती, त्यामुळे घोषित केलेल्या मूळ देशावर गंभीर शंका निर्माण होते. तपासात आयात-निर्यात कोड धारकाचा मुलगा आणि पुतण्या या दोन संबंधित व्यक्तींचा सहभाग उघड झाला आहे. ते कथितरित्या या व्यवहाराचे वेगवेगळे टप्पे सांभाळत होते. मुलगा दुबईस्थित पुरवठादार कंपनीचा मालक आणि संचालक आहे. तर, त्याचा चुलत भाऊ भारतात आयातीशी संबंधित औपचारिकता आणि देशांतर्गत विक्री सांभाळत होता. या दोन्ही व्यक्तींना दि.२२ ऑक्टोबर रोजी अटक करण्यात आली आहे.

एसटीच्या स्मार्ट प्रवासाला तांत्रिक खोडा

जिल्ह्यामध्ये एसटी बस आगारासह खासगी कार्यालयांमध्ये स्मार्टकार्डसाठी ४० हून अधिक सेंटर उभारण्यात आले आहेत. जिल्ह्यात आतापर्यंत १ लाख ३० हजार स्मार्ट (एनसीएमसी) कार्डची नोंदणी सवलतीने प्रवास करणाऱ्या महिला व ज्येष्ठ नागरिकांनी केलेली आहे. या स्मार्ट कार्डसाठी १९९ रुपये निश्चित केले आहे. कार्ड मिळाल्यानंतर त्यात डिजीटल पद्धतीने किंवा रोखीत देऊन रक्कम जमा करावी लागते. ज्यातून सवलतीचे तिकीट वजा केले जाते. मात्र, स्मार्टकार्डने तिकीट काढण्यासाठी इंटरनेटची सुविधा अत्यावश्यक असते. जिल्ह्यातील दक्षिण रायगडमधील ग्रामीण व दुर्गम भागात मोबाईल नेटवर्क विकसीत झालेले नाही. त्यामुळे या विभागातून प्रवास करणाऱ्या महिला, ज्येष्ठ नागरिकांना एसटीचे स्मार्ट कार्ड अडचणीचे ठरत आहे. ग्रामीण भागात एनसीएमसी कार्ड वापरताना एसटीच्या तिकीट मशीनमध्ये बिघाड होणे, सर्व्हर डाऊन असणे आणि कार्ड सिंक न होणे अशा समस्या निर्माण होत आहेत. याचा सर्वाधिक फटका जिल्ह्यातील ग्रामीण व आदिवासी भागातील प्रवाशांना बसत असून, त्यांना आर्थिक भुर्दंडासोबतच मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. एकीकडे तांत्रिक अडचणींमुळे प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे बोलले जात आहे, त्यामुळे या समस्येवर तोडगा काढण्यासाठी एसटी महामंडळ व संबंधित प्रशासन आगामी काळात नेमकी काय पावले उचलणार, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

शेकापतर्फे महिलांचा सन्मान

आणि चेंढरे मित्रमंडळाच्या संयुक्त विद्यमाने एक रंगतदार आणि धमाकेदार फॅन्सी ''महागरबा'' रंगणार आहे. या नाविन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून रंगीबेरंगी पारंपरिक वेशभूषा, गरब्याचा ताल आणि कोजागिरीच्या चांदण्यात धमाल करण्याची संधी मिळणार आहे. हा कार्यक्रम सायंकाळी साडेसहा वाजता सुरु होणार आहे. यावेळी आकर्षक बक्षीसेदेखील असणार आहेत. या कार्यक्रमात फॅन्सी गरबा किंग आणि गरबा क्वीन ही स्पर्धा होणार आहे. त्यातील विजेत्याला आकर्षक बक्षीस देऊन गौरविण्यात येणार आहे.



प्रथम क्रमांक

१) सौ. रश्मी अपुर्व पाटील, पेझारी
२) श्री. गजानन त्रिंबक म्हात्रे, थळ
३) श्री. योगेश प्रकाश वार्डे, रांजणपाडा-आवास
४) श्री. अनिल नारायण वर्तक, वरसोली
५) श्री. विनोद मेहेता, माणगाव
६) श्री. अजिंक्य शेळके, डोंगरी-मुरुड
७) श्री. पांडूरंग विष्णू घरत, लोणारे-थळ
८) श्री. पांडूरंग आरेकर, मुरुड
९) श्री. प्रथमेश दत्ताराम पाटील, दिवीपारंगी-अलिबाग
१०) श्री. चेतन संजय घरत, वरसोली-अलिबाग

द्वितीय क्रमांक

१) सौ. मितल राजेंद्र नाईक, रेवदंडा
२) श्री. संतोष खडतर, चेरवली-माणगाव
३) श्री. रोशन शिवराम म्हसकर, नार्पोली-पनवेल
४) श्री. प्रकाशदादा ठाकूर, झिराड
५) श्री. राजाराम दामोदर पाटील, डावळे-नागाव
६) श्री. मनोज सदाशिव भवारे, दहिवली-नेरळ
७) सौ. छाया विलास भिडे, पेण
८) मोंढे कुटूंब, मुनवली-अलिबाग
९) श्री. अनंत विष्णू पाटील, रामनाथ-अलिबाग
१०) श्री. समीर सावंत, तळवडे(गोठेघर) अलिबाग

विजेत्यांनी आपले बक्षीस २२ ऑक्टोबर ते २८ ऑक्टोबर २०२६ पर्यंत दु. १२ ते सायं. ४ या कालावधीत कृषीवल कार्यालयातून येऊन घेऊन जाणे.

टीप : विजेत्यांनी येताना आपले फोटो असलेले ओळखपत्र सोबत घेऊन येणे.

पत्ता : कृषीवल कार्यालय, वेश्वी, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०

सिडको शहरांचे शिल्पकार
सत्यमेव जयते

विकासाच्या नव्या क्षितिजावर, उज्ज्वल भविष्याचा उदय



नरेंद्र मोदी
पंतप्रधान

नैना परिसरातील विकासकामांचा शुभारंभ व जमिनधारकांना मालमत्ता पत्रक वितरण तथा नवी मुंबईतील महत्त्वपूर्ण कनेक्टिव्हिटी प्रकल्पांचे लोकार्पण



शुभहस्ते
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र

लोकहिताला प्राधान्य, विकासाला गती

- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (नमुंआंवि) भोवतालच्या २२५ चौ.कि.मी. क्षेत्रावर नैना प्रकल्पाचा विकास
- सक्षम पायाभूत सुविधा आणि सुरळीत कनेक्टिव्हिटीमुळे प्रवास अधिक सुलभ, वेळेची बचत आणि प्रादेशिक विकासाला नवी गती
- नवी मुंबई व नमुंआंविला उत्तम जोडणी लाभावी याकरिता विविध कनेक्टिव्हिटी प्रकल्प
- नियोजनबद्ध विकास आणि मालमत्ता पत्रकांच्या वितरणातून नागरिकांचा सहभाग अधिक दृढ, तर नवी मुंबई आणि परिसराच्या प्रगतीला नवी दिशा



नैना टीपीएसमधील विविध पायाभूत प्रकल्प कामांचे भूमिपूजन




उरण बायपास पूल लोकार्पण



SBR-९ (Stilt Bridge), BR-४ व BR-५ या विमानतळाभोवतालच्या महत्त्वपूर्ण कनेक्टिव्हिटी प्रकल्पांचे लोकार्पण

प्रकल्पांची वैशिष्ट्ये

* नैना प्रकल्प: विमानतळाभोवतालच्या प्रदेशाचा नियोजनबद्ध आणि सर्वांगीण विकास
* BR-४ व BR-५: पनवेल, ठाणे, कल्याण आणि पुण्याकडून नवी मुंबई व विमानतळाकडे सुलभ कनेक्टिव्हिटी
* स्टिल्ट ब्रिज SBR-९: विमानतळाकडे पूर्वेकडून येणाऱ्या वाहतुकीसाठी सक्षम जोडणी
* उरण बायपास पूल: उरण शहरातील वाहतूक कोंडी कमी करून दळणवळण अधिक सुलभ करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल
* मालमत्ता पत्रकांचे वितरण : पात्र जमिनधारकांना अंतिम भूखंडाची स्पष्ट माहिती आणि मालमत्तेच्या नोंदींमध्ये पारदर्शकता



देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र



एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र



सुनेत्रा अजित पवार
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र



माधुरी मिसाळ
राज्यमंत्री, नगर विकास, महाराष्ट्र

स्थळ
दिल्ली पब्लिक स्कूल, सांगुर्ली लगतचे मैदान,
मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गालगत,
शिरढोण, ता. पनवेल, जि. रायगड

दिनांक व वेळ
रविवार, दि. २५ ऑक्टोबर २०२६ रोजी
सकाळी ११.०० वाजता

शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित

www.cidco.maharashtra.gov.in | CIN - U99999 MH 1970 SGC-014574 | सिडको/जनसंपर्क/२६६/२०२६-२७

अद्ययावत माहितीकरिता आमचे अनुसरण करा – @cidco_Ltd :/cidco CIDCO Ltd. @cidco_ltd

खोपोली न.पा.कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड

| खोपोली | प्रतिनिधी |

खोपोली नगरपालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांना ३५ हजार सानुग्रह अनुदान शुक्रवारी (दि.२३) झालेल्या सर्वसाधारण सभेत मंजूर केला आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांची यंदाचीही दिवाळी गोड होणार असल्याने म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनच्या पदाधिकारीऱ्यांनी नगराध्यक्ष कुलदिपक शेंडे, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, मुख्याधिकारी पंकज पाटील आणि नगरसेवकांचे आभार मानले आले.

दिवाळीनिमित्ताने कर्मचाऱ्यांना बोनस जाहीर केला जातो. खोपोली नगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना बोनस मिळावा, यासाठी कामगार प्रतिनिधी पाठपुरावा करीत होते.

नगराध्यक्ष कुलदिपक शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली



- ३५ हजार सानुग्रह अनुदान मंजूर
- नगराध्यक्ष कुलदिपक शेंडेचे मानले आभार

आयोजित सर्वसाधारण सभा पार पडली. या सभेला उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील, विविध खात्याचे सभापती, गटनेते सर्व नगरसेवक, नगरसेविका उपस्थित होते. सर्वसाधारण सभेत विविध विषयांवर चर्चा सुरू असतानाच कर्मचाऱ्यांना ३५ हजार सानुग्रह अनुदान देण्याचा महत्वपूर्ण निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियन स्थानिक कमिटीच्या अध्यक्षा संगीता सोलंकी, उपाध्यक्षा आरुणा मोरे, मोहन मोरे मंगेश वाणी, संतोष नवघरे, ज्येष्ठ सल्लागार काशिनाथ गायकवाड यांनी आभार व्यक्त केले.

> **माजी नगराध्यक्ष रामदास शेंडे यांनीही कर्मचाऱ्यांप्रति प्रचंड आस्था होती. त्यामुळे त्यांना आमच्या कर्मचाऱ्यांसाठी प्रचंड काम केले आहे. त्याच्याच पाऊलावर पाऊल ठेवत नगराध्यक्ष कुलदिपक शेंडे काम करीत आहेत.**
> **– मोहन मोरे, कामगार प्रतिनिधी, खोपोली नगरपालिका**

> **कर्मचारी हे नगरपरिषदेच्या कामकाजाचा महत्त्वाचा आधार आहेत. त्यांच्या हिताचे निर्णय घेणे, त्यांच्या कल्याणाला प्राधान्य देणे आणि त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे ही आमची भूमिका आहे. कर्मचाऱ्यांचे हित जपण्यासाठी आम्ही सदैव कटिबद्ध आहोत. सर्व नगरसेवकांनी कर्मचाऱ्यांसाठी ३५ हजार सानुग्रह अनुदान मंजूर करण्यासाठी पांठिबा दिल्याने कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड होणार आहे.**
> **– कुलदिपक शेंडे, नगराध्यक्ष, खोपोली नगरपरिषद**

अरुण चाळके यांना मातृशोक

माणगाव : माणगाव तालुक्यातील वाघोसे गावचे रहिवासी तथा शिवसेनेचे रायगड जिल्हा संपर्कप्रमुख अरुण चाळके व विश्वनाथ चाळके यांच्या मोतोश्री पार्वती विठू चाळके यांचे बुधवारी (दि.२१) वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ९२ वर्ष होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी,



सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने चाळके परिवार आप्तेष्ट व ग्रामस्थ मंडळ वाघोसे यांच्यावर शोककळा पसरली आहे. त्यांचा दशक्रिया विधी शुक्रवार दि.३०ऑक्टोबर रोजी तर उत्तरकार्य विधी रविवार दि.१ नोव्हेंबर २०२६ रोजी राहते घरी वाघोसे येथे होणार असल्याचे त्यांचे सुपुत्र अरुण चाळके यांनी सांगितले.

निवडक



सुनील बैकर यांना निरोप

तळा : रायगड जिल्हा परिषदेच्या तळा मराठी शाळेत गुणवंतांचा सत्कार व निरोप समारंभ कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते शिक्षक सुनील बैकर यांचा निरोप समारंभ. सुनील बैकर यांनी आपल्या सेवाकाळात केवळ अध्यापनच नव्हे, तर तळा मराठी शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मोलाचे योगदान दिले आहे. विद्यार्थ्यांना ज्ञानदानासोबतच संस्कार, शिस्त आणि स्पर्धा परीक्षांसाठी सतत प्रेरित करून अनेक गुणवंत विद्यार्थी घडवण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. शाळेच्या शैक्षणिक दर्जा उंचावण्यापासून ते भौतिक सुविधांच्या विकासापर्यंत प्रत्येक कार्यात त्यांनी स्वतःला वाहून घेतले. तयेच यावेळी मंथन, नवोदय, शिष्यवृत्ती परीक्षा तसेच विविध क्रीडा स्पर्धांमध्ये यशस्वी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान गटशिक्षणाधिकारी दिवेकर यांच्या हस्ते करण्यात आला.



वनराई बंधारा बांधून वृक्ष लागवड

वेणगाव : मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत पाणी टंचाई व दुष्काळावर मात करण्यासाठी ग्रामपंचायत वेणगाव येथे वनराई बंधारे व वृक्ष लागवड करण्यात आली. वेणगाव ग्रामपंचायत हद्दीत नाल्यावर वाळू मातीच्या भरलेल्या गोणी टाकून पाणी अडवून श्रमदानाने वनराई बंधारा बांधण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ग्रामपंचायत हद्दीतील मोठे वेणगाव, छोटे वेणगाव येथील दोन्ही स्मशानभूमीच्या आवारात वड, पिंपळ, करंज, जांभूळ आदी जातीच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. तसेच लागवड केलेल्या सर्व झाडांना प्राण्यांपासून संरक्षण मिळावे म्हणून लोखंडी जाळीचे पिंजरे लावण्यात आले. या प्रसंगी सरपंच अस्विनी पालकर व गटविकास अधिकारी सुशांत पाटील, विस्तार अधिकारी राजपूत, राठोड, कांबळे, ग्रामसेवक केशव जाधव, ग्रामपंचायत सदस्य समीर कडूस्कर, समीर पेठे ग्रामस्थ रमेश मुंढे, शरद पालकर, कृष्णा घाडगे, मंगेश पालकर, ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.



स्व. शिवाजी शिंदेंना मरणोत्तर 'समाजगौरव स्मृती पुरस्कार' प्रदान

पाली : सुधागड तालुका मराठा समाज, पाली येथे मंगळवारी (दि.२०) आयोजित करण्यात आलेल्या दसरा मेळाव्याच्या प्रसंगी, स्व. शिवाजी पांडुरंग शिंदे यांना मरणोत्तर 'समाजगौरव स्मृती पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. स्वर्गीय शिवाजी पांडुरंग शिंदे यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजकार्यासाठी समर्पित केले होते. त्यांनी सुधागड तालुका मराठा समाजाच्या हिताला नेहमीच सर्वोच्च प्राधान्य दिले. समाजातील बांधवांना एकत्रित आणून, समाजाची एकजूट, संघटनशक्ती आणि सामाजिक बांधिलकी अधिक दृढ करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, सुधागड तालुका मराठा समाजाने अनेक शैक्षणिक प्रकल्प राबवले. त्यांच्या निःस्वार्थी सामाजिक कार्याची व समाजासाठी दिलेल्या अमूल्य योगदानाची कृतज्ञतापूर्वक दखल घेऊन, सुधागड तालुका मराठा समाजातर्फे त्यांना मरणोत्तर 'समाजगौरव स्मृती पुरस्कार' प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी त्यांचे पुत्र नंदकुमार शिंदे व परिवार यांना आमंत्रित करण्यात आले होते.

चंपावती पतसंस्थेचा ५० कोटींच्या मिश्र व्यवसायाचा टप्पा पूर्ण

रेवदंडा : रेवदंडा येथील चंपावती ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित या संस्थेने आपल्या प्रगतीच्या वाटचालीत महत्त्वपूर्ण टप्पा गाठला असून, ५० कोटी रुपयांच्या मिश्र व्यवसायाचा टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे. संस्थेच्या या यशामुळे सहकार क्षेत्रातील तिच्या वाढत्या विश्वासार्हतेवर आणि आर्थिक प्रगतीवर शिक्कामोर्तब झाले आहे. संस्थेने सभासदांचा विश्वास, सहकार्य आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या बळावर ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली आहे. संस्थेच्या या यशामध्ये सभासद, ठेवीदार, कर्जदार, हितचिंतक तसेच अध्यक्ष, संचालक मंडळ आणि कर्मचारी वर्गाचे मोलाचे योगदान असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले. सहकाराच्या माध्यमातून आर्थिक विकास साधताना पारदर्शकता, सुरक्षितता, विश्वास आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांना संस्थेने महत्त्व दिले आहे. ५० कोटींच्या मिश्र व्यवसायाचा टप्पा पूर्ण केल्याबद्दल संस्थेच्या वतीने सर्व सभासद, ठेवीदार, हितचिंतक आणि सहकार्य करणाऱ्या नागरिकांचे आभार व्यक्त करण्यात आले.

हजारो लिटर पाणी वाया



कोर्लई : मुरुड-गारंबी धरणातून येणारी जलवाहिनी नागशेत ते शिघ्रे दरम्यान फुटली आहे. त्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून हजारो लिटर पाणी वाया जात आहे. मात्र याकडे संबंधित पाणीपुरवठा विभागाच्या जाणीवपूर्वक दुर्लक्षाबाबत नाराजी व्यक्त केली जात आहे. एल निनोच्या प्रभावामुळे व गेल्या महिनाभरापासून पाऊस न पडल्याने यंदा भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार आहे. राज्यात शासनाने ३०५ तालुके दुष्काळग्रस्त जाहीर केले आहेत. या पार्श्वभूमीवर संबधित पाणी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी यात तातडीने लक्ष पुरवून योग्य ती उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

तळा तालुक्यात फळपीक विमा योजना सुरू

| तळा | प्रतिनिधी |

अल निनोच्या प्रभावामुळे कोकणातील बदलत्या हवामानाचा आंबा व काजू उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेता, रायगड जिल्ह्यात सन २०२६-२७ साठी पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना राबवण्यात येत आहे. तळा तालुक्यातील आंबा-काजू बागायतदारांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

ही योजना भारतीय कृषी विमा कंपनी लिमिटेडमार्फत राज्य शासन राबवत असून कर्जदार व बिगर कर्जदार दोन्ही शेतकऱ्यांसाठी ऐच्छिक आहे. या योजनेत सहभागासाठी किमान ०.१० हेक्टर तर कमाल ४ हेक्टरपर्यंत क्षेत्र असणे आवश्यक असून फळबागेचे वय किमान ५ वर्षे असणे बंधनकारक आहे. आंबा पिकासाठी विमा हप्ता दर ५ टक्के तर काजू पिकासाठी ४ टक्के आहे. आंब्यासाठी १ लाख ७० हजार रुपये प्रति हेक्टरी विमा संरक्षणासाठी ८ हजार ५०० रुपये हप्ता, तर काजूसाठी १ लाख २० हजार रुपयांच्या संरक्षणासाठी ४ हजार ८०० रुपये हप्ता भरावा लागणार आहे. गारपीट वगळून ही रक्कम आहे. आंब्यासाठी १ डिसेंबर ते ३१ मे या काळात अवेळी पाऊस, कमी-जास्त तापमान, वारा, गारपीट तर काजूसाठी १ डिसेंबर ते २८ फ ब्रुवारी दरम्यान अवेळी पाऊस, कमी तापमान आणि १ डिसेंबर ते ३१ मे दरम्यान गारपिटीपासून संरक्षण मिळणार आहे.

ज्येष्ठ नागरिक सभासद दाम्पत्यांचा सत्कार

अलिबाग : ज्येष्ठ नागरिक संस्था अलिबाग तर्फे रविवार दि.२९ रोजी होणाऱ्या त्रैमासिक सभेत हयात सभासद दाम्पत्यांच्या विवाहास ५० वर्षे पूर्ण झाली आहेत, अशा दाम्पत्यांचा यथोचित सन्मान करण्यात येणार आहे. यासाठी ज्योती पाटील यांच्याशी मंगळवारी व शुक्रवारी कार्यालयीन वेळेत येऊन अर्ज भरून द्यायचा आहे. अर्ज भरून देण्याची मुदत दि.२० नोव्हेंबरपर्यंत असणार असून त्यानंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही. अर्जासाठी सभासद दाम्पत्यांचा एकत्रित फोटो, विवाहाची तारीख व ठिकाण इत्यादी माहिती कार्यालयात द्यावी, असे आवाहन संस्थेचे सचिव नंदू तळकर यांनी केले आहे.

वित्तीय समावेशन अभियानाचा शुभारंभ

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

भारतीय रिझर्व्ह बँक, महाराष्ट्र राज्यस्तरीय बँकर्स समिती आणि जिल्हा अग्रणी बँक कार्यालय, रायगड (बँक ऑफ इंडिया) यांच्या संयुक्त पुढाकाराने वित्तीय समावेशन योजनांच्या संतृप्तीकरणासाठी तसेच पुनः केवायसी मोहिमेच्या राज्यस्तरीय अभियानाचा शुभारंभ पेण तालुक्यातील आंबेघर येथे गुरुवारी (दि.२२) उत्साहात पार पडला.

या अभियानाचा कालावधी २१ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०२६ असा असून, राज्यातील पात्र लाभार्थ्यांपर्यंत वित्तीय समावेशन योजनांचा लाभ पोहोचविणे, बँकिंग सेवांचा विस्तार करणे तसेच ग्राहकांचे पुनः केवायसी अद्ययावत करण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे.



कार्यक्रमात मार्गदर्शन करताना भारतीय रिझर्व्ह बँकेचे प्रादेशिक संचालक राकेश कुमार श्रीवास्तव यांनी पुनः केवायसीचे महत्त्व अधोरेखित केले. बँक खात्यांशी संबंधित माहिती अद्ययावत ठेवणे, ग्राहकांना सुरक्षित बँकिंगविषयी जागरूक करणे आणि डिजिटल आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी आवश्यक दक्षता घेणे यावर त्यांनी भर दिला. राज्यातील सर्व जिल्हे व ग्रामपंचायतींपर्यंत या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आवाहनही त्यांनी बँकांना केले. सायबर आर्थिक फसवणूक झाल्यास तातडीने राष्ट्रीय हेल्पलाइन क्रमांक १९३० वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

या अभियानांतर्गत वित्तीय समावेशन योजनांचा लाभ पात्र नागरिकांपर्यंत पोहोचविणे, बँक खात्यांमधील केवायसी माहिती अद्ययावत करणे, नागरिकांना बँकिंग सुविधांची माहिती देणे आणि डिजिटल व्यवहारांबाबत सुरक्षिततेची जाणीव निर्माण करणे यासाठी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

शंकर पाटील यांचे निधन

| वढाव | प्रतिनिधी |

पेण तालुक्यातील जनवली येथील शंकर पांडुरंग पाटील यांचे वयाच्या ९९ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात सहा मुले,



दोन मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. गावातील सामुदायिक कार्यक्रमांसह सुख-दुःखाच्या प्रसंगी ते नेहमी सहभागी होत असत. त्यांचे दिवसकार्य रविवार, दि.२५ ऑक्टोबर रोजी त्यांच्या निवासस्थानी होणार आहेत.

तळ्यात 'खेत बचाओ अभियाना'ला सुरुवात

| तळा | प्रतिनिधी |

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत गुरूवार, दि.२२ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत 'खेत बचाओ अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत तळा तालुक्यात शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी क्रॉप्सअप योजनेअंतर्गत शेतीशाळा वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानात शेतकऱ्यांना मातीचे आरोग्य सुधारणे, रासायनिक खतांचा संतुलित वापर, पीक अवशेष व्यवस्थापन, जमिनीतील ओलावा टिकवणे, जलसंधारण आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन याबाबत सविस्तर मार्गदर्शन



करण्यात येत आहे. या कार्यक्रमास पिटसईचे सहाय्यक कृषी अधिकारी अतुल बाबर, उपकृषी अधिकारी गोविंद पाशिमे आणि आत्मा यंत्रणा, तळा येथील सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक सचिन लोखंडे उपस्थित होते.

यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी अतुल बाबर यांनी क्रॉप्सअप योजनेची माहिती देत आधुनिक व शाश्वत शेतीचा अवलंब करण्याचे आवाहन केले. एल निनोच्या संभाव्य परिणामामुळे ओलावा कमी होण्याची शक्यता असल्याने फळझाडांभोवती मल्चिंग (आच्छादन) करण्याचे महत्त्व त्यांनी विशद केले. तर सचिन लोखंडे यांनी माती परीक्षणानुसार खतांचा वापर, रासायनिक खतांचा अतिवापर टाळून सेंद्रिय खतांचा वापर वाढवण्याचा सल्ला दिला. तर गोविंद पाशिमे यांनी बायोचारनिर्मिती पद्धत समजावून सांगत, त्यामुळे जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते असे स्पष्ट केले. पीक अवशेष न जाळता सेंद्रिय खतनिर्मितीसाठी वापर करण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

विधी साक्षरता कार्यक्रमाचे आयोजन

अलिबाग : जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व ज्येष्ठ नागरिक संस्था अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिक सभासदांसाठी विधी साक्षरता कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम गुरुवारी (दि.३०) सकाळी ११ वाजता ज्येष्ठ नागरिक संस्था अलिबागच्या कै.ल.नी. नातू सभागृहात होणार आहे. या कार्यक्रमातून ज्येष्ठ वकिलांतर्फे विविध विषयांतर्गत मोफत कायदेशीर सल्ला दिला जाणार आहे.

नशामुक्ती मोटारसायकल रॅलीचे पोलादपूरमध्ये स्वागत

| पोलादपूर | प्रतिनिधी |

लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्मृतीनिमित्त केरळ ते गुजरातपर्यंत जाणाऱ्या मोटारसायकल रॅलीचे कशेडी घाटाला पर्यायी भुयारी मार्गातून पोलादपूर तालुक्यामध्ये आगमन झाले. यावेळी पोलादपूरसह रायगड जिल्ह्यातील पोलीस, प्रशासन आणि राजकीय व्यक्ती तसेच लोकप्रतिनिधींनी राष्ट्रीय एकता मोटारसायकल रॅलीचे जोरदार स्वागत केले. नशा मुक्ती या विषयावर जनतेचे प्रबोधन करण्यासाठी ही रॅली महत्त्वपूर्ण ठरली.

सरदार वल्लभभाई पटेल



यांच्या स्मृतीनिमित्त राष्ट्रीय एकात्मतेचा आणि नशा मुक्तीचा संदेश देत जनजागृती करण्यासाठी ही मोटारसायकल रॅली येणार असल्याने रायगड पोलिसांनी पोलादपूर आणि महाड पोलीस ठाण्यांच्यावतीने भुयारी मार्गालगत स्वागताची जय्यत तयारी केली. यावेळी तहसीलदार कपिल घोरपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप काळे, स.पो.नि. विजय सुर्वे, महाड औद्योगिक पोलीस ठाण्याचे स.पो.नि. आनंद रावडे तसेच अन्य पोलीस अधिकारी आणि रायगड जिल्हा परिषदेचे शिक्षण अर्थ आणि क्रीडा सभापती चंद्रकांत कळंबे, पोलादपूर पंचायत समिती सभापती अविनाश शिंदे, दगडू पार्टे, लक्ष्मण मोरे, सतीश शिंदे तसेच माध्यमिक शाळेचे विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी कोकणातील खालुबाजाच्या निनादात मोटारसायकल रॅलीतील जवानांनी ठेका धरला. महाड व पोलादपूर तालुक्यात सेवा करणारे वाहतूक पोलीस मंदार लहाने हे या रॅलीत सामील झाले होते. पोलादपूर तालुक्यात आगमन झाल्यानंतर नशा मुक्ती मोटारसायकल रॅलीतील जवानांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. यावेळी पोलादपूर तालुक्यातील विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात आली. यानंतर महाड, माणगाव, पेण, पनवेल येथे या नशा मुक्ती मोटारसायकल रॅलीचे स्वागत करण्यात आले.

एमडी ड्रग्ज विक्रीप्रकरणी तिघांना अटक

| पनवेल | प्रतिनिधी |

करंजाडे ते चिंचपाडा मार्गावर एमडी या अमली पदार्थाची विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. या कारवाईत एक लाख ७६ हजार ४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यामध्ये ९.३४ ग्रॅम एमडी अमली पदार्थ, वेस्पा स्कुटी आणि तीन मोबाईलचा समावेश आहे.

या प्रकरणी जितिन शेट्टी (वय २५, रा. तक्का, पनवेल) आणि राज अजयकुमार मिश्रा वैद्य (वय २०, रा. ओल्ड पनवेल) यांच्यासह रोशन सुनील पवार (रा. करंजाडे, पनवेल) याला अटक करण्यात आली आहे. रोशन पवार हा तडीपार असल्याने त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम १४२ अन्वयेही कारवाई करण्यात येत आहे.

याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हजरत पठाण, पोलीस नाईक सम्राट डाकी, अनिल चव्हाण, साईनाथ मोकल, अभिजित गडकरी, दत्ता जाधव आणि विशाल दुधे यांच्या पथकाने केली.

तज्ज्ञ डॉक्टर, प्राध्यापकांचे मार्गदर्शन | विद्यार्थी, युवकांसह नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

नागोठणे परिसरात आरोग्य जनजागृती उपक्रम

| नागोठणे | प्रतिनिधी |

'जागर आरोग्याचा- मुख्यमंत्री आरोग्य संवाद' अभियानांतर्गत श्रीमती शांतीबाई ओटरमल जैन आयुर्वेदिक कॉलेज व रुग्णालय, नागोठणे यांच्या वतीने दि.१२ ते १९ ऑक्टोबर या कालावधीत विविध शैक्षणिक संस्था, तांत्रिक महाविद्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी आरोग्य जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या अभियानाला विद्यार्थी, युवक आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या अभियानांतर्गत किशोरवयीन मुलींचे आरोग्य, वैयक्तिक स्वच्छता, पोषण, ध्यानधारणा, मानसिक स्वास्थ्य, तणाव व्यवस्थापन,



व्यसनमुक्ती, आत्महत्या प्रतिबंध आणि दैनंदिन जीवनातील आयुर्वेदाचे महत्त्व अशा विविध विषयांवर तज्ज्ञ डॉक्टर व प्राध्यापकांनी मार्गदर्शन केले.

गोवे-कोलाड येथील तटकरे चॅरिटेबल ट्रस्टच्या डॉ. श्री.नानासाहेब धर्माधिकारी कॉलेजमध्ये दि.१२ ऑक्टोबर रोजी किशोरवयीन मुलींचे आरोग्य, वैयक्तिक स्वच्छता व पोषण या विषयावर वैद्या समृद्धी ठोंबरे आणि वैद्या अनघा मरळ यांनी मार्गदर्शन केले. दि.१३ ऑक्टोबर रोजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागोठणे येथे ध्यानधारणा, प्रात्यक्षिके व मानसिक आरोग्य या विषयावर वैद्य अक्षय ठाकूर आणि वैद्या अक्षदा भोर यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर श्रीमती शांतीबाई ओटरमल जैन आयुर्वेदिक कॉलेजमध्ये आरोग्य शपथविधी व प्रेरणादायी व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यानंतर महाविद्यालयाच्या सभागृहात दि.१४ ऑक्टोबर रोजी तरुणांमधील मानसिक आरोग्य, व्यसनमुक्ती आणि आत्महत्या प्रतिबंध या विषयांवर विशेष सत्र आयोजित करण्यात आले. दि.१५ ऑक्टोबर रोजी नागोठणे येथील श्री जोगेश्वरी मंदिर परिसरात दैनंदिन जीवनातील आयुर्वेदाचे महत्त्व, मानसिक स्वास्थ्य व व्यसनमुक्ती यावर मार्गदर्शन केले. दि.१६ ऑक्टोबर रोजी इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, नागोठणे येथे तरुणांमधील व्यसनमुक्ती आणि मानसिक आरोग्य या विषयांवर मार्गदर्शन केले. तर दि.१९ ऑक्टोबर रोजी एस.एस.ओ.एस.पी. पॉलिटेक्निक कॉलेज, नागोठणे येथे मानसिक स्वास्थ्य, तणाव व्यवस्थापन, व्यसनमुक्ती व आत्महत्या प्रतिबंध या विषयांवर जनजागृती सत्र आयोजित करण्यात आले होते.

आरोग्यदायी जीवनशैलीसाठी प्रोत्साहन

या अभियानाच्या माध्यमातून युवकांमध्ये मानसिक आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, तणावाचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन विकसित करणे, व्यसनांपासून दूर राहण्याचा संदेश देणे आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा अंगीकार करण्यास प्रोत्साहन देणे यावर विशेष भर देण्यात आला.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२५ सप्टेंबर

१) श्री. रवींद्र गंगाराम पाटील
पोयनाड, अलिबाग
२५-१०-१९४९
२) श्रीम. संगीता सुरेश पालवणकर
अलिबाग, २५-१०-१९५३
३) श्री. चंद्रकांत शंकर ठाकूर
अलिबाग, २५-१०-१९५८
४) श्री. श्रीकांत सदानंद पाटील
अलिबाग, २५-१०-१९६०

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

ठार मारण्याचा प्रयत्न

नवीन पनवेल : चाळीस वर्षीय इसमाला चाकूने ठार मारण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी संचित खटके आणि अनोळखी इसमा विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. संचित आणि अनोळखी इसमाने अजित पिसाळ यांना चाकूने दुखापत करून ठार मारण्याचा प्रयत्न केला.

नवी मुंबईत देशांतर्गत विमान सेवा सुरू

आर्थिक विकासाला मोठा हातभार लागणार

। पनवेल । प्रतिनिधी ।

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाने आपल्या देशांतर्गत हवाई मार्गांच्या जाळ्याचा मोठा विस्तार करत नऊ नव्या ठिकाणांसाठी विमानसेवा सुरू करण्याची घोषणा केली आहे. या नव्या विस्तारामुळे महाराष्ट्र, राजस्थान, बिहार, आसाम, झारखंड, पश्चिम बंगाल आणि लक्षद्वीप या राज्यांतील प्रमुख शहरांशी मुंबई महानगर प्रदेश थेट जोडला जाणार आहे. यामुळे प्रादेशिक हवाई जोडणी अधिक बळकट होण्यासोबतच पर्यटन, व्यापार आणि आर्थिक विकासाला मोठा हातभार लागणार आहे.



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून आता अगत्ती (गोवा-मोपा मार्गे), दरभंगा, गुवाहाटी, जळगाव, जोधपूर, रांची, बागडोगरा, सिंधुदुर्ग आणि उदयपूर या नऊ नवीन ठिकाणी उड्डाणे उपलब्ध होणार आहेत. या नव्या हवाई मार्गांमुळे प्रवाशांना विविध पर्यटनस्थळे, सांस्कृतिक केंद्रे आणि प्रादेशिक बाजारपेठांपर्यंत सहज पोहोचता येणार आहे.

सिंधुदुर्ग सेवांमुळे कोकणातील समुद्रकिनारे, किल्ले व जलक्रीडा पर्यटनाला गती मिळेल, तर जळगाव जोडणीमुळे उत्तर महाराष्ट्र आणि ऐतिहासिक अजिंठा लेण्यांपर्यंतचा प्रवास सोपा होईल. जोधपूर आणि उदयपूरमुळे राजस्थानातील किल्ले, राजवाडे व डेस्टिनेशन वेडिंगसाठी प्रसिद्ध असलेल्या शहरांपर्यंत सहज पोहोचता येईल. बागडोगरा मुळे दार्जिलिंग, कालिम्पोंग, सिक्कीम आणि पूर्व हिमालयीन पर्यटन क्षेत्राशी संपर्क वाढेल. गुवाहाटीमुळे आसाम व ईशान्य भारतातील वन्यजीव पर्यटन सुलभ होईल, तर दरभंगा आणि रांचीमुळे बिहारमधील मिथिला प्रदेश व झारखंडमधील धबधबे-जंगलांच्या पर्यटनाला वाव मिळेल. गोवा-मोपा मार्गे अगत्ती हवाई सेवेमुळे लक्षद्वीपमधील सागरी पर्यटनाचा मार्ग सुकर झाला आहे.

आंतरराष्ट्रीय मालवाहतुकीत मोठी झेपप्रादेशिक जोडणीसोबतच आंतरराष्ट्रीय मालवाहतूक क्षेत्रातही विमानतळाने मोठी झेप घेतली आहे. सेवा सुरू झाल्यानंतर तीन महिन्यांपेक्षा कमी कालावधीत ४९३ मालवाहू विमानांची नोंद झाली आहे. सध्या १८ प्रमुख विमान कंपन्यांद्वारे जगातील ४५ ठिकाणी मालवाहतूक केली जात आहे. यामध्ये एमिरेट्स, कतार एअरवेज, लुफ्तहान्सा, एअर फ्रान्स आणि टर्किश एअरवेज यांसारख्या प्रवासी कंपन्यांसह डीएचएल, टलास एअर आणि रोलॉजिक यांसारख्या विशेष कार्गो कंपन्यांचा समावेश आहे. युरोप, मध्य पूर्व, आशिया आणि आफ्रिकेशी जोडलेल्या या जाळ्यामुळे विमानतळाची जागतिक स्तरावरील मालवाहतूक क्षमता अधिक मजबूत झाली आहे.

पनवेलमधून तरुणी बेपत्ता

पनवेल : पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतून जिनत बादशाहा शेख (वय २५) ही तरुणी बेपत्ता झाली असून, याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून तिचा शोध सुरू आहे. जिनत शेख ही वावंजे, ता. पनवेल, येथील रूम क्रमांक १०३ मध्ये राहते. व ती नोकरी करते. तिचा चेहरा उभट, बांधा मध्यम, रंग गोरा, डोळे काळे आणि केस काळे व कुरळे आहेत. तिची उंची सुमारे साडेचार फूट आहे. बेपत्ता होताना तिने लाल रंगाचा टॉप, लेगिन्स आणि पायात गुलाबी रंगाच्या सँडल घातल्या होत्या. तिला हिंदी, मराठी आणि इंग्रजी भाषा बोलता येतात. जिनत शेख हिच्याबाबत कोणाला काही माहिती मिळाल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे तपास अधिकारी पोलीस हवालदार उदय वसंत भगत यांच्याशी ८१०८३३००६० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.



भोईघरमध्ये लोकसहभागातून बांधला बंधारा

। कोर्लई । प्रतिनिधी ।

गेल्या महिनाभरापासून परतीच्या पावसाने दांडी मारल्याने व एल निनोच्या प्रभावामुळे संभाव्य भीषण दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मुरुड तालुका पंचायत समितीचे गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ यांच्या मार्गदर्शनाखाली मुरुड तालुक्यातील चोवीस ग्रामपंचायतीमध्ये अभियान स्वरूपात लोकसहभागातून बंधारे बांधण्यात आले. त्याचाच भाग भोईघर ग्रामपंचायत हद्दीतील नदीवर लोकसहभागातून पाणी अडवा पाणी जिरवा वनराई बंधारा बांधण्यात आला. तसेच जलसंधारणाची माहीती देण्यात आली.

यावेळी तालुका पंचायत समितीचे सांख्यिकी विस्तार अधिकारी प्रसाद माळी, कृषी सहाय्यक आदिराज चौलकर, हर्षद संजय महाडिक, सुचिता सुशील कासार, काशिनाथ वाघमारे, ग्रामपंचायत अधिकारी संतोष नागोठकर, ग्रामपंचायत कर्मचारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांची स्वच्छतेबाबत जागृती

। रसायनी । प्रतिनिधी ।

पाताळगंगा येथील अल्काईल अमाईन्स केमिकल्स लिमिटेडच्या सीएसआर निधीच्या माध्यमातून परिसरातील १८ जिल्हा परिषद शाळांमध्ये 'माझी शाळा स्वच्छ शाळा २०२६' हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ संबंधित शाळांमध्ये उत्साहात पार पडला.



विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची आवड निर्माण व्हावी, पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व समजावे तसेच शाळा व परिसर स्वच्छ ठेवण्याची सवय लहान वयातच रुजावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये छोट्या गटासाठी चित्रात रंग भरणे, मोठ्या गटासाठी चित्र काढून रंगविणे, उत्कृष्ट वर्ग पुरस्कार ट्रॉफी, घोषवाक्य लेखन आणि कचऱ्यातून कला अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपली कल्पकता आणि कलागुण सादर केले.

प्लास्टिकचा वापर टाळण्याचा संदेश समाजापर्यंत पोहोचावा, यासाठी घोषवाक्य लिहिलेल्या कापडी पिशव्यांचे प्रत्येक विद्यार्थ्याला वाटप करण्यात आले. तसेच स्पर्धांमध्ये सहभागी विद्यार्थ्यांना आकर्षक बक्षिसे देऊन प्रोत्साहित करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता, पर्यावरण रक्षण आणि कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन याविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत होत आहे.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी अर्चना माने, निकिता म्हात्रे, रवी ओंकार यांच्यासह संबंधित शाळांतील सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी मोलाचे योगदान दिले.

एटीएम मशीनमधून चोरी

नवीन पनवेल : एटीएम मशीनमधून १६ लाख १८ हजार रुपयांची चोरी केल्याप्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तळोजा एमआयडीसी येथे चालू असलेल्या एसबीआय बँकेच्या एटीएम मशीनच्या रूम मध्ये एक अनोळखी गेला. त्याने तोंडाला पूर्णपणे झाकलेले होते. त्याने त्याच्यासोबत आणलेल्या स्प्रेने सीसीटीव्ही कॅमेरॉवर काळ्या रंगाचा स्प्रे मारला आणि एटीएम मशीनच्या कॅश डिस्पेन्सर मधून १६ लाख १८ हजार ८०० रुपयांची चोरी केली.

कमी पावसामुळे पाणीपातळीत घट

। कोर्लई । प्रतिनिधी ।

मुरुड तालुक्यात यावर्षी पाऊस कमी पडल्याने आगामी काळात पाणीटंचाई जाणवण्याची शक्यता आहे. नद्या,तलाव आणि विहिरींमधील तसेच धरणातील पाणीसाठा कमी होत असल्याने ग्रामपंचायतींना आतापासूनच पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करावे लागणार आहे. तालुक्यात यंदा सुमारे २३८० मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून, दरवर्षी संरासरी साडेतीन ते चार हजार मिलिमीटर पाऊस पडतो. पावसाने महिनाभरापासून दडी मारल्याने पाणीसाठ्यावर परिणाम झाला आहे. ऑक्टोबरमधील



वाढत्या उष्णतेमुळेही पाण्याची मागणी वाढत आहे. दुसरीकडे, भातशेतीतील दाण्यांच्या वाढीसाठी शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. काही ठिकाणी भात कापणी झाली तर काही ठिकाणी उभी पिके करपून जात असल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. ग्रामीण भागातील अनेक गावांना जलजीवन मिशन, जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायतींच्या माध्यमातून मोटारी पाणीपुरवठा केला जातो. मात्र, काही ठिकाणी पाण्याची नासाडी होत असून, सार्वजनिक नळांमधून पाणी रस्त्यावर वाहून जाते तसेच पाणीपुरवठ्याच्या पाइपलाइनला विद्युत लावल्यामुळे काही घरांना अधिक पाणी मिळते, तर इतर घरांना अपुरा पुरवठा होतो. परिणामी, गावातील सर्व कुटुंबांना पुरेसे पाणी मिळण्यात अडचणी निर्माण होतात. संभाव्य पाणीटंचाई टाळण्यासाठी ग्रामपंचायतींनी पाण्याचा अपव्यय रोखणे, तसेच उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे.

साप्ताहिक राशिभविष्य दि. २५ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर २०२६

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

नवीन वस्तूंची खरेदी कराल

मेष : राशीधारकांना या सप्ताहाचे ग्रहमान पाहता या साप्ताहात बहुतांशी आपली वृत्ती न्यायाने युक्त असेल. कुटुंबियांशी आनंदात वेळ घालवू शकाल. आपण कौटुंबिक बाबींकडे विशेष लक्ष द्याल. कुटुंबियांशी महत्वाची चर्चा करू शकाल. घर सजावटीसाठी नवीन वस्तूंची खरेदी सुद्धा कराल. आपण जे काही कार्य कराल त्यात यशस्वी झालात तरी सुद्धा आपला उत्साह मंदावणार नाही याची काळजी घ्यावी. स्त्रियांकडून लाभ होण्याची शक्यता आहे. धार्मिक प्रवासाचे आयोजन करू शकाल. व्यापार-व्यवसायात अपेक्षित यश मिळू शकेल. प्राप्तीत वाढ होईल. कामाचा ढीग बघून न घाबरता नियोजनपूर्वक मार्गक्रमण करून निर्धारित वेळेत कामे पूर्ण करण्यासाठी आपण प्रेरित व्हाल. हौसमौज, मनोरंजन प्रवृत्ती यात वेळ घालवू शकाल. सामाजिक कार्यानिमित्त बाहेरगावी जावे लागण्याची शक्यता आहे. **महिलांना :** थोड्याफार समस्या आल्या तरी विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. संसर्गजन्य आजारा पासून तब्बेत सांभाळा **शुभ दिनांक :** २५,२६.

रागावर नियंत्रण ठेवा

वृषभ : राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता मित्र व कुटुंबियांच्या सहवासात अत्यंत आनंदात वेळ घालवू शकाल. आपल्या प्रतिष्ठेत, लोकप्रियतेत व समृद्धीत वृद्धी होईल. आपल्या बुद्धिचातुर्याने नोकरीत लाभ होण्याची शक्यता आहे. व्यावसायिक आघाडीवर आपली स्थिती, पद व प्रतिष्ठा प्रबळ करण्यावर आपण लक्ष केंद्रित कराल. आपणास रागावर नियंत्रण ठेवण्याचा विशेष सल्ला देण्यात येत आहे. कोणतेही कार्य किंवा संबंध बिघडण्यास हा राग कारणीभूत होऊ शकेल. भागीदारी कार्यात भागीदारा कडून दगा-फटका होणार नाही याची काळजी घ्यावी. भागीदारीत नवीन कार्याचा प्रारंभ करू नका. नवीन करार करण्यात सुद्धा काळजी घ्यावी. पूर्वार्धात विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढू शकेल. हा आठवडा स्पर्धात्मक परीक्षेची किंवा व्यावसायिक अभ्यासाशी संबंधित प्रवेश परीक्षेची पूर्व तयारी करण्यास अनुकूल आहे. **महिलांना :** महिलांना धनलाभासाठी हा काळ उत्तम असून त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. नविन ओळख फायदा देणारी ठरणार आहे. विशेषतः मोसमी आजारांपासून सावध राहा. **शुभ दिनांक :** २७,२८.

वादाचे प्रसंग टाळावे

मिथुन : राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता मागील काही दिवसांपासून आपण स्वतःच्या व्यक्तीगत समस्या, आरोग्य किंवा आत्मविश्वासाच्या अभावाने त्रस्त होता त्या या आठवड्यात संपुष्टात येतील. आता आपण नवीन उर्जेसह नव्याने सुरुवात करण्यास उत्साहित व्हाल. आता कामाकडे अधिक लक्ष देऊ शकाल. अंगावर पडलेली कामे आपण पटापट पूर्ण केल्याने आपल्या कार्यक्षमतेत सुद्धा वाढ होईल. ज्यांचा दीर्घकालीन लाभ होऊ शकेल अशा नवीन लोकांच्या संपर्कात आपण याल. काही ग्रहांचे भ्रमण आपणास काहीसे अनुकूल होईल. आपणास गुंतवणूक करण्याची इच्छा होईल. कदाचित आपण शेअर्स, लॉटरीत आपले नशीब अजमावून बघा. गुंतवणूक करताना नेहमी दीर्घकालीन कालावधीसाठी गुतवणूक करावी. शासनाशी संबंधित एखादा प्रकल्प करण्याची इच्छा होईल. कठोर परिश्रमास काहीही पर्याय नाही हे लक्षात ठेवावे. हा कालावधी विद्यार्थ्यांसाठी उत्तम आहे. **महिलांना :** वादाचे प्रसंग टाळावेत. आपल्या रागावर नियंत्रण ठेवून शांतता बाळगल्यास आपण सर्व बाबतीत अग्रेसर राहू शकाल. **शुभ दिनांक :** २९,३०.

जुन्या मित्रांची भेट होईल

कर्क : राशीधारकास या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण या सप्ताहात सुरुवाती पासूनच आपण व्यावसायिक आघाडीवर अधिक सक्रिय व्हाल. परंतु कोणताही निर्णय घेताना किंवा जेथे इतरांसह काम करावयाचे असेल तेथे विचारपूर्वक वाटचाल करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. एखादा करार करावयाचा असल्यास विलंब किंवा अडथळे येण्याची शक्यता सुद्धा नाकारता येत नाही. व्यवसायात आपण नवीन विचारसरणीची अंमल बजावणी कराल. कर्मचाऱ्यांशी आपले संबंध सामान्यच राहतील. या साप्ताहाच्या पूर्वार्धात आपण कुटुंबियांसह एखाद्या प्रवासास किंवा सामाजिक संमेलनास जाण्याची शक्यता आहे. दीर्घ कालावधी नंतर जुन्या मित्रांची भेट होईल. वडीलधाऱ्या व्यक्ती तसेच मित्रांपासून काही लाभ होईल. तसेच सुखद क्षणांचा अनुभव घेता येईल. **महिलांना :** वैवाहिक जीवनातील संबंधात स्थैर्य जाणवेल. कदाचित संबंधात उत्साह वाढविण्यासाठी आपणास प्रयत्न करावे लागतील. आपली अस्मिता शुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घेतल्यास आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. **शुभदिनांक :** २५,२७.

आर्थिक व्यवहारामुळे फायदा होईल

सिंह : राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता या कालावधीत आपण भिन्नलिंगी संबंध, वैवाहिक जीवन, कौटुंबिक व आर्थिक बाबींकडे अधिक लक्ष द्याल. वैवाहिक जोडीदार आपल्यावर प्रेमाचा वर्षाव करेल. आपण प्रत्येक कार्य दृढ आत्मविश्वास व मनोबलाच्या जोरावर यशस्वीपणे पूर्ण कराल. पिता किंवा पैतृक संपत्तीपासून लाभ होईल. शासनाकडून किंवा त्यांच्याशी केलेल्या आर्थिक व्यवहारामुळे फायदा होईल. कामात स्पर्धेस सामोरे जावे लागले. आपल्या कर्तव्यनिष्ठेमुळे आपण त्यात यशस्वी व्हाल. विद्यार्थ्यांना अभ्यासात चांगली कामगिरी होण्यासाठी नियोजनपूर्वक अभ्यास करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. अडगळीच्या वस्तूंमुळे नकारात्मक ऊर्जा तयार होत असल्याने अभ्यासाच्या खोलीत कोणतीही अडगळ ठेवू नये. घरात सुख-शांती नांदावी म्हणून कोणतेही कार्य किंवा चर्चा करताना कोणाचा गैरसमज होणार नाही याची काळजी घ्यावी. **महिलांना :** आपण बोलण्यावर नियंत्रण ठेवून कृतीवर भर दिल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. नोकरदारांना दिलासा मिळेल. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. **शुभ दिनांक :** २८,३१.

आपले मन स्थिर ठेवा

कन्या : राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण नोकरी-व्यवसायाच्या ठिकाणी वरिष्ठ व सहकाऱ्यांच्या मदतीने लहान मोठी प्रगतीची शिखरे सहज सर करू शकाल. हा कालावधी व्यापाऱ्यांसाठी उत्तम आहे. या दिवसांत नवीन लोकांशी भागीदारी व्यवसाय सुरु करण्याची किंवा त्यांच्या मार्गदर्शनाखाली किंवा अन्य प्रकारे सहकार्य करून प्राप्तीत वाढ होऊ शकेल अशा एखाद्या प्रवृत्तीत आपण सहभागी होऊ शकाल. व्यापाऱ्यांना प्राप्तीत वाढ होण्याची, सध्याच्या व्यवसायाचा विस्तार होण्याची किंवा वसुली होण्याची दाट शक्यता आहे. आपले वडिलांशी संबंध सुधारतील. संततीच्या सहवासात वेळ घालवू शकाल. मात्र, त्यांच्याशी संबंधित प्रवृत्तीत किंवा कार्यात थोडा विलंब होण्याच्या शक्यतेस नाकारू शकत नाही. सामाजिक, आर्थिक व कौटुंबिक आघाडीवर लाभ होण्याचे संकेत आहेत. **महिलांना :** आपले मन स्थिर ठेवा, वाहात जाऊ नका. अनेक विचारापासून लांब रहा. नको त्या विचारात अडकू नका. तब्बेत ठीक वाटत नसेल तर प्रवास टाळा, मित्र, मैत्रिणी खुशखबर देतील. सप्ताहाच्या मध्यावर धनलाभ संभवतो. **शुभदिनांक :** २९, ३०.

मानसिक बेचैनी सतावेल

तुळ : राशीसाठी या सप्ताहात सुरवातीला विवाहेच्छुकांना योग्य जोडीदार मिळण्याची शक्यता आहे. जोडीदाराची निवड करताना बाह्यरूपा ऐवजी गुणांना प्राधान्य द्यावे. आपले मन रोमँटिक विचारात गढून गेलेले असेल. आपणास समाजात यश-कीर्ती याचा लाभ होईल. आरोग्याच्या बाबतीत शारीरिक व मानसिक बेचैनी सतावेल. संततीच्या आरोग्याची काळजी घ्यावी लागेल. शारीरिक व मानसिक स्वास्थ्याची जपणूक करून आपण सर्व कामे करू शकाल. परिणामतः कामे सुद्धा उत्तम प्रकारे करू शकाल. शरीरास उष्णतेचे विकार किंवा त्वचा विकार होण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांची अभ्यासाशी संबंधित काळजीत वाढ होईल. त्यांना अधिक कष्ट करावे लागतील. उच्च शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना जागरणे सुद्धा करावी लागतील. **महिलांना :** मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. तरीही ग्रहमान पाहता आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. संसर्गजन्य आजारापासून तब्बेत सांभाळा. **शुभ दिनांक :** २५,३०.

वरिष्ठांशी जुळवून घ्या

वृश्चिक : राशीसाठी या सप्ताहात आपण एखाद्या व्यक्तीच्या प्रेमात पडण्याची किंवा प्रियव्यक्ती समक्ष आपल्या प्रेमाचा प्रस्ताव मांडण्याची दाट शक्यता आहे. वैवाहिक जीवनात सुख समाधान प्राप्ती होऊ शकेल. पूर्वार्धात प्रणयी जीवनात अधिकार गाजवण्याची भावना सुद्धा वृद्धिंगत होईल. संसार सांभाळून आध्यात्मिक बाबींकडे सुद्धा आपला कल होईल. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा. गूढ व रहस्यमय विद्येकडे आकर्षित व्हाल. मनन-चिंतन करून आपणास अद्‌भुत अनुभूती होऊ शकेल. आपणास आरोग्याची विशेष काळजी घ्यावी लागेल. एखादा अपघात संभवतो. ह्या महिन्यात आपणास जिभेचे चोचले पुरविण्याची प्रबळ इच्छा होऊन भोजनाच्या अतिशयोक्तीमुळे काही विकार होण्याची शक्यता आहे. कॉलेजमध्ये असलेल्यांचे प्रणयी संबंध खुलून येतील. त्यासाठी विशेषतः अखेरचा कालावधी अधिक अनुकूल आहे. **महिलांना :** प्रकृतीस्वास्थ्य जपा. विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा. आपण एखादा दागिना कराल, लग्न समारंभात धावपळ होईल. दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न करा. **शुभदिनांक :** २६,२९.

तणावमुक्त राहण्याचा प्रयत्न करा

धनु : राशीसाठी या सप्ताहात आपण थोडे अस्वस्थ राहाल, या व्यतिरिक्त उत्तरार्धात उष्णतेचे विकार, बद्धकोष्ठ इत्यादींचा त्रास होऊ शकतो. मोठ्या व्यक्तीचे रागाचे बोलणे मनावर घेऊ नका. घरात एखादी किमती वस्तूची खरेदी होणार आहे. ज्यांची अभ्यासात लक्ष लागत नसल्याची तक्रार असेल त्यांना या सप्ताहात दिलासा मिळेल. प्रणयी जीवनात सुद्धा काही समस्या निर्माण झाल्या असल्या तर शांतपणे चर्चा करून त्यांचे निराकरण करू शकाल. आपल्या मित्र परिवारात भिन्नलिंगी व्यक्तीची वाढ होण्याची शक्यता आहे. विवाहितांच्या जीवनात दीर्घकाळापासून काही तणाव असल्यास त्याचे सुद्धा निराकरण होईल. आरोग्याच्या बाबतीत आपणास काळजी घ्यावी लागेल. भविष्यात मोठे आजारपण येऊ नये म्हणून सामान्य आजाराकडे दुर्लक्ष करू नये. योग्य प्रमाणात झोप घेऊन तसेच योगासन, ध्यान-धारणा आदी प्रवृत्तीत मन रमवून आपण तणावमुक्त होऊ शकाल. **महिलांना :** वादाचे प्रसंग टाळावेत. आपल्या रागावर नियंत्रण ठेवून शांतता बाळगल्यास आपण सर्व बाबतीत अग्रेसर राहू शकाल. **शुभ दिनांक :** २७,२८.

अनावश्यक खर्च टाळा

मकर : हा साप्ताह मकरराशीसाठी आपले ग्रहमान पाहता विवाहेच्छुकांना जोडीदाराची निवड करताना काळजी घेण्याचा सल्ला देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना सध्या अतिरिक्त कष्ट करण्याची तयारी ठेवावी लागेल. तसेच अधून-मधून इतरांकडून मार्गदर्शन घेण्याची सुद्धा त्यांना गरज भासेल. या कालावधीत आपण जर आहारातील अतिशयोक्ती टाळलीत तरच आरोग्य चांगले राहू शकेल. उत्तरार्धात कफ विकार होण्याच्या शक्यतेमुळे बदलत्या ऋतूत आपणास काळजी घ्यावी लागेल.आपली माहेरची माणसे घरी येतील त्यांची ऊठबस करावी लागेल. कामात असताना तब्बेतिकडे दुर्लक्ष करू नका. आपण नोकरीत सहकाऱ्यांचे सहकार्य मिळू शकेल. व्यापार-व्यवसायाचा विस्तार करण्याच्या बाबतीत अधिक विचार करत बसल्यास हाती आलेली संधी गमावून बसाल. उत्तरार्धात काहीतरी नवीन करण्याचे धाडस वाढू शकते. आहाराकडे दुर्लक्ष केल्यास प्रकृतीस त्रास होऊ शकतो. घरातील अनावश्यक खर्चाला आळा घाला त्यामुळे मनावर ताण येणार नाही. **महिलांना :** घरातील वातावरण आनंदी राहील, प्रवासात काळजी घ्या. वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्या. आपल्या ध्येयासाठी प्रयत्नशील राहा. **शुभदिनांक :** २५,२७.

मनातून नकारात्मक विचार काढा

कुंभ : राशी या सप्ताहातील ग्रहमान पाहता कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. नको त्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका. मित्रांकडून लाभ होईल तसेच त्यांच्यासाठी खर्च करावा लागेल. विवाहेच्छुकांना योग्य जोडीदार मिळण्याची शक्यता आहे. विदेशाशी व्यापार करणाऱ्यांना किंवा विदेशी संस्थेत काम करणाऱ्यांना अतिरिक्त प्राप्ती होईल. या महिन्यात शारीरिक व मानसिकदृष्ट्या आपण ताजेपणा व प्रसन्नतेचा अनुभव घ्याल. कुटुंबीय व मित्रांच्या सहवासात स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घेण्याचा आनंद उपभोगू शकाल. मनातून नकारात्मक विचार काढून टाकल्यास आपला आनंद द्विगुणित होऊ शकेल. विद्यार्थ्यांनी मित्रांबरोबर फिरणे कमी करून अभ्यासाकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. या पूर्वी मित्रांशी मैत्रिणी सोबत जर काही कारणांनी तणाव निर्माण झाला असला तर तो ह्या साप्ताहात निवळेल. **महिलांना :** आपण प्रत्येक बाबतीत नम्रतेचे धोरण स्वीकारल्यास हाती घेतलेल्या कार्यात यश मिळू शकेल. आपल्या आवडीच्या गोष्टी करण्यात आनंद घेता येईल. दूरच्या आप्तेष्टांशी वार्तालाप होण्याची शक्यता आहे. **शुभ दिनांक :** २६,२९.

दुसऱ्यांवर अवलंबून राहू नका

मीन : राशीसाठी आपले ग्रहमान पाहता या सप्ताहात सुरुवातीस आपल्यातील संवेदनशीलता वाढलेली असेल. कामाच्या भारामुळे मानसिक थकवा जाणवेल. नोकरी-व्यवसायाच्या ठिकाणी वरिष्ठांची व सहकाऱ्यांची मानसिकता सहकार्याची न राहिल्यामुळे आपणास नैराश्य येईल. वडिलांना त्रास होईल. आपल्या घरघूती संबंधात व कामात विचारपूर्वक वाटचाल करावी व जर शक्य असेल तर कोणत्याही प्रकारचे वाद टाळावे. पैतृक संपत्ती किंवा वडिलांकडून होणाऱ्या प्राप्तीत कपात होऊ शकते. असे झाले तरी निराश होऊ नका. कठीण काळा नंतर चांगल्या परिस्थितीचा अनुभव घेता येईल. उत्तरार्धात शारीरिक व मानसिक तजेला व स्फूर्ती जाणवेल. नवीन कार्याच्या शुभारंभासाठी हा सप्ताह अनुकूल आहे. व्यापारात विस्ताराचा किंवा चांगल्या पगाराच्या नोकरीचा गंभीरतेने विचार करू शकाल. **महिलांना :** दुसऱ्यांवर अवलंबून न राहता आपल्या आत्मविश्वासाने स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. **शुभ दिनांक :**२८,३०.

जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीद्वारे असे कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी श्री आदित्य सुरेश मोरे व श्री. किरण गजानन पळसकर, यांचे मालकीची मौजे अंत्राट तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील नमूद केलेली शेतजमिन मिळकत त्यांचेकडून कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याची ठरविलेली असून, सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मौजे अंत्राट तर्फे वरेडी, तालुका कर्जत, जिल्हा रायगड, येथील मिळकतीचे वर्णन

सर्वे नं	हिस्सा नं	क्षेत्र हे.आर.प्र	आकार
१०५	६	०.११.०	०.०६

तरी वरील मिळकतीवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध साठेकरार, बयाणापावती, गहाणखत, दान, बक्षीस, भाडेपट्टा, बोजा, जप्ती, कुळवहिवाट, इजमेंट, मृत्यूपत्रांकित, चार्ज लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास संबंधितांनी हि नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्या पत्यावर सकृतदर्शनी पुराव्यासह आपली लेखी हरकत रजिस्टर पोस्टाने पाठवण्यात यावी, याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचाही कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध नाहीत असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करून आम्ही सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करू. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आम्ही जबाबदार राहणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटिस दिली. सही/-
तारीख - २५.१०.२०२६ **अधिवक्ता अविष्कार अरुण अभंगे**
मो नं - ८०८७३४९०१८
नेमीनाथ हाईट, मुद्रे बुद्रुक, कर्जत रायगड ४१०२०१

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मौजे तांबाटी, ता. खालापूर, जि. रायगड येथील खाली सविस्तर वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी मा. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, पनवेल, यांचे न्यायालयात स्पेशल मुकदमा क्र.३०/२०१६ हा दावा दाखल आहे. सदरहू दावा अंतिम सुनावणीसाठी न्यायप्रविष्ट आहे. सदरहू दावा मिळकतींमध्ये आमचा कायदेशीर हक्क, हितसंबंध व अविभाजीत हिस्सा आहे.

दावा मिळकतींचे वर्णन

अ.क्र.	सर्व्हे नं./हिस्सा नं.	क्षेत्रफळ हे. आर.	आकार रु. पैसे
१.	१०५/१४	०-०५-०	०.०६
२.	१०५/९	०-२८-०	०.३९
३.	१०५/६	०-२१-०	०.३१
४.	१०५/१	०-१९-०	०.२७
५.	१४३/१	०-२८-०	०.८५
६.	८८/६ ब	०-०३-०	०.०८
७.	८८/३ क	०-२५-०	०.७५
८.	८८/३ ब	०-२६-०	३.९५
९.	११०/२	०-७९-९	११.७५

तरी उपरोक्त नमूद दावा मिळकतींबद्दल श्री. गजानन गोपाळ सावंत (मयत) तर्फे वारस श्रीमती. शैला गजानन सावंत व इतर यांचेबरोबर कुणीही खरेदी-विक्रीचा सामंजस्य करार, साठेकरार, वचनचिठ्ठी, बयाणा पावती, फरोक्तखत, खरेदीखत, विकसन करार, विकसनापूर्वीचा सामंजस्य करार, विकसनाचे कुलमुखत्यारपत्र अथवा इतर कोणतेही दस्तऐवज निष्पादित करु नयेत, नोंदणीकृत करु नयेत, त्यांना अंशतः अथवा पूर्ण मोबदला रक्कम अदा करु नये.

वर नमूद केल्याप्रमाणे वर्तणूक न करता कुणीही श्री. गजानन गोपाळ सावंत (मयत) तर्फे वारस श्रीमती शैला गजानन सावंत व इतर यांचेबरोबर खरेदी-विक्रीचा, हस्तांतरणाचा, तबदिलीचा अथवा अन्य कोणताही व्यवहार केल्यास व त्याअनुषंगाने दस्तऐवज निष्पादित केल्यास, त्या तथाकथित व्यवहारांस व त्याअनुषंगाने झालेल्या दस्तऐवजांस लिस पेंडन्सचे कायदेशीर तत्वाची सक्त बाध राहिल. सदरहू व्यवहार व त्या अनुषंगाने झालेले कथित दस्तऐवज बेकायदेशीर व्यर्थ व निरर्थक ठरतील व ते कायद्याने आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत. तसेच कथित व्यवहार व त्या अनुषंगाने झालेले कथित दस्तऐवज रद्द होवून मिळण्याकरिता आम्हाला सर्व संबंधितांचे विरुद्ध दिवाणी न्यायालयात योग्य ती कायदेशीर कारवाई दाखल करावी लागेल व दावा मिळकतीमधील आमचे कायदेशीर हक्क डावलून, आमची फसवणूक करुन कथित व्यवहार व दस्तऐवज केल्याबद्दल सर्व संबंधितांविरुद्ध पोलीसांत फसवणूकीचा गुन्हा दाखल करावा लागेल. सदरहू न्यायालयीन दाव्याचे व फौजदारी कारवाई कामी होणारा सर्व न्यायालयीन खर्च व कागदपत्र, वकील फी इत्यादी खर्च संबंधितांवर राहिल. कृपया याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

ठिकाण:- खालापूर सही
दिनांक २५/१०/२०२६ **श्री. जगन्नाथ दामु सावंत**
रा. तांबाटी, ता. खालापूर, जि. रायगड.
नोटीस देणार

जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, खाली परिशिष्टात वर्णन केलेल्या जमीन मिळकतीमध्ये माझे अशील श्री संजीव पांडुरंग पाटील यांचा मालकीची व ताबेकब्जातील अविभाज्य हिश्याची जमीन मिळकत आहे.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन : जिल्हा रायगड, तालुका पेण येथील गाव मौजे व तलाठी सजा बोरगाव हद्दीतील भूमापन क्र. व उपविभाग २५७ यासी एकूण क्षेत्र १३-२८-०० हे. आर. आकार १३.९८ रु. पैसे येणेप्रमाणे जमीन मिळकती मधील श्री संजीव पांडुरंग पाटील यांच्या अविभाज्य हिश्श्याची जमीन मिळकत ही या नोटीसचा विषय असून या जाहीर नोटीस करता तिचा उल्लेख पुढे ''सदर जमीन मिळकत'' असा केला आहे.

सदर जमीन मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर मालकी हक्कात नोंद दाखल असल्याचा गैरफायदा घेऊन सनतकुमार रामदास म्हात्रे व रत्नाकर भालचंद्र ठाकूर यांनी माझ्या अशिलांच्या मालकीच्या व ताबेकब्जातील जमीन मिळकतीवर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्याबाबत माझ्या अशिलांनी संबंधितांवर पोलीस तक्रार दाखल केलेली आहे. तसेच सदर जमीन मिळकती मधील होत असलेल्या अतिक्रमणाबाबत व सदर मिळकतीच्या हद्दी निश्चितीबाबत माझ्या अशिलांनी दिवाणी व फौजदारी न्यायालयीन कारवाई सुरु केलेली आहे. त्यामुळे यापुढे कोणीही सदर मिळकती पैकी कोणतेही क्षेत्र खरेदी करू नये. त्याकरिता प्रस्तुतची जाहीर नोटीस माझ्या अशिलांनी त्यांच्या मालकीच्या व ताबेकब्जातील जमीन मिळकतीमध्ये प्रसिद्ध केलेली आहे. तरी देखील कोणीही सदर मिळकती मधील कोणतेही क्षेत्र खरेदी केल्यास व त्याबाबत हद्द निश्चिती किंवा ताबेकब्जाबाबत कोणतीही तक्रार निर्माण झाल्यास त्याची सर्वतोपरी जबाबदारी खरेदीदाराची राहील. याची नोंद घ्यावी.

पेण सही/-
दिनांक : **अॅड. सुरज जनार्दन पाटील**
पत्ता : प्लॉट नं. २, राजहंस बंगला,
लोकमान्य हाउसिंग सोसायटी, पेण,
ता. पेण, जि. रायगड, ४०२१०७
मो. क्र. ९७६३२९१६४९

जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की मौजे सालपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतींचे विद्यमान मालक परशुराम बाबु मोरे वगैरे ४ यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

मिळकतीचे वर्णन

मौजे. सालपे, ता. कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकत

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पै.)
८१	२	२-७५-४० पैकी ०-६०-०० इतके विकत दिलेले क्षेत्र २-७५-४०	१२-००

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधन कारक राहाणार नाही.

कर्जत खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट.
ता. २४/१०/२०२६ **ॲड. समीर हरिश्चंद्र लाड.**
मो.नं. ९९२१७२२२०० फ्लॅट नं. ३०१, राजलक्ष्मी अपार्टमेंट,
विठ्ठल नगर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड

जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल आवेश उमर जुवारी यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालक बागवान नासीर हुसेन अहमद भाई यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

अ. मौजे. माले, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू. पै.)
४	६	१-३३-०० पो.ख.०-२०-००	०-८१

ब. मौजे. माले, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे. आर.)	आकार (रू.पै.)
१५	११/ब	०-२७-००	०-१६
यापैकी रस्त्याकरीता ०-०३-५० हे. आर. क्षेत्राची मिळकत दिली.			
१५	१४	०-८९-००	०-५२
यापैकी रस्त्याकरीता ०-०५-५० हे. आर. क्षेत्राची मिळकत दिली.			

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल कराराचा अथवा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि. २५/१०/२०२६. **ॲड. नरेश रामदास आहीर.**
पत्ता - शॉप नं. १२, शिवगंगा
अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी, नेरळ
ता.कर्जत, जि.रायगड- ४१०१०१.
मो.- ९३२५०६००३७/९०११२९२९८७.

जाहिर नोटिस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालकाकडुन कायम खरेदी करणार असुन तशी बोलणी आमचे अशिल व - मिळकतीचे मालक मध्ये सुरू आहे.

मिळकतीचे वर्णन

मालकाचे नाव : १) राजेश तुलसीदास कदम
मौजे : जावळी, ता : माणगांव, जि : रायगड.

मौजे	गट. नं	भो.ग.वर्ग	क्षेत्र (हे. आर)	आकार (रू. पै)
जावळी	६६/३८	१	०.१३.००	०.०६
जावळी	६६/३७	१	०.१७.००	०.१२
जावळी	६६/४४	१	०.१०.००	०.०६
जावळी	६६/४७	१	०.३८.००	०.२६
जावळी	८२	१	०.३१.६०	०.७५

तिचे कोणतेही भागावर कोणाचेही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विकीचाकरार, वारसा, हक्क, लिज, चार्ज, पोटगी, वहिवाट, (जाण्या येण्याचा मार्ग), इजमेंटरी या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध असल्यास अथवा कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीची विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी हरकत अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ (एकवीस) दिवसांच्या आत सही करणार यांचेकडे लेखी स्वरूपात योग्य ते कागदपत्रे पुराव्या सहीत सादर करावे.

मुदतीत कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहित धरून आमचे आशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन कोणाचीही तक्रार हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही हे सर्वांस कळावे.

माणगांव सही/-
दिनांक :- २४/१०/२०२६ **(ॲड. पी. एम. जाधव)**
बी.कॉम, एल.एल.बी.
तळाशेत (इंदापूर), लक्ष्मी निवास,
ता. माणगाव, जि. रायगड
मो.नं. ७२१९५४६०९७

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिल सौ. आशा अशोक पाटील राहणार-समर्थ फार्म हाऊस जवळ, पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीची व खुद्द ताबेकब्जा वहिवाटीतील खालील वर्णन केलेली मिळकत असून सदर मिळकतीबाबत आमचे अशिलांनी श्रीमती सुनिता बाळकृष्ण खामकर वगैरे यांचे विरुद्ध मा.जिल्हा न्यायाधिश सो. अलिबाग यांच्याकोर्टात नियमित दिवाणी अपिल क्र.३४/२०२५ चे अपिल दाखल केलेले आहे. श्रीमती सुनिता बाळकृष्ण खामकर तर्फे अखत्यारी श्री. अजय यशवंत सावंत हे उत्तरार्थी अखत्यारी आमचे अशिलांचे हक्क डावलून आमचे अशिलांना फसवून आमचे अशिलांचे अपरोक्ष खालील नमुद केलेली मिळकत ही इतर ईसमांना विकण्याच्या तयारीत आहे.

अपिल मिळकतीचे वर्णन

मौजे	सर्व्हे नं.	क्षेत्र (हे.आर)	आकार (रु.पैसे)
पोयनाड, तालुका अलिबाग	७९/३	०-५३-६ पो.ख. ०-०१-५ एकूण ०-५५-१	१२-९४

तरी मिळकतीसंदर्भात सदर अपिलातील वर नमूद केल्याप्रमाणे उत्तरार्थी श्रीमती सुनिता बाळकृष्ण खामकर तर्फे अखत्यारी श्री.अजय यशवंत सावंत हे अखत्यारी आमचे अशिलांचे हक्क डावलून आमचे अशिलांना फसवून आमचे अशिलांचे अपरोक्ष सदर मिळकत त्रयस्थ इसमांस विकणेचे तयारीत आहे तसा कुठलाही व्यवहार सदरचे अपिल प्रलंबित असताना आमचे अशिलांचे अपरोक्ष केल्यास व आमचे अशिलांचे हक्कास कमीपणा येईल असा व्यवहार केल्यास त्या व्यवहारास आमच्या अशिलांची सक्त हरकत असेल व तसे केल्यास सदर व्यक्ती सदर मिळकतीचे प्रामाणिक खरेदीदार (Bonafide Purchaser for Value Without notice) होणार नाहीत. तसेच अशा प्रकारचा कोणताही व्यवहार आमच्या अशिलांवर बंधनकारक असणार नाही. तरी कोणत्याही प्रकारचा खरेदी-विक्रीचा व्यवहार केल्यास भविष्यातील कोर्टकारवाईस संबंधीत इसम जबाबदार राहतील हे कळावे.

अलिबाग, सही/-
दि. २४-१०-२०२६. **ॲड.आर.बी.कोसमकर**
चिरायु बिल्डींग, राम मंदिर शेजारी
ब्राम्हण आळी अलिबाग

CHANGE IN NAME

I, Aishvarya Rajesh Shinde,residing at Sarita Sadan J.S.M College Road Alibag Res.Tal-Alibag Dist-Raigad 402201. Maharashtra, hereby declare that I am changing/ correcting my name from "Aishvarya Rajesh Shinde "to" Aishwarya Rajesh Shinde" Reg no (M-26371339).

Henceforth, I shall be known and idenitified as "Aishwarya Rajesh Shinde" for all purposes and in all official records.

Both the names Aishvarya Rajesh Shinde and Aishwarya Rajesh Shinde refer to one and the same person.

Date :23/10/2026 Sd/-
Place: alibag **New Name**
Aishwarya Rajesh Shinde

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

मौजे मानकिवली, ता. कर्जत, जि. रायगड.

मालकाचे नाव	स. नं./ हि. नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रू. पैसे.
श्री. राणा डी. रामचंदानी व इतर	१/१/ड	००-१९-००	०-२०
	५/२	००-०९-००	०-३०
	५/३	००-०९-६०	०-५५
	६/१	००-१०-१०	१-६२
	११/१/३	खाता नं. २३ मधील विकत दिलेले क्षेत्र ००-१२-६० हे.आर.पॉ.	१-००

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. २४/१०/२०२६ **ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे**
पत्ता - बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

ग्रामपंचायत नेरळ

ता.कर्जत, जिल्हा.रायगड
खुली ई - निविदा सूचना

ग्रामपंचायत नेरळ कडील सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील १५% समाजकल्याण निधीमधून एकूण १५ मागासवर्गीय वस्त्यांसाठी सामूहिक जेवणावळीचे भांडे खरेदी योजनेसाठी खालील तक्त्यात नमूद केलेल्या साहित्याचा पुरवठा करण्याकरिता योग्य व पात्र पुरवठादारांकडून ऑनलाईन पद्धतीने ई-निविदा (E-Tender) मागवण्यात येत आहेत.

अ.क्र.	निविदा तपशील/बाबी	दिनांक व वेळ
१	निविदा प्रसिद्धी व डाऊनलोड कालावधी	२३/१०/२०२६ (०४:००PM) ते ३०/१०/२०२६(०५:०० PM)
२	निविदा ऑनलाईन भरण्याचा कालावधी	२३/१०/२०२६ (०४:००PM) ते ३०/१०/२०२६(०५:०० PM)
३	ऑनलाईन निविदा उघडण्याचा दिनांक	०२/११/२०२६ (१०:०० पासून)
४	ई-निविदा संकेतस्थळ	http://www.mahatenders.gov.in

टीप: निविदेचे सर्व अर्ज, फॉर्म, अटी-शर्ती व सविस्तर अटी व शर्तीयुक्त निविदा छायाप्रत http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे अथवा रद्द करण्याचे सर्व अधिकार ग्रामपंचायतीकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

सही/-
प्रशासक
ग्रामपंचायत नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड

जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे वाघोलीवाडी ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मित्रल प्रकाश दिलेहर सिंह पस्ताला यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट क्रमांक व उपविभाग	क्षेत्र हे.आर	आकार रु.पैसे
वाघोलीवाडी ता.अलिबाग जि. रायगड	२१७	०.२७.१० पो.ख ०.०१.८० एकूण ०.२८.९०	४.८७

तरी वरील मिळकतींच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करारमदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध व बिनजोखमी आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतींचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक २४/१०/२०२६ **ॲड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु. नांदाईपाडा, पो.झिराड,
ता.अलिबाग, जि.रायगड.
मो.नं. ९८२२१८६७४०

जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल गुलाम हुसेन अब्दुल मुत्तालीब मुल्ला यांनी त्यांच्या मालकीच्या मौजे कोटिंबे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन मिळकती श्री. दिपक किसन जवळकर व श्री. रजत दिपक जवळकर रा. जवळकर नगर, पिंपळे गुरव, पुणे यांना कायम स्वरूपी खरेदीखताने विक्री करण्याचे ठरविले होते.

मौजे कोटिंबे, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत

अ.क्र.	सर्व्हे नं.	क्षेत्र	आकार
१.	९३/२	००-३९-२० पो.ख.००-०३-३० एकुण ००-४२-५०	३-४५
२.	९३/५/अ	००-०९-४० पो.ख.००-००-५० एकुण ००-०९-९०	०-१०

येणेप्रमाणे तदंगभुत हक्क हितसंबंध सुध्दा.

तरी वरील नमुद मिळकती श्री. दिपक किसन जवळकर व श्री. रजत दिपक जवळकर यांना खरेदीखताने विक्री करणार असलेबाबत दिनांक २७/१२/२०२५ रोजी दैनिक कृषीवल मधून जाहिर नोटीस प्रसिद्ध झालेली होती. सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध झालेनंतर सदर मिळकतींचा विक्रीचा व्यवहार २१ दिवसांत पुर्ण करणेची जबाबदारी श्री. दिपक किसन जवळकर व श्री. रजत दिपक जवळकर यांची असतानाही आजतागायत श्री. दिपक किसन जवळकर व श्री. रजत दिपक जवळकर यांनी सदर विक्री व्यवहार आजतागायत पुर्ण केलेला नाही. तसेच सदर जाहिर नोटीसीनंतर जुलै २०२६ मध्ये श्री. दिपक किसन जवळकर व श्री. रजत दिपक जवळकर यांनी आमचे अशिलांसोबत सदर मिळकतीसंदर्भात बयाणा पावती केलेली होती. सदर बयाणा पावतीमध्ये सदर खरेदीखताचा व्यवहार हा ३ महिन्यात पुर्ण करणेची जबाबदारी श्री. दिपक किसन जवळकर व श्री. रजत दिपक जवळकर यांची होती परंतु त्यांच्या वैयक्तिक, आर्थिक व तांत्रिक अडचणींमुळे सदरचा व्यवहार पुर्ण होऊ शकलेला नाही. तरी वरील नमुद मिळकतींसंदर्भात दिनांक २७/१२/२०२५ रोजी झालेले दैनिक कृषीवल मधील जाहिर नोटीस व बयाणा पावती व बयाणा पावतीचे अनुषंगाने करण्यात येणारा खरेदीखताचा व्यवहार मुदतीत आजतागायत पुर्ण न केल्यामुळे संपुष्टात आलेला आहे. हे या नोटीसीने तमाम जनतेस स्पष्ट होत आहे तरीही नमुद मिळकतीच्या व्यवहाराबाबत श्री. दिपक किसन जवळकर व श्री. रजत दिपक जवळकर यांची कसलीही कोणतीही हरकत आलेस ती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

ठिकाण- कर्जत सही/-
ता.२५/१०/२०२६ **गुलाम हुसेन अब्दुल मुत्तालीब मुल्ला**
ॲड. योजना अनिल शिंदे उर्फ
ॲड. सौ. योजना मनिष सुर्वे
रा. श्रीनाथ अपार्टमेंट, तिसरा मजला,
फ्लॅट नं. ३०२, मुद्रे - बुद्रुक,
भैरवनाथ मंदीर समोर, कचेरी रोड,
कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं.८६२४९३०९२५.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

RAIGAD DISTRICT CENTRAL CO-OPERATIVE BANK LTD ALIBAG
(Form Z)

Sub Rule 1 (d-1) of rule 107 of MCS Rules 1961
Possession Notice For Immovable Property

Whereas the undersigned being the recovery officer of RAIGAD DISTRICT CENTRAL CO-OPERATIVE BANK LTD ALIBAG DIST-RAIGAD under the Maharashtra Co-op Society Rule 1961 Issued demand notice date 03/06/2026 calling upon the judgment debtor SURYAKANT YASHWANT KHOT At Shribag Ni.2, Po Tal Alibag, Dist. Raigad to repay the amount mentioned in the notice being Rs. 77135/- (Rupees. Seventy Seven Thousand One Hundred Thirty Five Only) with interest within 15 days from the receipt of the said notice and the judgment debtor failed to repay the undersigned had issued a notice for attachment dated 20/06/2026 and attached the property described herein below.

The judgment debtor having failed to repay the amount notice is hereby given on the judgment debtor and the public in general that the undersigned has decided to take possession of the property described here below in exercise of powers conferred on him under rule 107(11)(d-1) of the Maharashtra Co-op Society Rules 1961.

The judgment debtor particular and the public in general is hereby cautioned not to deal with the property described herein and any dealings with the said property will be subject to the change of RAIGAD DISTRICT CENTRAL CO-OPERATIVE BANK LTD ALIBAG DIST-RAIGAD for an amount of Rs. 77135/- (Rupees. Seventy Seven Thousand One Hundred Thirty Five Only) and interest thereon.

Description of the Immovable Property

The Land measuring 50 Sq Mt. at at plot No. E-108, in Shribag Area Development scheme No.2, located within the limits of Mauje Alibag Muncipal Council. A House built upon it with a constructed house No. Z1ASB22611 (Old House no. 50 B) area of 293.63. sq. ft in the name of Suryakant Yashwant Khot

The Z Notice is given to the borrower and guarantor by Register post on 24/07/2026 with signature and office stamp

Sign/-
Mr. K.K. Raut
Special Recovery Officer

RAIGAD DISTRICT CENTRAL CO-OPERATIVE BANK LTD ALIBAG
(Form Z)

Sub Rule 1 (d-1) of rule 107 of MCS Rules 1961
Possession Notice For Immovable Property

Whereas the undersigned being the recovery officer of RAIGAD DISTRICT CENTRAL CO-OPERATIVE BANK LTD ALIBAG DIST-RAIGAD under the Maharashtra Co-op Society Rule 1961 Issued demand notice date 03/06/2026 calling upon the judgment debtor SURYAKANT YASHWANT KHOT At Shribag Ni.2, Po Tal Alibag, Dist. Raigad to repay the amount mentioned in the notice being Rs. 491338.58/- (Rupee. Four Lakhs Ninety One Thousand Three Hundred Thirty Eight & Paise Fifty Eight Only) with interest within 15 days from the receipt of the said notice and the judgment debtor failed to repay the undersigned had issued a notice for attachment dated 20/06/2026 and attached the property described herein below.

The judgment debtor having failed to repay the amount notice is hereby given on the judgment debtor and the public in general that the undersigned has decided to take possession of the property described here below in exercise of powers conferred on him under rule 107(11) (d-1) of the Maharashtra Co-op Society Rules 1961.

The judgment debtor particular and the public in general is hereby cautioned not to deal with the property described herein and any dealings with the said property will be subject to the change of RAIGAD DISTRICT CENTRAL CO-OPERATIVE BANK LTD. ALIBAG, DIST-RAIGAD for an amount of Rs. 491338.58/- (Rupee. Four Lakhs Ninety One Thousand Three Hundred Thirty Eight & Paise Fifty Eight Only) and interest thereon.

Description of the Immovable Property

The Land measuring 50 Sq Mt. at at plot No. E-108, in Shribag Area Development scheme No.2, located within the limits of Mauje Alibag Muncipal Council. A House built upon it with a constructed house No. Z1ASB22611 (Old House no. 50 B) area of 293.63. sq. ft in the name of Suryakant Yashwant Khot

The Z Notice is given to the borrower and guarantor by Register post on 24/07/2026 with signature and office stamp.

Sign/-
Mr. K.K. Raut
Special Recovery Officer

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **अलिबागमधील आर्किटेक्चर आणि इंटिरियर डिझायनिंग** ऑफिसकरीता ऑटो कॅड ड्राफ्टसमन हवा आहे. संपर्क : ९७६२७७७९७५
- **नागाव येथील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी** खालील पदांसाठी स्टाफची आवश्यकता आहे : रिसेप्शनिस्ट २ जागा, रेस्टॉरंट कॅप्टन १ जागा, हाऊसकीपर फक्त पुरुष (२ जागा), इंडियन चायनीज कुक १ जागा, मोरी - १ जागा, वेटर - १ जागा. इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत संपर्क साधावा किंवा वर मेसेज करावा. संपर्क क्रमांक: ७५५९१८४६१२
- **प्लंबिंग व पाईपलाईन कामासाठी हेल्पर पाहिजेत.** संपर्क : हजारे एंटरप्रायजेस मारूती नाका, अ



राशीभविष्य

- **मेष :** महत्त्वाची कामं मनासारखी होतील. आर्थिकदृष्ट्या समाधान लाभेल. विद्यार्थ्यांना अनुकूलता राहील.
- **वृषभ :** गृहोपयोगी वस्तुंची खरेदी होईल. यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात प्रगतीला वाव राहील. बाकी चिंता नसावी.
- **मिथुन :** व्यवसायात नवे बदल होतील. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. अनुभवींचा सल्ला कामी येऊ शकेल.
- **कर्क :** उपजत कला-गुणांचा विकास होईल. खर्च वाढला तरी प्राप्तीही तशीच राहील. प्रवास शक्यतो टाळा.
- **सिंह :** अनावश्यक ताण-तणाव निर्माण होईल. मनाविरूध्द घटना संभवतात. आध्यात्मिक प्रगती होईल.
- **कन्या :** आत्मविश्वास वाढवणाऱ्या घटना घडतील. उत्कर्षाच्या संधी लाभतील. मानसिक स्वास्थ लाभेल.
- **तूळ :** भागीदारी व्यवसायात उत्कर्ष होईल. मुलांच्या प्रश्नांबाबत समाधान लाभेल. प्रवास लाभदायक ठरेल.
- **वृश्चिक :** स्थावर, वाहन सौख्य लाभेल. व्यवसायातील अडचणी दूर होतील. ज्येष्ठांनी प्रकृती सांभाळावी.
- **धनु :** परदेश प्रवासाचे बेत ठरतील. मंगल कार्याची बोलणी सफल होतील. प्रक्रिया उद्योगात यश लाभेल.
- **मकर :** अचानक धनलाभ संभवतो. यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात संधी लाभतील. मानसिक स्वास्थ लाभेल.
- **कुंभ :** जुनी येणी वसूल होतील. व्यवसायात प्रगतीच्या नव्या संधी लाभतील. सणाचा उत्तम उत्साह राहील.
- **मीन :** प्रक्रिया उद्योगात नव्या संधी लाभतील. कामासाठी प्रवास लाभदायक ठरेल. बाकी चिंता नसावी.

मनोविज्ञान

सकारात्मक राहा

मानसिक आणि भावनिकदृष्ट्या मजबूत असण्याचा अर्थ असा आहे की, ही तुम्ही सामान्यपणे वागू शकता. कठीण परिस्थितीत भावनिकदृष्ट्या खंबीर असाल तर योग्य काय ते ठरवणे सोपे जाते. दृष्टीकोन योग्य असेल, संवाद स्पष्ट असेल तर तुम्ही हवे ते साध्य करू शकता. त्यामुळे भावनिकदृष्ट्या मजबूत होण्यासाठी तुम्हाला या सवयींवर काम करावे लागेल. ऐकण्यावर विश्वास ठेवू नका-तुम्हाला तिसऱ्या व्यक्तीकडून काही कळले तर त्याच्यावर आंधळेपणाने विश्वास ठेवू नका. ते तुमच्याशी संबंधित असेल तर ज्या व्यक्तीने हे सांगितले त्या व्यक्तीशी समोरासमोर बोला. वेगवेगळ्या गोष्टी मनात ठेवल्याने मनाची स्थिती आणि शांतता बिघडते खेरीज नातीही बिघडतात. स्वसंरक्षणातच झटपट प्रतिक्रिया चांगली असते पण कधीकधी ती नातेसंबंधांमध्ये दुरावण्याचे कारण बनू शकते. त्यामुळे कोणाचा दृष्टिकोन कळत नसेल तर त्यावर वाद घालून तुमचा मूड खराब करण्यापेक्षा थोडेसे हसून निघून गेलेले बरे. लोक काय विचार करतात याची काळजी घेणे थांबवा.

२५ ऑक्टोबर — दिन विशेष

१९८०: शायर साहिर लुधियानवी यांचे निधन.
२००३: विचारवंत आणि तत्त्वज्ञ पांडुरंगशास्त्री आठवले यांचं निधन.
२००९: अभिनेते चित्तरंजन कोल्हटकर यांचं निधन.
२०१२: विनोदी अभिनेते जसपाल भट्टी यांचं निधन.
२०१३: पंतप्रधान कार्यालयाने केंद्रीय अन्वेषण विभागाकडे हिंदाल्को या कंपनीला ओडिशामध्ये खाणवाटप केल्याप्रकरणाची कागदपत्रं सुपुर्द केली.

सर्व्हे

भावना व्यक्त करा

न्यूयॉर्क टाइम्सने विद्यार्थ्यांना प्रश्न विचारुन केलेल्या सर्व्हेनुसार. मित्र-मैत्रिणींना मनातले सांगणे अवघड जातं असं समोर आलं आहे. खरंच, आपल्या भावना व्यक्त करताना असुरक्षित वाटणे ही एक स्थिती असून ती नाहिशी झाली तर आपल्याला नातेसंबंध निर्माण करण्यात आणि ते अधिक घट्ट करण्यात मदत होऊ शकते. परंतु प्रत्येकालाच ते जमतेच असे नाही. विद्यार्थ्यांची सर्वात मोठी भीती ही असते की, त्यांच्या वैयक्तिक गोष्टी शाळेत गप्पांचा विषय बनू शकतील. अशा परिस्थितीत ते त्यांच्या इतर मित्रांना ओझे वाटू शकतात. त्यामुळे ते त्यांचे मन अन्य विद्यार्थ्यांशी शेअर करण्यास कचरतात. मात्र, गोपनीय गोष्टी शेअर केल्याने जवळीक वाढते ही सकारात्मक बाब आहे. मोकळेपणाने बोलल्याने एकटेपणा कमी वाटतो. मित्रांना वैयक्तिक किंवा काहीतरी महत्त्वाचे सांगितले जाते तेव्हा बरेचजण आपल्या मित्र अथवा मैत्रिणीला त्या स्थितीतून, चिंतेतून, समस्येतून बाहेर काढण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतात. म्हणूनच जवळच्या मित्र-मैत्रिणींवर विश्वास ठेवा आणि मन मोकळे करा.

आरोग्यमंत्र

कमी वजनासाठी सॅलड

वजन कमी करण्यासाठी आहारात विविध प्रकारचे बदल केले जातात. आहारामध्ये सॅलडचा क्रमांक वरचा ठेवणं हा यासंदर्भातला एक उपयुक्त बदल आहे. याविषयी...

सॅलड हे विटामिन ए चा परिपूर्ण स्त्रोत मानलं जातं. त्यामुळे विटामीन ए ची कमतरता असणाऱ्यांनी सॅलड जरूर खावं. शक्तिशाली अँटीऑक्सिडेंट्स असल्याने सॅलड रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी मदत करतात. पचन आणि पोटाशी संबंधित विकारांमध्ये सॅलड अत्यंत उपयुक्त मानलं जातं. ब्लडप्रेशरच्या तक्रारींमध्ये सॅलड उपयुक्त ठरतं. त्यामुळे रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते. सॅलडच्या सेवनामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो. कॅन्सरपासून बचाव करण्यामध्ये सॅलडची मोठी भूमिका असते. डिनरच्या आधी सॅलड खाल्ल्याने भरपेट खाणं कमी होतं, परिणामी वजन कमी होतं. सॅलडमधून सर्व जीवनसत्वं मिळतात. त्यामुळे हाडांचं दुखणं कमी होण्यास मदत होतेच शिवाय हाडांना मजबुती मिळते. रक्तवाढीसाठी सॅलड पूरक भूमिका बजावतं. त्यामुळे रक्तक्षय असणाऱ्यांनी सॅलड जरूर खावं. हाडं ठिसूळ असणाऱ्यांसाठी सॅलड हे एक प्रकारचं वरदान आहे. अशा लोकांनी आहारात पालकाचा समावेश करावा. सॅलडमुळे त्वचेचा पोत सुधारण्यास मदत होते. सॅलडमध्ये पाण्याचं प्रमाण भरपूर असल्यामुळे पाण्याची मात्रा भरुन निघते. जीवनसत्वं असल्याने ताजंतवानं वाटतं.



भटकंती

* दोस्तांनो, लाँग ड्राईव्हचं प्लॅनिंग थोडं आधीपासूनच करा. फिरायला जायचं ठिकाण, पोहोचण्यासाठी लागणारा वेळ, राहण्याची व्यवस्था, इतर सामानाची बांधाबांध, जरूरीच्या वस्तू ही सगळी तयारी लवकर करून ठेवा. यामुळे आयत्या वेळी गोंधळ होणार नाही.
* लाँग ड्राईव्हला जाताना तुम्ही गाडी चालवणार असाल तर जाण्याआधीच्या दोन रात्री व्यवस्थित झोप घ्या. प्रवासादरम्यान थकवा आला तर आराम करा. थोडा वेळ झोपा. रात्रीचा प्रवास टाळा. रात्री आठ ते पहाटे पाच या वेळेत शक्यतो प्रवास करू नका.

पंचांग

रविवार, २५ ऑक्टोबर २०२६
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
अश्विन शु. १४ **(कोजागरी पौर्णिमा)**,
चंद्रराशी : मीन,
नक्षत्र : रेवती, योग : हर्षण,
सूर्योदय ६.३८, सूर्यास्त ६.०७

फॉरवर्ड्स

ईमानदारी रखीं हैं हमनें अपनें क़िरदार में...

लोग़ आवारा क़ह सकतें हैं ग़द्दार नहीं...!

करिअरवाटा

स्वमूल्यांकन गरजेचं

यशस्वी आणि कुशल कर्मचारी अशी ख्याती मिळवायची असेल तर कामामधील परफेक्शन महत्त्वाचं ठरतं. कार्यपद्धतीमध्ये थोडासा बदल करून हे परफेक्शन मिळवता येतं. यातली पहिली पायरी म्हणजे विद्यार्थीदशा न सोडणं. जग सतत बदलत असतं, कार्यपद्धती बदलत असते. त्यामुळेच कार्यपद्धतीत सुधारणा घडवून आणण्यासाठी नव्या जगाचा मंत्र शिकून घ्यायला हवा.



प्रगतीतील धोंडे दूर करुन कामाची नवी शैली आत्मसात करायला हवी. 'मीच बरोबर आहे' आणि 'मलाच सगळं कळतं' अशी भावना तुम्हाला प्रवाहातून बाजूला ढकलेल याची जाण ठेवायला हवी. प्रत्येक दिवशी तुमचा स्पर्धक कार्यक्षेत्रात प्रवेश करत असतो. त्याच्याकडे अनुभव नसला तरी प्रगत आणि आधुनिक ज्ञान असतं. तो बाहेरच्या जगाच्या जास्त संपर्कात असतो. वरिष्ठांवर त्याची छाप पडते. म्हणूनच कार्यक्षेत्रामध्ये टिकून रहायचं तर काम चोख करण्याबरोबरच अशा संलग्न मुद्द्यांचाही परामर्श घ्यायला हवा. यासाठी सर्वोत्तम उपाय म्हणजे स्वमूल्यांकन. जगाच्या नजरेतून स्वत:कडे पाहिल्यास आपण किती मागं आहोत याचा अंदाज येतो. ही दरी भरून काढण्याचे अनेक उपाय आहेत. मात्र, सर्वप्रथम त्याकडे सजगतेनं पहायला हवं.

खेचाखेची

दोन कॉपीज

एका साहेबांना ऑफिसचे प्रत्येक काम सेक्रेटरीला सांगायची सवय असल्यामुळे कोणतीही मशिन चालवता येत नव्हतं. एकदा सेक्रेटरी रजेवर होती. मला ते पेपर श्रेडरपुढे उभे दिसले. ते म्हणाले, मला ही मशिन चालवता येत नाही. जरा मदत कर ना. मी त्यांच्या हातातला कागद घेतला, मशिन मध्ये घालून स्टार्ट बटन दाबलं. कागद आत गेलेला बघुन साहेब मला म्हणाले, अरे, हा एक अतिशय महत्वाचा कागद आहे मला याच्या दोन कॉपीज दे.

वेगळं काही

मृतदेहांचं संग्रहालय!

इटलीतल्या सिलसिली या बेटावरच्या पालेर्मो कॅपुचिन संग्रहालयात ममी आणि मृतदेहांचा संग्रह करण्यात आला आहे. इथे आठ हजार मृतदेह आणि १२५२ ममी आहेत. सोळाव्या शतकात ख्रिस्ती भिक्षूकांनी या परिसरात मृतदेह पुरण्याचं तसंच ममी तयार करण्याचं काम सुरू केलं होतं. आज जिथे संग्रहालय आहे. त्याचं रूपांतर संग्रहालयात करण्यात आलं. या मृतदेहांना ममीच्या माध्यमातून सुरक्षित ठेवण्यात आलं. या विचित्र संग्रहालयाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी ख्रिस्ती भिक्षुकांकडेच आहे. यातल्या काही ममी पूर्ण अवस्थेत आहेत तर काहींची अवस्था बिकट झाली आहे.

सौंदर्यसाधना

आपला अंडरटोन ओळखा

सौंदर्यतज्ज्ञ त्वचेच्या अंडरटोननुसार प्रसाधनं निवडण्याचा सल्ला देतात. अंडरटोन अर्थात त्वचेच्या आतल्या स्तराचे तीन प्रकार असतात. कूल, वॉर्म आणि न्यूट्रल. या प्रकारांमधला फरक समजून घेऊ

* त्वचेच्या आतल्या नसा स्पष्ट दिसतात. व्यक्तीगणिक नसांचा रंग बदलतो. निळ्या किंवा जांभळट रंगाच्या नसा असतील तर तुमचा अंडरटोन कूल आहे असं समजावं. उन्हात गेल्यावर राप जाणवत असेल आणि त्वचेवर निळसर छटा दिसत असेल तर ते कूल अंडरटोनचं लक्षण असतं. * नसांचा रंग हिरवट असेल तर अंडरटोन वॉर्म आहे असं समजावं. उन्हात गेल्यानंतर त्वचा काळी पडत असेल पण रापत नसेल तर अंडरटोन वॉर्म असतो. * नसांचा रंग हिरवट निळसर असेल तर ते न्यूट्रल अंडरटोनचं लक्षण समजावं. * मेक अप उत्पादनांवर डब्ल्यू, सी आणि एन अशा खुणा असतात. डब्ल्यूची खूण असणारं उत्पादन वॉर्म अंडरटोनसाठी, सी खूण असणारं कूल अंडरटोनसाठी तर एन खूण असणारं उत्पादन न्यूट्रल अंडरटोनसाठी योग्य असतं. हे पाहून खरेदी अधिक योग्य ठरेल.



सुडोकू १६६

६	१	४	८				७	
५		९		६		८		
२		८	९		७		५	
		६	३					५
८	५						३	७
३					८	४		
	८		७		१	९		२
		२		८		७		३
	६				९	५	१	८


टीप -

* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

सुडोकू १६५ चे उत्तर

७	१	५	९	८	३	२	४	६
३	६	४	५	७	२	१	९	८
९	८	२	४	६	१	३	७	५
८	३	६	७	९	५	४	२	१
४	५	१	२	३	८	९	६	७
२	७	९	६	१	४	८	५	३
५	९	८	१	४	६	७	३	२
६	४	३	८	२	७	५	१	९
१	२	७	३	५	९	६	८	४

शब्दकोडे क्रमांक १६६



आडवे शब्द :-

१) डोळे झाकून भिडू शोधण्याचा मुलांचा एक खेळ
६) स्वत:च्या मर्जीने
१०) संताप
११) दौत
१२) उपस्थित
१३) धोका
१५) हात पुसण्याचे छोटे वस्त्र
१७) दहावी तिथी
१९) परीक्षा घेणारा, तपासनीस
२१) नाजूक
२३) अधिक श्रेष्ठ
२५) सर्व, एकूणएक
२६) निर्नायकी स्थिती
२९) फणसाचा एक प्रकार
३१) सोने
३२) अडचणीत कसातरी चालविलेला संसार
३६) सध्या
३८) संगीतातील ठेका
३९) प्रफुल्लित
४०) जननी
४२) तारण
४३) महामार्ग
४५) अलमारी
४७) गतिमान
४९) ओळ
५०) खाण्यासाठी भाजलेले मांसाचे गोळे
५२) अरण्य
५३) नंतर
५४) आजच्या आधीचा दिवस
५५) धमकी
५७) दाट मैत्री
५८) अंगरखा
५९) उत्सवाचे दिवस
६१) नकला करणारा
६३) वजन
६४) गोव्याची राजधानी
६६) जमीनदार
६८) सिद्ध

उभे शब्द: -

२) देवांचा वैद्य
३) न वापरलेला
४) घोड्याचे बछडे
५) भविष्यकथनाचा एक प्रकार
६) पायापासून डोक्यापर्यंत
७) टपाल
८) रोज, सदोदित
९) तफावत
१३) एखादे जुने दु:ख उकरून काढणे
१४) दानव
१६) फक्त, केवळ
१८) अंगावर येणारा काटा
२०) हात
२१) फार गरम वा थंड नसलेले (पाणी)
२२) आकडा, मांडी
२४) कमळ
२५) चंदनाचे खोड उगाळण्याचे साधन
२६) अवास्तव
२७) उग्र, अत्यंत तिखट
२८) काही काळापुरता, हंगामी
३०) साखरेचा रस
३३) वल्लरी
३४) फुलदाणी
३५) एक गुजराती नृत्यप्रकार
३६) कहाणीतील गाव
३७) संध्याकाळ
३९) कडक
४०) संगीतातील एक राग
४१) युद्ध क्षेत्र
४४) अंगातील मस्ती
४६) पारद
४८) नृत्यकलेचे दैवत
५०) मनाचा ओढा
५१) वाईट कृत्य
५३) चर्चा
५४) निमित्त, सबब
५६) स्वत:ला
५८) मंत्रीमंडळ
६०) उपयोग
६२) छोटी मशाल
६३) स्तुती करणारा
६५) प्राण
६६) शपथ
६७) मातीचा कण

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर

अं	गा	चा	ती	ळ	पा	प	ड	हो	णे		आ		कुं	भ
गा	ढ	व			पा	न		ती		ह	त्या	कां	ड	
चे		ट	प	ली		व	स	न	वा	त		च	ल	न
का	या		त		मा	ती		व्ह		ब	द	न		
त	न	म	न	ध	न		मा	ती	मो	ल		मृ	ग	या
डे		ग		न	व	ल		ति			त	ग	म	ग
का	न		स	वा		त	र	त	री	त			ना	
ढू		अ	न	न	स			की		हा	त		ग	वा
न	शा		ग		दा		नि	के	त	न		आ	म	टी
जो		प	र	त		सा	व	ली		ले	न	दे	न	
डा		र्ण			पां	ग	ळी		क	ला		श		न
शि	रा		ग	व	ग	वा		द	मा		न		क	व
व	न	रा	ज			न	ज	रा	न	ज	र		स	ल
णे		स	रा	ई	त		न	र		व	म	न		को
	गो		ज		प	व	न		को	स		र	त	ल

हे कसले प्रेम? ही कसली विकृती!



धनंजय शेटये

निष्पाप जीवांच्या रक्ताने माखलेली स्वप्ने आणि काळजाला चिरडणारा धगधगता प्रश्न प्रेम म्हणजे वसंताची नाजूक चाहूल, दोन आत्म्यांचा मूक संवाद आणि विश्वासाच्या रेशमी धाग्यांनी विणलेले एक अथांग, निखळ समर्पण! प्रेमात असतो एकमेकांच्या अस्तित्वाचा आदर, स्वातंत्र्याची कदर आणि मनाच्या कोपऱ्यात जपलेली अलवार प्रार्थना. पण आजच्या जगात प्रेमाचा हा अमृतकुंभ सुडाच्या विषाने का भरतो आहे? केवळ एका 'नकारा'ने माणसाच्या अंतरातील पशू जागा होऊन एखाद्या निष्पाप जिवाचे अस्तित्व संपवण्याइतकी मने क्रूर आणि पाषाण कशी होतात? प्रेमाच्या पवित्र नावाखाली रस्त्यांवर निष्पाप कळ्यांचा रक्तसडा शिंपडणारी ही कोणती सैतानी मानसिकता? हे प्रेम नव्हेच; हा तर अहंकार, मालकीहक्काचा उन्माद आणि पौरुषत्वाच्या खोट्या बडेजावातून माणुसकीच्या चेहऱ्यावर फासलेला काळाकुट्ट डाग आहे!

सकाळच्या कोवळ्या उन्हात जेव्हा एखादी लाडकी लेक घराचा उंबरठा ओलांडून बाहेर पडते, तेव्हा तिच्या पावलांसोबत तिच्या आईच्या काळजाची धगधग आणि वडिलांच्या डोळ्यांतील आश्वस्त आशेची तिरीप सोबत चालत असते. ''ती सुखरूप परत येईल, दारात उभी राहून हसतमुख चेहऱ्याने दिवसभराचा थकवा क्षणात दूर करेल,'' एवढीच त्या गरीब मायबापांच्या डोळ्यांत साठवलेली स्वप्नांची ओंजळ असते. पण वाटेतच नराधमांच्या विकृत वासनेची कुऱ्हाड चालून तिच्या आयुष्याची आणि स्वप्नांची राखरांगोळी होते, तेव्हा त्या घराचे काय होते? ज्या उंबरठ्यावर तिच्या पैंजणांचे नाजूक सूर निनादत होते, तिथे स्मशानासारखी भयाण शांतता पसरते. आईच्या पदरातील माया आक्रोशाच्या अश्रूंत विरघळते, तर बापाच्या पाठीचा कणा दुःखाच्या महाकाय डोंगराखाली कायमचा चिरडला जातो. एका क्षणात एक निष्पाप श्वास संपतो; पण मागे उरलेल्या त्या मायबापांच्या आयुष्यात मात्र मरेपर्यंत न संपणारा काळोख दाटतो.

जिथे 'नकार' पचवण्याची ताकद नसते, तिथे प्रेम कधीच नांदू शकत नाही; तिथे केवळ मालकी गाजवण्याचा विकृत हव्यास असतो. प्रेम ही काही बळजबरीने जिंकून आणायची जहागीर नाही किंवा कोणाच्या स्वातंत्र्यावर दरोडा टाकण्याची सनद नाही. समोरच्या व्यक्तीने जर आपला मार्ग वेगळा निवडला, तर तिच्या निर्णयाला नतमस्तक होऊन स्वीकारणे, यातच खऱ्या प्रेमाचा उदात्त कस असतो. प्रेम मिळाले नाही म्हणून सूडाची धारदार पाती उगारणाऱ्या अधमांनी हे विसरू नये की, दुसऱ्याच्या श्वासांवर आणि स्वप्नांवर तुमचा कवडीमोलाचाही अधिकार नसतो. प्रेमाच्या गोंडस बुरख्याआड लपलेली ही हिंसक लांडगेगिरी म्हणजे प्रेमाचा पराभव आणि मानवी संस्कृतीच्या अधःपतनाची अत्यंत भयावह निशाणी आहे. आजच्या आभासी जगानेही तरण्याबांड मनांभोवती मोहाचे एक आभासी आणि विषारी कोळ्याचे जाळे विणले आहे. सोशल मीडियावरील तकलादू झगमगाट, महागड्या वस्तूंचे ओंगळवाणे प्रदर्शन आणि पैशांच्या तराजूत भावना तोलण्याची विकृत स्पर्धा आजच्या पिढीला आंधळे करत आहे. घरामध्ये आई-वडील हाडांची काडे करून, अंगावरचा घाम गाळून संसाराचा गाडा हाकत असतात; मुलांच्या शिक्षणासाठी आपल्या गरजांचा गळा घोटतात. मात्र, तरुण मने त्या आभासी प्रकाशाच्या मागे धावताना वास्तवाचे भान हरवून बसतात. प्रेम सिद्ध करण्यासाठी कर्जाच्या खाईत उडी घेणे किंवा अनैतिक वाटा चोखाळणे, ही विवेकहीनतेची परिसीमा आहे. परंतु, आर्थिक अपेक्षा भंग पावल्या किंवा नात्यात दुरावा आला म्हणून रक्ताची होळी खेळण्याचा अधिकार सृष्टीच्या कोणत्याही नियमाने दिलेला नाही.

मग या जळत्या समस्येचे उत्तर आपण कुठे शोधणार? केवळ समाजाला नावे ठेवून किंवा सोशल मीडियावर मेणबत्त्या पेटवून ही जळती आग विझणार आहे का? पालकांनी मुलांच्या हातात महागडे गॅजेट्स आणि सुखसोयींची खेळणी देतानाच त्यांच्या मनात मूल्यांची आणि संस्कारांची शिदोरीही भक्कमपणे बांधली पाहिजे. त्यांच्या हातातील स्क्रीनच्या प्रकाशापेक्षा त्यांच्या अंतर्मनात चाललेले वादळ समजून घेणे ही आजची खरी गरज आहे. मुलांच्या वर्तनात, नजरेत किंवा स्वभावात बदल जाणवला, तर संशयाच्या कात्रीने नव्हे, तर मायेच्या स्पर्शाने त्यांच्याशी संवाद साधायला हवा. मुलींनीही कोणत्याही भीतीला बळी न पडता छेडछाड, दमदाटी किंवा नकोशा पाठलागाची कल्पना वेळीच आपल्या विश्वासातील माणसांना दिली पाहिजे; तर दुसरीकडे मुलांनाही 'नाही' या शब्दाचा आदर करण्याचे मर्म बालपणापासूनच शिकवले पाहिजे.

आज केवळ अश्रूंच्या धारा वाहण्याची वेळ नाही, तर समाजाच्या गाभाऱ्यात विवेकाचे नंदादीप पेटवण्याची वेळ आली आहे! मुलांच्या कोवळ्या मनात स्त्रीच्या अस्मितेचा आदर, नात्यांमधील संयमाची पेरणी आणि विकृतीला मुळासकट उखडून टाकण्याची सामाजिक कटिबद्धता आता निर्माण व्हावीच लागेल. प्रेम हे कोणाचे आयुष्य फुलवण्यासाठी असते, कुस्करून टाकण्यासाठी नव्हे; प्रेम हे सावरून धरण्यासाठी हात पुढे करण्यासाठी असते, कोणाच्या रक्ताने हात माखण्यासाठी नव्हे! हे त्रिकालाबाधित सत्य जेव्हा प्रत्येक तरुणाच्या काळजात ठसेल, तेव्हाच या देशातील निष्पाप लेकींच्या स्वप्नांना निर्भयतेचे मोकळे आकाश लाभेल आणि प्रत्येक मायबापाच्या उरात आश्वस्त, भयमुक्त पहाटेचा नवा सूर्य उगवेल! ❋

आई-वडील नेहमीच बरोबर आणि मुलं नेहमीच चुकीची?



संजय कचरे

''आई-वडिलांचा आदर करा.''

ही शिकवण आपल्याला लहानपणापासून मिळते. आणि ती योग्यही आहे. आई-वडील आपल्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचं नातं आहेत. मुलांसाठी त्यांनी केलेले कष्ट, त्याग आणि जबाबदाऱ्या यांची जाणीव मुलांना असायलाच हवी.

पण एक गोष्ट आपण शांतपणे स्वीकारायला हवी आई-वडील आहेत म्हणून ते प्रत्येक बाबतीत बरोबरच असतील, असं नाही.आणि त्याचप्रमाणे, मुलं आहेत म्हणून प्रत्येक वेळी चूक त्यांचीच असेल, असंही नाही. एक गोष्ट मात्र आपण मान्य केली पाहिजे आई-वडील असणं ही एक भूमिका आहे; ती आपोआप माणसाला परिपूर्ण बनवत नाही. ज्याप्रमाणे मुलांना चुका करण्याचा अधिकार आहे, त्याचप्रमाणे आई-वडिलांनाही चुका होऊ शकतात. फरक एवढाच मुलांच्या चुका समाज पटकन पाहतो. पण आई-वडिलांच्या चुका बोलण्याची मुलांना परवानगी नसते. कारण ते बोलले की त्याला नाव दिलं जातं ''उद्धटपणा.'' ''अहंकार.'' ''अनादर.'' कदाचित काही वेळा ते खरंही असेल. पण प्रत्येक वेळी? नक्कीच नाही. कधी कधी तो अनादर नसतो... तो वर्षानुवर्षे दाबून ठेवलेल्या वेदनेचा आवाज असतो.

पालकांविषयी समाजाच्या मनात एक नैसर्गिक सहानुभूती असते. त्यामुळे अनेकदा या नात्यातील चूक शोधताना मुलांच्या चुका आधी दिसतात. मुलांनी पालकांविषयी काही वेगळं मत मांडलं, एखाद्या चुकीच्या वागण्यावर प्रश्न उपस्थित केला किंवा आपला त्रास व्यक्त केला, तर त्यांना सहजपणे 'कृतघ्न' ठरवलं जातं. जणू पालकांनी दिलेल्या जन्माच्या आणि संगोपनाच्या ऋणामुळे मुलांनी आयुष्यभर गप्प राहावं, अशी एक न बोललेली अपेक्षा समाजात दिसते. परिणामी काही मुलांची अवस्था 'तोंड दाबून बुक्क्यांचा मार' अशी होते. अर्थात, प्रत्येक पालक चुकीचा असतो आणि प्रत्येक मूल बरोबर असतं, असंही नाही. काही ठिकाणी मुलांकडूनही स्वार्थ, दुर्लक्ष, गैरजबाबदारी किंवा चुकीचं वर्तन होतं; आणि त्याकडेही तितक्याच प्रामाणिकपणे पाहण्याची गरज आहे. कारण केवळ जन्माने नातं जोडले गेलं म्हणून ते नातं श्रेष्ठ ठरत नाही. त्या नात्याला खऱ्या अर्थाने श्रेष्ठ बनवतात त्या एकमेकांप्रती असलेल्या जबाबदाऱ्या, कर्तव्याची जाणीव, परस्पर आदर, संवाद, प्रेम आणि मर्यादा. पालकत्व म्हणजे अधिकार नाही, तर जबाबदारी आहे; आणि मुलगा किंवा मुलगी असणं म्हणजे केवळ कर्तव्य नाही, तर त्या नात्यात स्वतःचा सन्मान आणि दुसऱ्याचा सन्मान जपण्याचीही जबाबदारी आहे. नातं रक्ताचं असतं म्हणून ते टिकत नाही; ते टिकतं समजून घेण्याने, ऐकून घेण्याने आणि एकमेकांच्या माणूसपणाला मान देण्याने.

कधी कधी आई-वडील नसल्याचं दुःख खूप मोठं असतं. पण काही लोकांसाठी एक वेदनादायक सत्य असतं आई-वडील असूनही त्यांच्यामुळेच स्वतःचं आयुष्य जगणं कठीण होतं. हे वाक्य ऐकायला कठोर आहे. कदाचित काहींना ते अनादराचंही वाटेल. पण काही घरांमध्ये हीदेखील एक वास्तविकता आहे. आणि त्या वास्तवावर बोलणाऱ्या मुलाला लगेच दोष देण्याआधी, एकदा त्याची बाजूही ऐकून घ्यायला हवी. कदाचित त्याच्या मनात आई-वडिलांविषयी द्वेष नसेल... कदाचित तिथे फक्त खूप सारा साठलेला त्रास असेल. खूप न बोललेलं दुःख असेल. आणि एकच प्रश्न असेल ''माझं मन समजून घेणार कोण?''

पण याचा अर्थ असा नाही की प्रत्येक आई-वडील सारखे असतात. काही पालक अत्यंत प्रेमळ आणि समजूतदार असतात.

काही पालक मुलांसाठी खूप कष्ट घेतात, पण त्यांच्याशी संवाद साधण्यात कमी पडतात. काहींचा स्वभाव कडक असतो.

काहींच्या अपेक्षा खूप असतात. काही वेळा मुलांच्या निर्णयांमध्ये अनावश्यक हस्तक्षेपही होतो. ही उदाहरणं प्रत्येक पालकांना लागू होत नाहीत. पण काही कुटुंबांमध्ये अशी परिस्थिती असू शकते, हेही वास्तव आहे.

म्हणूनच एखादं मूल आई-वडिलांपासून थोडं दूर झालं, तर लगेच ''मुलंच चुकीची आहेत'' असा निष्कर्ष काढण्याआधी परिस्थिती समजून घेण्याचा प्रयत्न करायला हवा.मुलांचीही जबाबदारी कमी नाही.

आई-वडिलांनी आयुष्यभर केलेल्या कष्टांची जाणीव मुलांना असली पाहिजे.

वय वाढल्यानंतर पालकांना भावनिक आधाराची गरज असते.मुलांनी आपल्या संसारात, नोकरीत आणि जबाबदाऱ्यांमध्ये व्यस्त असतानाही आई-वडिलांसाठी वेळ काढायला हवा.त्यांच्या गरजा समजून घ्यायला हव्यात.त्यांच्याशी आदराने बोलायला हवं.फक्त आर्थिक मदत करणं म्हणजे कर्तव्य पूर्ण करणं नाही.वेळ, संवाद आणि आपलेपणाही तितकाच महत्त्वाचा आहे.पण पालकांचीही काही जबाबदारी आहे.मुलं मोठी झाल्यानंतर त्यांच्या आयुष्याचा प्रत्येक निर्णय पालकांनी घेणं योग्य नाही.

मुलांनी स्वतःचे निर्णय घेणं म्हणजे आई-वडिलांचा अनादर नाही.त्यांची मतं वेगळी असणं म्हणजे ते बिघडले आहेत, असंही नाही.मुलांचं लग्न, नोकरी, व्यवसाय, राहणीमान, मित्र-मैत्रिणी किंवा त्यांच्या संसारातील प्रत्येक निर्णयावर नियंत्रण ठेवण्याऐवजी त्यांना योग्य वेळी मार्गदर्शन आणि आवश्यक तेवढी मोकळीक देणं गरजेचं आहे.आई-वडिलांनी मुलांसाठी आयुष्यभर कष्ट केले, त्याग केला, अनेक इच्छा बाजूला ठेवल्यायाची जाणीव मुलांना असायलाच हवी. त्या कष्टांचा आदर आणि कृतज्ञता ही मुलांची जबाबदारी आहे. पण त्याच कष्टांची वारंवार आठवण करून देणं, प्रत्येक गोष्टीचा हिशेब ठेवणं किंवा ''तुझ्यासाठी मी एवढं केलं'' असं सांगत राहणं मुलांच्या मनाला कुठेतरी दुखावतं. कारण प्रेम आणि कर्तव्य जर सतत उपकारांच्या भाषेत व्यक्त झालं, तर त्या नात्यात आपलेपणाऐवजी ऋणाची भावना निर्माण होते. आई-वडील आणि मुलांच्या नात्यात कोणताही व्यवहार, स्वार्थ किंवा ''मी तुझ्यासाठी केलं, आता तू माझ्यासाठी कर'' अशी अपेक्षा नसावी. दोघांनीही आपापलं कर्तव्य शक्य तितकं न बोलता, न कुरकुरता आणि न मोजता निभावावं. ''मी केलं'', ''मीच केलं'', ''माझ्यामुळे झालं'' या 'मीपणाच्या' भावनेला या नात्यात फारशी जागा नसावी. कारण जिथे अहंकार येतो, तिथे प्रेम मागे पडतं; आणि जिथे हिशेब सुरू होतो, तिथे नातं व्यवहार बनतं. पालकांनी आपल्या त्यागाचा अहंकार करू नये आणि मुलांनीही पालकांच्या कष्टांकडे दुर्लक्ष करू नये. दोघांनीही एकमेकांच्या योगदानाची जाणीव ठेवावी, पण त्याची किंमत ठरवू नये. शेवटी हे नातं कोण जिंकलं, कोण जास्त केलं किंवा कोणाचं उपकार जास्त आहेत यासाठी नसून, एकमेकांसाठी मनापासून उभं राहण्यासाठी आहे.खरं तर चांगलं पालकत्व म्हणजे फक्त मुलांना वाढवणं नाही.त्यांना स्वावलंबी बनवणं हेही पालकत्वाचाच भाग आहे.आणि चांगलं मुलं होणं म्हणजे फक्त आई-वडिलांचं म्हणणं ऐकणं नाही.त्यांच्या कष्टांची जाणीव ठेवून, त्यांच्या वृद्धत्वात त्यांच्यासोबत उभं राहणं हेही तितकंच महत्त्वाचं आहे.म्हणून नात्यात दोन्ही बाजूंची भूमिका महत्त्वाची आहे. पालकांनी माया ठेवावी. मुलांनी कृतज्ञता ठेवावी. पालकांनी मार्गदर्शन करावं.मुलांनी आदर ठेवावा.पालकांनी मुलांना समजून घ्यावं.मुलांनीही पालकांच्या भावना समजून घ्याव्यात.पालकांनी मर्यादा ओळखाव्यात.

मुलांनीही आपली कर्तव्यं विसरू नयेत.

यातूनच नातं टिकतं.आई-वडील हे निश्चितच मोठं आणि श्रेष्ठ नातं आहे.पण त्या नात्याची श्रेष्ठता केवळ ''आई-वडील'' या शब्दामुळे नाही.ती त्यांच्या वागण्यातूनही दिसायला हवी.मुलांना प्रेम, सुरक्षितता आणि विश्वास देणं जितकं महत्त्वाचं आहे, तितकंच मुलांनी पालकांच्या कष्टांचा आणि त्यागाचा आदर करणं महत्त्वाचं आहे.कारण शेवटी प्रश्न हा नसावा ''कोण बरोबर आणि कोण चूक?''

प्रश्न असा असावा ''या नात्यासाठी माझी जबाबदारी काय आहे?''काही अपवादात्मक परिस्थिती असू शकतात.काही पालक चुकू शकतात.काही मुलंही चुकू शकतात.पण एका व्यक्तीच्या चुकीमुळे संपूर्ण नात्याची किंमत कमी होत नाही.आई-वडिलांचा आदर करायला हवा.

मुलांच्या भावनांचाही आदर करायला हवा. दोघांनीही एकमेकांच्या मर्यादा समजून घ्यायला हव्यात.कारण नातं टिकतं ते केवळ अधिकाराने नाही.प्रेम, आदर, संवाद आणि जबाबदारीने. आणि म्हणूनच... आई-वडील हे श्रेष्ठ नातं आहे. पण त्या श्रेष्ठ नात्याची जपणूक ही दोघांचीही जबाबदारी आहे. शेवटी या नात्यात फार मोठ्या तत्त्वज्ञानाची गरज नाही. काही साध्या गोष्टी पुरेशा आहेत. आई-वडिलांनी मुलांचं म्हणणं ऐकावं. मुलांनी आई-वडिलांसाठी वेळ काढावा. पालकांनी प्रेम व्यक्त करावं. मुलांनी कृतज्ञता व्यक्त करावी. पालकांनी योग्य ते मार्गदर्शन करावं; प्रत्येक निर्णय लादू नये. मुलांनी स्वातंत्र्य मागावं; पण जबाबदारी विसरू नये. आणि सर्वात महत्त्वाचं दोन्ही बाजूंनी अहंकारापेक्षा नात्याला मोठं मानावं. आई-वडील हे नक्कीच श्रेष्ठ नातं आहे. पण त्या श्रेष्ठ नात्याची मर्यादा आणि प्रतिष्ठा दोघांनीही जपली पाहिजे. कारण शेवटी प्रश्न हा नाही की ''आई-वडील बरोबर की मुलं?'' प्रश्न एवढाच आहे ''या नात्यात दोघांनी आपापली भूमिका किती प्रामाणिकपणे निभावली?'' कारण चांगलं कुटुंब ते नाही जिथे कधीच मतभेद होत नाहीत.

चांगलं कुटुंब ते आहे

जिथे मतभेद झाले तरी संवाद बंद होत नाही. ●

मानवी मनातील प्रेरणेचा शोध



सुनील गवळी

माणसाकडून एखादी गोष्ट करून घेणे आणि त्याच्या मनात ती गोष्ट करण्याची इच्छा निर्माण करणे, या दोन पूर्णपणे भिन्न गोष्टी आहेत. पहिल्या गोष्टीसाठी बक्षीस, प्रलोभन, दबाव किंवा भीती यांचा आधार घेता येतो; परंतु दुसऱ्या गोष्टीसाठी व्यक्तीच्या मनातील जिज्ञासा, स्वाभाविक आनंद, आत्म विश्वास आणि अंतर्गत प्रेरणा जागृत करावी लागते. मानवी वर्तन समजून घेताना हा मूलभूत फरक लक्षात घेणे अत्यंत आवश्यक आहे. कारण एखादी व्यक्ती आपल्या अपेक्षेप्रमाणे वागत आहे, याचा अर्थ ती मनापासून त्या कृतीत सहभागी झाली आहे, असा होत नाही. अनेकदा तिच्या कृतीमागे स्वतःची इच्छा नसते, तर बक्षीस मिळवण्याची अपेक्षा, शिक्षा टाळण्याची भीती किंवा इतरांना खूश करण्याची धडपड असते. बाहेरून दिसणारे यश आणि आतून विकसित होणारी प्रेरणा यांच्यातील ही दरी ओळखणे, हे खऱ्या शिक्षणाचे आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे पहिले पाऊल आहे.

लहान मुलांच्या वर्तनाकडे पाहिले, तर हा फरक अधिक स्पष्ट होतो. एखादे मूल रंग, कागद आणि पेन्सिल मिळताच आनंदाने चित्र काढू लागते. त्याला कोणत्याही बक्षिसाची अपेक्षा नसते. चित्र काढताना मिळणारा आनंद, नवीन काहीतरी निर्माण करण्याची उत्सुकता आणि स्वतःच्या कल्पनांना आकार देण्याची संधी, एवढेच त्याच्यासाठी पुरेसे असते. मात्र, प्रत्येक चित्रासाठी चॉकलेट, खेळणे किंवा गुण देण्याची सवय लावली, तर हळूहळू त्या कृतीचा अर्थ बदलू शकतो. मूल चित्र काढण्याचा आनंद घेण्याऐवजी त्यातून काय मिळणार, याचा विचार करू लागते. बक्षीस मिळत असेल, तर ते उत्साहाने काम करते; परंतु बक्षीस मिळण्याची शक्यता संपली, तर त्याच कामातील रसही कमी होऊ शकतो. याचा अर्थ प्रत्येक बक्षीस प्रत्येक व्यक्तीची अंतर्गत प्रेरणा नष्ट करते, असा नाही. मात्र, एखाद्या आवडीच्या कृतीला सतत बाह्य मोबदल्याशी जोडल्यास तिच्यामागील स्वाभाविक आनंद कमी होण्याचा धोका असतो. म्हणूनच मुलांना केवळ कृती करण्यासाठी प्रोत्साहन देण्यापेक्षा त्या कृतीतून आनंद, अनुभव आणि शिकण्याची संधी शोधायला शिकवणे अधिक महत्त्वाचे आहे.

आज अनेक घरांमध्ये मुलांच्या अभ्यासाचे गणित गुण, बक्षिसे आणि मोबाईल वापरण्याच्या सवलतींशी जोडले जाते. अमुक गुण मिळाले, तर अमुक वस्तू मिळेल; परीक्षा चांगली गेली, तर आवडीची सहल घडवली जाईल; गृहपाठ पूर्ण केला, तरच खेळायला मिळेल. अशा पद्धतींमुळे काही काळ अपेक्षित वर्तन दिसू शकते. परंतु मुलाच्या मनात अभ्यासाविषयीची जिज्ञासा निर्माण झाली आहे का, त्याला शिकण्याचा आनंद मिळतो आहे का किंवा एखादी संकल्पना समजून घेण्याची त्याची इच्छा वाढली आहे का, हे प्रश्न अनेकदा अनुत्तरित राहतात. बाह्य प्रलोभनाच्या आधारे निर्माण झालेली कृती आणि समज, उत्सुकता व स्वतःच्या विकासासाठी केलेली कृती यांच्यात मूलभूत फरक आहे. अभ्यासाचे उद्दिष्ट केवळ परीक्षा उत्तीर्ण होणे किंवा इतरांपेक्षा अधिक गुण मिळवणे नसून जग समजून घेण्याची क्षमता विकसित करणे, विचार करण्याची सवय लावणे आणि आयुष्यभर शिकत राहण्याची वृत्ती निर्माण करणे हे असायला हवे.

कौतुकाच्या बाबतीतही अशीच सूक्ष्म जाणीव आवश्यक आहे. मुलांचे कौतुक करणे चुकीचे नाही; उलट, योग्य वेळी दिलेले प्रामाणिक प्रोत्साहन मुलांचा आत्मविश्वास वाढवू शकते. मात्र, प्रत्येक कृतीनंतर अवाजवी कौतुक करणे किंवा मुलाला सतत हुशार, सर्वश्रेष्ठ आणि इतरांपेक्षा अधिक बुद्धिमान ठरवणे याचे काही अनपेक्षित परिणाम होऊ शकतात. अशा वातावरणात वाढणारे मूल स्वतःच्या प्रयत्नांपेक्षा इतरांच्या प्रतिक्रियांना अधिक महत्त्व देऊ लागण्याची शक्यता असते. त्याला काम करताना मिळणाऱ्या समाधानापेक्षा कामानंतर मिळणारे कौतुक महत्त्वाचे वाटू लागते. परिणामी, ज्या वेळी कोणी प्रशंसा करत नाही, त्या वेळी त्याचा उत्साह कमी होऊ शकतो. त्याहून गंभीर बाब म्हणजे, स्वतःची हुशारी सिद्ध करण्याची सवय लागल्यास मूल चुका करण्यास घाबरू शकते. कारण चूक होणे म्हणजे आपण कमी हुशार आहोत, असा चुकीचा अर्थ ते लावू शकते.

यावर उपाय म्हणजे कौतुक पूर्णपणे बंद करणे नव्हे, तर त्याचा दृष्टिकोन बदलणे. मुलाला केवळ 'तू खूप हुशार आहेस' असे सांगण्याऐवजी त्याने केलेले प्रयत्न, वापरलेली विचारपद्धती, अडचणीतून मार्ग काढण्याची तयारी आणि स्वतःच्या चुका सुधारण्याची वृत्ती यांचे प्रामाणिकपणे कौतुक करावे. 'तू ही समस्या सोडवण्यासाठी वेगवेगळे मार्ग वापरलेस', 'चूक लक्षात आल्यानंतर तू पुन्हा प्रयत्न केलास', किंवा 'तुला न समजलेली गोष्ट समजून घेण्यासाठी तू प्रश्न विचारलास', अशा प्रतिक्रिया मुलाला स्वतःच्या विकासाची जाणीव करून देतात. त्यामुळे त्याचे लक्ष केवळ इतरांच्या मान्यतेकडे न राहता स्वतःच्या प्रयत्नांवर आणि शिकण्याच्या प्रक्रियेवर केंद्रित होऊ शकते. खरे प्रोत्साहन व्यक्तीला सतत आपले कौतुक ऐकण्याची गरज निर्माण करत नाही; ते स्वतःच्या प्रगतीचे मूल्यमापन करण्याची क्षमता विकसित करते.

एखाद्या व्यक्तीच्या वर्तनात बदल घडवायचा असेल, तर तिच्या कृतीमागील कारणे सम जून घेणे अधिक महत्त्वाचे आहे. एखादा विद्यार्थी अभ्यास करत नाही, म्हणून त्याला बक्षीस देण्याचे आश्वासन देणे सोपे असते; परंतु तो अभ्यास का करत नाही, हा प्रश्न विचारणे अधिक आवश्यक आहे. त्याला विषय समजत नाही का? शिकण्याची पद्धत त्याच्या आकलनाशी जुळत नाही का? त्याच्या मनात अपयशाची भीती आहे का? घरातील वातावरणामुळे त्याचे लक्ष विचलित होते का? त्याला भावनिक आधाराची गरज आहे का? की त्याला स्वतःच्या क्षमतेवर विश्वास वाटत नाही? यांपैकी कोणतेही कारण असू शकते. अशा परिस्थितीत बक्षिसाचे आमिष दाखवून अभ्यास करवून घेणे म्हणजे समस्येच्या मुळाशी न जाता तिच्या बाह्य लक्षणांवर तात्पुरता उपाय करणे होय. त्याऐवजी अडचणीचे मूळ कारण शोधून योग्य मदत दिल्यास विद्यार्थ्याच्या वर्तनात अधिक अर्थपूर्ण आणि टिकाऊ बदल घडण्याची शक्यता वाढते.

हीच गोष्ट कार्यक्षेत्रातही लागू होते. एखाद्या कर्मचाऱ्याच्या कामात वारंवार चुका होत असतील, तर केवळ दंड, दबाव किंवा आर्थिक प्रलोभन यांचा आधार घेण्यापूर्वी त्याच्या कामातील अडथळे समजून घेतले पाहिजेत. त्याला आवश्यक प्रशिक्षण मिळाले आहे का, कामाच्या सूचना स्पष्ट आहेत का, जबाबदाऱ्यांचे योग्य वाटप झाले आहे का, उपलब्ध साधने पुरेशी आहेत का आणि कामाच्या वातावरणात सहकार्य आहे का, याचा विचार करणे गरजेचे आहे. प्रत्येक समस्येचे कारण व्यक्तीची आळशी वृत्ती किंवा इच्छाशक्तीचा अभाव हेच असेल असे नाही. अनेकदा व्यवस्थेतील त्रुटी, अस्पष्ट अपेक्षा आणि अपुऱ्या संधी यांमुळेही कामगिरीवर परिणाम होतो. अशा वेळी केवळ बक्षीस देऊन अपेक्षित परिणाम मिळवण्याचा प्रयत्न केला, तर मूळ अडचणी कायम राहतात. व्यक्तीला योग्य साधने, स्वायत्तता, प्रशिक्षण आणि विश्वास दिल्यास तिची कार्यक्षमता अधिक अर्थपूर्ण पद्धतीने वाढू शकते.

बक्षीसकेंद्रित वातावरणाचा आणखी एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे नवीन प्रयोग करण्याची तयारी कमी होणे. एखाद्या विद्यार्थ्याला प्रत्येक वेळी जास्तीत जास्त गुण मिळवण्याचेच महत्त्व सांगितले, तर तो परिचित आणि सुरक्षित प्रश्न सोडवण्यावर भर देऊ शकतो. एखादी नवी पद्धत वापरून पाहिल्यास चूक होईल, गुण कमी मिळतील किंवा इतरांसमोर आपली प्रतिमा खराब होईल, अशी भीती त्याच्या मनात निर्माण होऊ शकते. परिणामी, त्याची ऊर्जा विषय अधिक सखोल समजून घेण्याऐवजी अपेक्षित उत्तर मिळवण्याच्या तंत्रावर खर्च होऊ शकते. संशोधन, कला, विज्ञान आणि जीवनातील अनेक क्षेत्रांत मात्र प्रगतीसाठी प्रश्न विचारणे, प्रयोग करणे, चुका स्वीकारणे आणि अपयशातून शिकणे आवश्यक असते. प्रत्येक प्रयत्न यशस्वी होईलच, अशी हमी नसते; परंतु प्रत्येक प्रयत्नातून काहीतरी शिकता येते. म्हणूनच मुलांना केवळ बरोबर उत्तर देण्याचे प्रशिक्षण देण्याऐवजी योग्य प्रश्न विचारण्याची, पर्यायी शक्यता शोधण्याची आणि अपयशानंतर पुन्हा प्रयत्न करण्याची संधी दिली पाहिजे. स्पर्धा आणि बक्षिसांच्या संदर्भात आणखी एक मानवी पैलू लक्षात घेण्यासारखा आहे. एखाद्या वर्गात किंवा संस्थेत केवळ सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्यालाच मान्यता मिळत असेल, तर इतरांच्या मनात स्वतःच्या क्षमतेविषयी शंका निर्माण होऊ शकते. बक्षीस मिळण्याची अपेक्षा असताना ते न मिळाल्यास निराशा वाटणे स्वाभाविक आहे. मात्र, याहून मोठी समस्या तेव्हा निर्माण होते, जेव्हा व्यक्ती स्वतःचे मूल्य केवळ मिळालेल्या बक्षिसावरून ठरवू लागते. दुसऱ्याला यश मिळाले म्हणजे आपण अपयशी ठरलो, अशी तुलना सुरू होते. सहकाऱ्याच्या यशाचा आनंद घेण्याऐवजी त्याच्याविषयी मत्सर निर्माण होऊ शकतो. सहकार्याची जागा स्पर्धा घेते आणि सामूहिक प्रगतीपेक्षा वैयक्तिक मान्यतेला अधिक महत्त्व मिळते. याचा अर्थ प्रत्येक स्पर्धा हानिकारक असते, असा नाही. योग्य मर्यादेत आणि शिकण्याच्या उद्देशाने घेतलेली स्पर्धा प्रेरक ठरू शकते. परंतु व्यक्तीचा आत्मसन्मान, परस्परांतील विश्वास आणि शिकण्याची इच्छा यांच्यावर तिचा विपरीत परिणाम होत नाही ना, याची काळजी घेणे आवश्यक आहे.

खऱ्या अर्थाने प्रगत वर्ग किंवा संस्था तीच असते, जिथे प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या क्षमतेनुसार प्रगती करण्याची संधी मिळते. सर्वांची तुलना एकाच मापदंडाने करण्याऐवजी प्रत्येकाच्या सुरुवातीच्या पातळीपासून झालेल्या प्रगतीकडे लक्ष दिले जाते. एखादे मूल आधी दहा शब्द वाचत होते आणि आता वीस शब्द वाचते, तर त्याची प्रगती महत्त्वाची आहे. एखाद्या विद्यार्थ्याला गणितातील संकल्पना समजण्यासाठी अधिक वेळ लागतो, तरी तो प्रयत्न करत राहतो, तर त्या चिकाटीला महत्त्व मिळाले पाहिजे. एखादा कर्मचारी समूहाच्या यशात शांतपणे योगदान देत असेल, तर त्याचे योगदान केवळ वैयक्तिक पुरस्कारांच्या निकषांवर मोजता कामा नये. प्रत्येक व्यक्तीची क्षमता, परिस्थिती आणि विकासाचा वेग वेगळा असतो. त्यामुळे न्याय्य वातावरण म्हणजे सर्वांना सारखेच बक्षीस देणे नव्हे; तर प्रत्येकाला शिकण्यासाठी, सुधारण्यासाठी आणि अर्थपूर्ण योगदान देण्यासाठी आवश्यक संधी उपलब्ध करून देणे होय. याचा अर्थ बक्षिसे, गुण, पारितोषिके किंवा आर्थिक प्रोत्साहने यांना कोणतेही स्थान नसावे, असा नाही. काही परिस्थितींमध्ये बक्षिसे उपयुक्त ठरू शकतात. विशेषतः स्पष्ट उद्दिष्टे असलेल्या, पुनरावृत्तीची गरज असलेल्या किंवा बाह्य प्रोत्साहनाची योग्य भूमिका असलेल्या कामांमध्ये त्यांचा उपयोग होऊ शकतो. परंतु बक्षीस हेच प्रत्येक कृतीमागील प्रमुख कारण बनले, तर व्यक्तीच्या अंतर्गत प्रेरणेच्या विकासाकडे दुर्लक्ष होऊ शकते. त्यामुळे कोणते बक्षीस द्यावे, याइतकेच ते का द्यावे, कशा पद्धतीने द्यावे आणि त्याचा व्यक्तीच्या मनावर काय परिणाम होईल, हे प्रश्नही महत्त्वाचे आहेत. बक्षीस व्यक्तीच्या प्रयत्नांची दखल घेणारे असावे; तिच्यावर नियंत्रण ठेवण्याचे साधन बनू नये. प्रोत्साहनाने स्वावलंबन वाढले पाहिजे; अवलंबित्व नाही. मान्यतेने आत्मविश्वास वाढला पाहिजे; इतरांच्या प्रतिक्रियांवर अवलंबून राहण्याची सवय नाही.

शिक्षणाचा खरा उद्देश मुलांना प्रत्येक वेळी बाहेरून प्रेरणा देण्याची गरज निर्माण करणे हा नाही. उलट, स्वतःचे ध्येय निश्चित करणे, प्रयत्नांचे नियोजन करणे, अडचणींचा सामना करणे आणि स्वतःच्या प्रगतीची जबाबदारी स्वीकारणे यासाठी त्यांना सक्षम बनवणे हा आहे. शिक्षकाने विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य द्यावे, पालकांनी चुका झाल्यावर संवाद साधावा आणि संस्थांनी कर्मचाऱ्यांना निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घ्यावे. व्यक्तीला तिच्या कामामागील उद्देश समजला, स्वतःच्या क्षमतेचा उपयोग करण्याची संधी मिळाली आणि तिच्या प्रयत्नांचा अर्थपूर्ण परिणाम दि

दुष्काळाच्या वेढ्यामध्ये महाराष्ट्र

भारतीय शेतीचा प्राणवायू मानला जाणारा मॉन्सून यंदा रुसला. 'सुपर अल निनो'च्या तडाख्यात सापडलेल्या या मोसमात देशाने गेल्या सतरा वर्षांमधील पावसाची सर्वात भीषण तूट अनुभवली. सुकत चाललेली पिके आणि धरणे गाठत असलेले तळ थेट देशाच्या आर्थिक स्थैर्याला आणि अन्नसुरक्षेला बसलेले मोठे भगदाड आहे. या संकटाचे गांभीर्य समजून घेत युद्धपातळीवर धोरणात्मक पावले उचलण्याची हीच रास्त वेळ आहे.







भागा वरखडे

भारतीय अर्थव्यवस्थेची नाडी शेतातील मातीशी आणि थेट आभाळातील ढगांशी जोडलेली आहे. मॉन्सून हा आपल्या देशात केवळ चार महिन्यांचा ऋतू नाही, तर ती कोट्यवधी शेतकऱ्यांच्या जगण्याची, देशाच्या अब्जावधी रुपयांच्या आर्थिक चक्राची आणि देशांतर्गत महागाईच्या गणितांची जीवनरेखा आहे; मात्र यंदा या जीवनरेषेलाच तडे गेले आहेत. प्रशांत महासागराच्या पोटातील तापमानात झालेल्या अनाकलनीय बदलाने भारतीय उपखंडाच्या मोसमी वाऱ्यांची गती आणि ताकद हिरावून घेतली. 'सुपर अल निनो'च्या प्रभावाने यंदा मॉन्सूनमध्ये तब्बल १५ टक्के तूट नोंदवली गेली असून २००९ च्या दुष्काळानंतरचा (जेव्हा १८.३ टक्के तूट होती) हा सतरा वर्षांमधील सर्वात कोरडा मॉन्सून ठरला आहे. देशातील तब्बल चौदा प्रमुख राज्यांमध्ये २० टक्क्यांपेक्षा जास्त पावसाची तूट राहिली आहे. दक्षिण भारतातील पाचही राज्ये, पंजाब, हरयाणा आणि बिहारसारख्या धान्योत्पादक राज्यांमध्ये पावसाने फिरवलेली पाठ केवळ चालू हंगाम ापुरती मर्यादित न राहता, येणाऱ्या संपूर्ण वर्षाच्या अन्न आणि जलसुरक्षेवर गडद सावट निर्माण करणारी ठरली आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते, चालू वर्षात मॉन्सूनचे स्वरूप अत्यंत असंतुलित आणि चिंताजनक राहिले. प्रशांत महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान अचानक सरासरीपेक्षा अधिक वाढल्याने जागतिक स्तरावरील वाऱ्यांची वाहन प्रणाली विस्कळीत झाली. मान्सूनच्या सुरुवातीपासूनच भारतीय उपखंडाला त्याचा फटका बसला. १ जून ते २१ सप्टेंबर या काळात देशभरात सरासरी ८२७.२ मिलिमीटर पाऊस पडणे अपेक्षित असताना, प्रत्यक्षात केवळ ७०३.७ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. म्हणजेच १२३.५ मिलिमीटर पावसाची प्रचंड मोठी तूट निर्माण झाली.

या तुटीचे स्वरूप केवळ प्रमाणाच्या दृष्टीनेच नव्हे, तर कालावधी आणि भौगोलिक वितरणाच्या दृष्टीनेही अत्यंत घातक ठरले. शेतीसाठी पाऊस कोणत्या वेळी पडतो, याला अनन्यसाधारण महत्त्व असते. पेरणीच्या, वाढीच्या आणि दाणे भरण्याच्या नाजूक टप्प्यांवर पावसाने प्रदीर्घ खंड दिला, तर काही ठिकाणी अत्यंत कमी वेळात अवाजवी पाऊस पडून वाहून गेला. जमिनीची भूजल पातळी वाढवण्यासाठी किंवा मातीत ओलावा धरून ठेवण्यासाठी लागणाऱ्या संथ आणि संततधार पावसाचा या मोसमात पूर्ण अभाव दिसून आला. भारतीय शेती आजही ५० टक्क्यांहून अधिक प्रमाणात थेट पावसाच्या पाण्यावर विसंबून आहे. खरीप हंगामाची आखणीच मान्सूनच्या आगमनावर अवलंबून असते. यंदा पाऊस वेळेवर न पडल्यामुळे आणि पडल्यानंतरही अनपेक्षित खंड पडल्यामुळे खरिपाच्या एकूण पेरणीमध्ये गेल्या हंगामाच्या तुलनेत ३.७३ टक्क्यांची घट झाली. या कोरड्या मोसमाचा सर्वात मोठा आणि थेट फटका भातशेतीला बसला आहे. भात हे अधिक पाणी घेणारे पीक असून देशातील बहुसंख्य लोकांचे मुख्य अन्न आहे. पाण्याअभावी भाताची रोपे सुकली असून, अनेक भागांमध्ये रोपांची वाढ खुंटली आहे. तज्ज्ञांच्या प्राथमिक अंदाजानुसार यंदा केवळ तांदळाच्या उत्पादनात किमान एक कोटी टन इतकी प्रचंड घट होण्याची दाट शक्यता आहे. उसाच्या पिकाची अवस्था यापेक्षा वेगळी नाही. साखर उत्पादनाची प्रमुख केंद्रे असलेल्या महाराष्ट्र आणि कर्नाटकमध्ये पावसाच्या तुटीमुळे उसाचे गाळप आणि साखर उतारा या दोन्हींवर विपरित परिणाम होणार आहे.

मका, सोयाबीन आणि कापूस यानगदी पिकांची उत्पादकताही लक्षणीयरीत्या घटणार असल्याचेही संकेत मिळत आहेत. पिकांचे आक्रसलेले क्षेत्र आणि घटलेली एकरी उत्पादकता यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे उत्पन्न कमालीचे घटणार असून, त्याचा फटका ग्रामीण बाजारपेठेतील मागणीला बसणे अटळ आहे. खरीप तर हातातून गेलाच; पण खरी भीती आता आगामी रब्बी हंगामाविषयी निर्माण झाली आहे. केंद्रीय जल आयोगाच्या अखत्यारीतील देशातील १५० हून अधिक प्रमुख धरणांमधील उपयुक्त पाणीसाठा (लाईव्ह स्टोरेज) गेल्या वर्षीच्या तुलनेत तब्बल ३६ टक्क्यांनी घसरला आहे. दक्षिणेकडील ५४ महत्त्वाच्या धरणांमध्ये तर पाणीपातळी क्षमतेच्या ८० टक्क्यांच्याही खाली गेली आहे. रब्बी पिकांची विशेषतः गहू, हरभरा आणि मोहरीची पेरणी मातीतील उरल्यासुरल्या ओलाव्यावर आणि धरणांतून कालव्यांद्वारे दिल्या जाणाऱ्या पाण्यावर अवलंबून असते. धरणांचे तळ ऑक्टोबरमध्येच दिसू लागले असतील, तर डिसेंबर आणि जानेवारीमध्ये पिकांना पाणी कुठून मिळणार, हा यक्षप्रश्न आहे. रब्बीची लागवड घटली, तर देशातील अन्नधान्य साठ्यावर दुहेरी संकट ओढवेल. शिवाय, हा प्रश्न केवळ शेतीपुरता मर्यादित राहणार नाही; धरणातील पाणी कमी झाल्याने जलविद्युत प्रकल्पांमधील वीजनिर्मिती मंदावेल, उद्योगांना पाणीकपात सोसावी लागेल आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे उन्हाळा सुरू होण्यापूर्वीच देशातील अनेक प्रमुख महानगरांमध्ये आणि ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचे भीषण संकट उभे राहील. कृषी क्षेत्रातील मंदीचा थेट संबंध सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघराशी आणि देशाच्या अर्थव्यवस्थेशी असतो. ऑगस्ट महिन्यात अन्नधान्य महागाईचा (फूड इन्फ्लेशन) दर ५.९५ टक्क्यांवर पोहोचला; जो चालू वर्षातील सर्वोच्च दर ठरला आहे. मॉन्सूनच्या पावसात होणारी प्रत्येक एक टक्क्याची घट अन्नधान्य महागाईमध्ये सुमारे २५ बेसिस पॉईंट्सची (०.२५ टक्के) भर घालते. म्हणजेच यंदाच्या १५ टक्के तुटीची किंमत बाजारपेठेत वाढत्या किमतींच्या रूपाने चुकवावी लागणार आहे. तांदूळ, डाळी, साखर आणि भाज्यांचे दर आधीच सामान्यांच्या आवाक्याबाहेर जात आहेत. अन्नधान्य महागले की रिझर्व्ह बँकेला व्याजदरांमध्ये कपात करणे अशक्य होते. त्यामुळे एकंदर आर्थिक विकासदराचा (जीडीपी) वेग मंदावतो. ग्रामीण भागातील क्रयशक्ती आटल्यामुळे ट्रॅक्टर, दुचाकी, ग्राहकोपयोगी वस्तू आणि कपड्यांच्या विक्रीवर विपरीत परिणाम होतो. थोडक्यात, दुष्काळ हा केवळ शेतकऱ्यापुरता मर्यादित न राहता संपूर्ण राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला खिळ घालतो. परिस्थितीचे गांभिर्य ओळखून शासनाने काही तात्कालिक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. देशांतर्गत साखरेचा तुटवडा जाणवू नये, म्हणून शुल्कमुक्त साखर आयातीचे मार्ग मोकळे केले जात आहेत. टोमॅटो आणि कांद्यासारख्या संवेदनशील भाज्यांचे दर गगनाला भिडू नयेत, म्हणून सरकारी खरेदी संस्थांमार्फत अनुदानित दराने विक्री केंद्रे सुरू केली गेली आहेत. तांदळाच्या निर्यातीवर घातलेली बंधने अधिक कडक करण्याचे धोरण अवलंबले जात आहे, जेणेकरून देशांतर्गत पुरवठा अखंडित राहील;

अर्थात ही मलमपट्टी झाली. आज गरज आहे ती दुष्काळग्रस्त भागांमधील शेतकऱ्यांना थेट आधार देण्याची. नुकसानग्रस्त भागांमध्ये तातडीने पंचनामे पूर्ण करून पंतप्रधान पीक विमा योजनेचे दावे कोणत्याही क्लिष्ट अटींविना थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केले पाहिजेत. ग्रामीण भागातून शहरांकडे होणारे संभाव्य स्थलांतर रोखण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची (मनरेगा) व्याप्ती वाढवून कामाचे दिवस वाढवले पाहिजेत. जनावरांच्या चाऱ्याची आणि पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवू नये, म्हणून आतापासूनच चारा छावण्या आणि टँकरचे नियोजन जिल्हा पातळीवर युद्धपातळीवर सुरू व्हायला हवे. शेतकऱ्यांवरील कर्जाचे पुनर्गठन करून रब्बीसाठी बिनव्याजी वा सवलतीच्या दरात नवीन कर्ज उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. मॉन्सूनच्या लहरीपणाने आपल्याला एक गोष्ट पुन्हा एकदा ठामपणे बजावली आहे. हवामानबदल (क्लायमेट चेंज) आणि 'अल निनो'सारख्या नैसर्गिक आपत्ती आता अपवादात्मक राहिल्या नसून, भारतीय शेतीसमोरील एक कायमस्वरूपी आव्हाने बनल्या आहेत. दर चार-पाच वर्षांनी आभाळाकडे हात पसरून निसर्गाच्या दयेवर जगण्याची मानसिकता आता देशाला परवडणारी नाही. या संकटातून धडा घेऊन आपल्याला शेतीचे मूलभूत प्रारूप बदलावे लागेल. ठिबक आणि तुषार सिंचनासारख्या सूक्ष्म सिंचन पद्धतींना सर्वदूर अनिवार्य करणे, जास्त पाणी पिणाऱ्या ऊस आणि भातासारख्या पिकांऐवजी ज्वारी, बाजरी, नाचणी यांसारख्या भरडधान्यांना (मिलेट्स) आणि कडधान्यांना हमीभाव व बाजारपेठ देऊन प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे.

'पाणी अडवा, पाणी जिरवा' या घोषणांपलीकडे जाऊन पाणलोट क्षेत्र विकास आणि भूजल पुनर्भरण यांचे सामाजिक ऑडिट व्हायला हवे. हवामानाचा अंदाज वर्तवणाऱ्या उपग्रह आणि रडार यंत्रणेचे आधुनिकीकरण करून ग्रामपंचायत पातळीवर अचूक माहिती पोहोचवणे अनिवार्य आहे. निसर्गाची अवकृपा रोखणे मानवाच्या हाती नसले, तरी निसर्गाच्या लहरीपणाचा मुकाबला करण्याची पूर्वतयारी आणि लवचिकता (रेझिलिन्स) निर्माण करणे नक्कीच आपल्या हातात आहे. यंदाचा आक्रसलेला मान्सून हा केवळ एका मोसमाचा दुष्काळ नसून आपल्या संपूर्ण नियोजन प्रक्रियेला दिलेला धोक्याचा इशारा आहे. या इशाऱ्याकडे वेळीच गांभीर्याने पाहिले नाही, तर अन्नसुरक्षा आणि आर्थिक स्थैर्याची गणिते भविष्यात आणखी बिकट होतील.

काहीच झालेलं नसताना खाज का येते? डोळा का फडफडतो?

विद्यालंकार घारपूरे

त्या दिवशी सचिन आणि मनिषा 'ज्ञानदीप'मध्ये आले, तेव्हा समाधानकाका पुस्तक वाचत बसले होते. दोघे समोर येऊन बसले. गप्पा सुरू झाल्या आणि बोलता बोलता सचिनने सहज डोकं खाजवलं.

मनिषाचं त्याच्याकडे लक्ष गेलं.

''काय रे, डोक्यात खाज येतेय?''

''नाही.''

''मग खाजवलंस कशाला?''

सचिन क्षणभर गोंधळला.

''खरंच की! मला माहीत नाही. सहज खाजवलं.''

समाधानकाकांनी पुस्तक बाजूला ठेवलं. ''आजचा प्रश्न सापडला वाटतं!''

सचिन म्हणाला, ''हो काका! आपण टीव्ही बघत असतो, गप्पा मारत असतो आणि मध्येच गाल, हात किंवा डोकं खाजवतो. तिथे डास चावलेला नसतो, पुरळ नसतं. तरी खाज का येते?''

मनिषा म्हणाली, ''आणि कधी कधी माझी पापणीही फडफडते, मुद्दाम हलवत नसते. आई म्हणते, कुणीतरी तुझी आठवण काढली असेल. तेही याच प्रकारचं आहे का?''

उत्तराकाकी म्हणाल्या, ''दोन्ही गोष्टींत मज्जासंस्था सहभागी आहे. पण दोन्ही अगदी एकच प्रकार नाहीत. आधी खाजेपासून सुरुवात करूया.''

''म्हणजे खाज यायलाही काही कारण असतंच?'' सचिनने विचारलं.

''हो. पण ते प्रत्येक वेळी डास, पुरळ किंवा त्वचारोग असायलाच हवं असं नाही. आपली त्वचा केवळ शरीरावरचं आवरण नाही. तिच्यात संवेदना टिपणाऱ्या मज्जातंतूंचं जाळं असतं. स्पर्श, उष्णता, थंडी, वेदना आणि खाज यांसारख्या संवेदनांची माहिती या मज्जातंतूंमधून मेंदूपर्यंत पोहोचते,'' काकी म्हणाल्या

''पण मी आत्ता डोकं खाजवलं तेव्हा तिथे झालं तरी काय?'' सचिनने विचारलं.

''कदाचित फार क्षुल्लक गोष्ट. त्वचा किंचित कोरडी असेल, घामामुळे किरकोळ चुरचुर झाली असेल किंवा त्वचेतील खाजेची संवेदना वाहून नेणारे मज्जातंतू क्षणभर सक्रिय झाले असतील. असा संदेश मेंदूपर्यंत पोहोचला की तुला खाजवावंसं वाटू शकेल.''

''आणि माझा हात लगेच तिथे गेला!''

''हो. अशा छोट्या कृती आपण अनेकदा फारसा विचार न करता करतो.''

मनिषाने विचारलं, ''पण खाजवल्यावर बरं का वाटतं?''

काकी म्हणाल्या, ''खाजवताना त्वचेत सौम्य वेदनेचे संदेश निर्माण होतात. त्यामुळे मज्जासंस्थेत खाजेचे संदेश काही काळ दाबले जाऊ शकतात आणि खाज कमी झाल्यासारखी वाटते.''

''म्हणजे नवा संदेश काही काळ खाजेच्या संदेशावर मात करतो?''

''काही अंशी. पण हे पूर्ण स्पष्टीकरण नाही. खाज आणि खाजवणे यांची मज्जासंस्थेतील प्रक्रिया गुंतागुंतीची आहे.''

''मेंदू प्रत्येक संवेदनेला सारखं महत्त्व देतो का?'' सचिनने विचारलं. ''नाही. सतत येणाऱ्या किरकोळ संवेदनांकडे मेंदू लक्ष देत नाही. पण एखादी संवेदना



बदलली, तीव्र झाली किंवा आपलं लक्ष तिच्याकडे गेलं, तर ती जाणवते. म्हणून शरीरातून अनेक संवेदनांचे संदेश येत असले तरी त्या प्रत्येकाची आपल्याला जाणीव होत नाही.''

''मग एखादा माणूस खाजवताना पाहिला की आपल्यालाही खाज आल्यासारखं का वाटतं?'' मनिषाने विचारलं.

काकी म्हणाल्या, ''याला'' म्हणतात. खाज ही केवळ त्वचेची घटना नाही; तिच्या जाणिवेत मेंदूचीही महत्त्वाची भूमिका असते. खाजेबद्दल बोलणं, कुणाला खाजवताना पाहणं किंवा खाजेचा विचार करणं यामुळे मेंदूतील खाजेशी संबंधित प्रक्रिया सक्रिय होऊ शकतात. त्यामुळे प्रत्यक्ष त्वचेवर काही घडलं नसलं तरी खाज आल्यासारखं वाटू शकतं.

सचिन म्हणाला, ''तुम्ही एवढं खाजेबद्दल बोललात की मला पुन्हा डोकं खाजवावंसं वाटायला लागलं!''

सगळे हसले.

''आता माझ्या डोळ्याचं काय? पापणी आपोआप फडफडते ती खाज नाही ना?'' मनिषाने विचारलं.

काकी म्हणाल्या, ''नाही. तिथे मुख्यतः स्नायूंची अनैच्छिक सूक्ष्म हालचाल असते. स्नायूंची हालचाल मज्जातंतूंकडून येणाऱ्या विद्युत संदेशांमुळे होते. कधी स्नायूंना संदेश देणाऱ्या मज्जातंतूंच्या अनैच्छिक सक्रियतेमुळे स्नायूतील काही तंतू क्षणभर आकुंचन पावतात.''

''म्हणजे माझी परवानगी न घेता?'' मनिषा म्हणाली.

काका म्हणाले, ''अगदी बरोबर! तुझ्या शरीरात प्रत्येक कामासाठी अर्ज भरून सही घेतली जात नाही!''

सगळे पुन्हा हसले.

काकी म्हणाल्या, ''पापणीची अशी किरकोळ फडफड बऱ्याच लोकांना कधी ना कधी होते. तिला म्हणतात. थकवा, अपुरी झोप, मानसिक ताण किंवा जास्त कॅफीन यामुळे ती वाढू शकते. अनेकदा ती आपोआप थांबते.''

''आणि गाल किंवा हाताचा स्नायू क्षणभर हलतो तो?'' सचिनने विचारलं.

''तोही अशाच सूक्ष्म अनैच्छिक आकुंचनांपैकी असू शकतो. प्रत्येक छोट्या फडफडीचा अर्थ आजार असतो असं नाही.''

''आणि तुझी पापणी लवते तेव्हा कुणी तुझी आठवण काढत नसतं!'' काका मनिषाला डिवचत म्हणाले.

''कळलं का मनिषा?'' सचिन म्हणाला.

''अगदी चांगलं कळलं. लगेच माझी कळ काढायला नको! याचा अर्थ आपल्या शरीरात सतत छोटेमोठे संदेश फिरत असतात?''

''अगदी बरोबर,'' काकी म्हणाल्या, ''शरीर शांत दिसत असलं तरी आतून ते शांत नसतं. त्वचेतील संवेदना मेंदूकडे जात असतात, मेंदू त्यांची छाननी करत असतो, मज्जातंतू स्नायूंना संदेश देत असतात. यातील बहुतेक गोष्टींची आपल्याला जाणीवही होत नाही.''

''पण एखादा संदेश पुरेसा ठळक झाला की'' सचिनने डोकं खाजवत म्हटलं.

'' खाजवायला हात डोक्यावर जातो!'' मनिषाने वाक्य पूर्ण केलं.

काका म्हणाले, ''आणि खाजेबद्दल अर्धा तास चर्चा केली तर तो आणखी लवकर जातो!''

सचिनने हात खाली घेतला.

''काका, आज एक गोष्ट समजली. 'काही कारण नसताना खाज आली' असं म्हणण्यापेक्षा मनिषाने त्याचं वाक्य पूर्ण केलं, ''त्यामागचं कारण आपल्याला कळलं नाही,' असं म्हणणं जास्त वैज्ञानिक!''

काकी म्हणाल्या, ''विज्ञानाची गंमतही तीच आहे. क्षुल्लक वाटणारी गोष्टसुद्धा विचारते, माझ्यामागचं कारण शोधणार का?''

मनिषाने म्हणाली, ''म्हणजे डोळा फडफडला, गालाचा स्नायू हलला किंवा अधूनमधून खाज आली की लगेच फार काळजी करण्याचं कारण नाही.''

काकी म्हणाल्या, ''अधूनमधून होणारी फडफड किंवा क्षणभर येणारी खाज बहुतेक वेळा काळजी करण्यासारखी नसते. पण फडफड सतत होत राहिली, वाढत गेली किंवा स्नायूंमध्ये अशक्तपणा जाणवला; किंवा खाज बराच काळ टिकली, वारंवार झाली किंवा त्वचेवर बदल दिसले, तर डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा.''

मनिषा खट्याळपणे सचिनकडे पाहू लागली.

''अशी बघू नकोस! मला डॉक्टरकडे जायची गरज नाही. मी अधूनमधूनच डोकं खाजवतो!'' सचिन म्हणाला. सगळेजण हसू लागले.

वास्तववादी..

मी कविता लिहीन...



पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

मी कविता लिहीन.. हा डॉ.राजेंद्र मुंढे यांच्या सत्तर कवितांचा संग्रह, उरुवेला प्रकाशनने देखण्या रूपात प्रकाशित केला आहे. डॉ.श्रीकृष्ण राऊत यांची प्रस्तावना लाभली आहे. गेल्या पंचवीस वर्षात लिहिलेल्या कविता या संग्रहात संग्रहित झाल्या आहेत. राजेंद्र यांच्या कवितांची वैशिष्ट्ये त्यांनी स्पष्ट केली आहेत. 'मनोगत' मध्ये, वर्ध्याच्या साहित्य-सांस्कृतिक वातावरणात, आपली जडणघडण कशी झाली, ते राजेंद्र यांनी स्पष्ट केले आहे. त्यांना कविवर्य नारायण सुर्वे आणि यदुनाथ थत्ते यांचा अल्पकाळ सहवास लाभला होता. शांत, अंतर्मुख प्रवाहातून हा काव्यसंग्रह जन्माला आल्याचे त्यांनी म्हटले आहे. सूचक, रंगीत मुखपृष्ठ छायाचित्र डॉ.सतीश पावडे यांचे आहे.

मी कविता लिहीन... या पहिल्या कवितेत, कवीचा कवितेप्रती असणारा वेगळा दृष्टिकोन जाणवतो.

शेतात वर्षभर घाम गाळणाऱ्या नि वर्षाअखेर संपूर्ण शेताची बांडी झाल्यावर बिनकणसाच्या धांड्यांच्या पेंढ्या बांधणाऱ्या कफल्लक शेतकऱ्यावर,

मी कविता लिहीन.../१२

ग्रीष्म ऋतूत शेतांची अवस्था काय होते, त्याचे राजेंद्र यांनी वास्तव चित्र 'ग्रीष्म' कवितेतून नेमकेपणाने मांडले आहे. माणूस पक्षी, या कवितेत कवी शेवटी लिहितात...

माणूस पक्षी आता जागा होतोय
विस्तवाच्या ठिणग्या हातावर घेऊन..
प्रवास, या कवितेतून मानवाचा
आयुष्यप्रवास कसा अधांतरीच चालला आहे, याची जाणीव होते. ''बापू कुटी : विश्वशांतीची स्वप्नभूमी'' आणि नेल्सन मंडेला यांच्या राजकीय जीवनावरील ''दुसरा गांधी'' या दीर्घ कविता विलक्षण वाचनीय आणि प्रेरक आहेत.

बाबासाहेब यांच्यावरील दोन कवितांमधून त्यांच्या महान कार्याची उत्तम जाणीव होते. शेवटी कवी लिहितात...

''बाबासाहेब म्हणजेच
मानवतेचा अखंड शिलालेख.''.../४८

सताड दरवाजे, या कवितेतून, शेवटी सर्वच कसे लुटारू आहेत, हे स्पष्ट होते. स्त्री भ्रूणहत्येवर, या कवितेत शेवटी कवी लिहितात...

ही फक्त एका जीवाची हत्या नाही,
तर संपूर्ण मानवतेच्या चेहऱ्यावरचा काळा डाग आहे..../५०

कवी कविता उगीच लिहीत नसतो, या कवितेमध्ये कवी कविता लिहिण्याचा हेतू स्पष्ट करतो आहे. या कवितेत शेवटी कवी लिहितात.

तो लिहितो
जिथे जखम श्वास घेते,
आणि निशब्द अश्रूंना
मिळतो स्वर
मिळते नवी उभारी
मिळते जीवनाला अर्थगृहाची वहिवाट.../६८

निर्ऋती म्हणजे नैऋत्य दिशा.

ही दिशा दुःख, दारिद्र्य, विघ्न यांची देवता मानली जाते. पावसाळी हंगामात या दिशेकडून पुरेसा आणि योग्य वेळी पाऊस न आल्यास, सामान्य शेतकऱ्याला दुष्काळ, गरिबी, जुलमी सावकारशाही या महासंकटांना वर्षभर तोंड द्यावे लागते. दीर्घकाळ हे सुरू राहिल्यास शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची संख्या वाढत जाते. देशातील ४६ टक्के लोकसंख्या उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहे आणि ८६ टक्के शेतकरी लहान आणि अल्पभूधारक आहेत. ''निर्ऋतिच्या लेकी'' या कवितेला, दुष्काळपीडित शेतकऱ्यांची पार्श्वभूमी आहे. निर्ऋतिच्या लेकींबाबत कवी आशावादी आहे. हा आशावाद या कवितेतून व्यक्त होत आहे.

निर्ऋतिच्या लेकी या राखेतून हिरव्या अंकुरांची राखण करणाऱ्या,विनाशाच्या पोटात जन्मलेल्या पण भविष्यासाठी अनंत श्वास साठवणाऱ्या, मूक पण अजरामर मातीतल्या पहिल्या शेतकऱ्याच्या अनंत सावल्या. .../८५ पंढरीनाथाला साकडे, या कवितेत बहुसंख्य वारकऱ्यांची स्थिती काय आणि कशी आहे हे शेवटच्या काही ओळींतून स्पष्ट होते. तू कोण आहेस?, या कवितेत कवी स्त्रीच्या विविध रूपांचे आणि तिच्या विषयीच्या गूढत्वाचे वर्णन करत आहे. निरोपाची वेळ, ही कविता वाचकाला अंतर्मुख करते. 'प्रतिबिंबाचे नाते' ही एक अशाच प्रकारची कविता आहे. ''डोळ्यांतून बोलणारी- अनकथ स्मिता पाटील'' ही कविता स्मिताच्या रूपाची आणि अभिनयाची आठवण करून देते..

ती स्मिता डोळ्यांतून अभिनय करणारी
स्त्रीमनाची अनंत कहाणी.../१००

आजच्या काळात, सामान्यांचे स्वातंत्र्य हे मर्यादित होऊ लागले आहे. ''ते म्हणाले'' या कवितेतून कवीने हे सारे नेमकेपणाने मांडले आहे, ते हृदयाला भिडणारे आहे. आई : निःशब्दतेची सावली, झाडाला इजा न केलेली बरी आणि ऊन शोधणारी पालवी या कविता विशेष उल्लेखनीय आहेत.

मलपृष्ठावर डॉ. राजेंद्र मुंढे या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा सचित्र परिचय होतो. लोकनाथ यशवंत यांनी राजेंद्र यांच्या कविता, त्यांना का भावतात, ते नेमकेपणाने स्पष्ट केले आहे. राजेंद्र यांच्या कविता वेगळ्या प्रकारच्या असून, त्यांना मातीचा सुगंध लाभला आहे. विदर्भातील शेतकऱ्यांच्या, सामान्य माणसांच्या समस्यांचे या कवितासंग्रहातून वास्तव दर्शन होते आहे.

पुस्तकाचे नाव : मी कविता लिहीन..
कवी : डॉ.राजेंद्र लीला दुर्योधन मुंढे
९४२२१४००४९
प्रकाशक : उरुवेला प्रकाशन,
छत्रपती संभाजीनगर
प्रथम आवृत्ती : २९.११.२०२५
पृष्ठे : ११२ मूल्य : रु.१५०/-

किवींना धोबीपछाड!

संकटमोचक ठरले तिलक-नितीश; इंडियाने थरारक अंदाजात जिंकला दुसरा टी २०



| क्राइस्टचर्च | वृत्तसंस्था |

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पाच सामन्यांच्या मालिकेतील दुसरा सामना आज खेळला गेला. हा सामना क्राइस्टचर्च येथील हॅगली ओव्हल मैदानावर पार पडला. या सामन्यात टीम इंडियाने नाणेफेक जिंकून न्यूझीलंडला प्रथम फलंदाजी करण्यासाठी आमंत्रित केले. ग्लेन फिलिप्स आणि बेव्हॉनच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर न्यूझीलंडने २० षटकांत ५ विकेट्स गमावून १८० धावा केल्या. प्रत्युत्तरात भारताने १९.५ षटकांत लक्ष्य गाठले. तिलक वर्मा आणि नमन धीरच्या शानदार खेळीमुळे भारताने हा सामना जिंकला.

नमन धीरने काही मोठे फटके मारून भारताच्या आशा जिंवत ठेवल्या, पण तोही मिचेल सँटनरच्या जाळ्यात अडकला. नमनने १७ चेंडूंमध्ये ३१ धावा केल्या. यामध्ये ३ षटकार आणि एका चौकाराचा समावेश होता. ११२ धावांवर सहावी विकेट पडल्यानंतर, नितीश कुमार रेड्डी तिलक वर्मासोबत फलंदाजीसाठी आला. दोघांनी सुरुवातीला सावधपणे फलंदाजी केली.

तिलक वर्माने नितीश कुमार रेड्डीसोबत मिळून सामन्याचे चित्र पालटले. या दोघांनी सातव्या विकेटसाठी ३० चेंडूंमध्ये नाबाद ६९ धावा जोडल्या. तिलकने सहा चौकार आणि एका षटकारासह २६ चेंडूंमध्ये नाबाद ५१ धावा केल्या. नितीशने २०० च्या स्ट्राईक रेटने नाबाद २६ धावा ठोकल्या. किवी कर्णधार सँटनेरने ४ षटकांत २१ धावा देऊन ४ विकेट्स घेतल्या. तर जेकब डफीने १ विकेट घेतला. नमन, तिलक आणि नीतीशच्या शानदार खेळीच्या जोरावर भारताने हा सामना ४ विकेट्स जिंकला.

सँटनरच्या फिरकी गोलंदाजीची कमाल

१८१ धावांचा पाठलाग करताना, टीम इंडियाची सुरुवात निराशाजनक होती. संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा यांनी नेहमीप्रमाणे डावाची सुरुवात केली. सॅमसन फक्त १४ धावा करुन तंबूत परतला. जेकब डफीने सॅमसनने बाद केले. तिसऱ्या क्रमांकावर आलेल्या वैभव सूर्यवंशीला नॅथन स्मिथने माघारी पाठवले. वैभव अवघ्या ८ चेंडूमध्ये ४ धावा करुन बाद झाला. अभिषेक शर्माच्या रूपाने भारतीय संघाला दुसरा धक्का बसला. कर्णधार मिचेल सँटनरच्या फिरकी गोलंदाजीवर अभिषेक झेलबाद झाला. अभिषेकने २१ चेंडूंमध्ये ३ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने २७ धावांचे योगदान दिले. सँटनर इथेच थांबला नाही. त्याने श्रेयस अय्यर आणि अक्षर पटेल यांना एकाच षटकात बाद करून भारताची धावसंख्या ७०/५ अशी केली.

ग्लेन फिलिप्स- जेकब्सची शानदार खेळी व्यर्थ

न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करत २० षटकांत १८० धावा केल्या. ग्लेन फिलिप्स आण बेव्हॉन जेकब्सने तुफान फटकेबाजी करत संघाला मजबूत स्थितीत आणले. फिलिप्सने ४३ चेंडूमध्ये दमदार खेळी करत ७० धावा केल्या. तर जेकब्सने ४६ चेंडूमध्ये ५८ धावांची खेळी केली.

निवडक

रग्बी इंडियाच्या प्रशासनात नासेर हुसेन यांची एंट्री



मुंबई : भारतीय रग्बी संघाचे माजी कर्णधार नासेर हुसेन यांची स्पोर्ट्सपर्सन ऑफ आउटस्टँडिंग मेरिट म्हणून निवड झाली आहे. भारतीय रग्बी फुटबॉल युनियन अर्थात रग्बी इंडियाच्या नुकत्याच झालेल्या सर्वसाधारण सभेत त्यांना ४० पैकी ३९ मते मिळाली. नासेर हुसेन यांनी १७ वर्षांच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत भारतीय रग्बीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. १९९८ ते २०१४ या काळात त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले. यापैकी २००४ ते २०१३ अशी सलग दहा वर्षे त्यांनी राष्ट्रीय संघाचे कर्णधारपद भूषवले. रग्बी सेव्हन्स आणि रग्बी फिफ्टिन या दोन्ही प्रकारांत त्यांनी भारताकडून एकूण १४२ सामने खेळले आहेत. नासेर यांनी २००६ मध्ये कतार येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत, २०१० मध्ये चीन येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत आणि दिल्ली येथे झालेल्या २०१० च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारतीय संघाचे नेतृत्व केले. भारताकडून सर्वाधिक सामने खेळणाऱ्या रग्बीपटूंमध्ये त्यांचा समावेश आहे. तसेच रग्बी फिफ्टिन प्रकारात त्यांनी १८ ट्राय नोंदवले असून, देशासाठी सर्वाधिक ट्राय करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत ते अग्रस्थानी आहेत. मैदानावर रणनीती आणि चपळ हालचालींसाठी ओळखले जाणारे नासेर हुसेन हे आशिया रग्बीचे माजी अध्यक्ष आणि रग्बी इंडियाचे संस्थापक व माजी उपाध्यक्ष आगा हुसेन यांचे पुत्र आहेत.



आशियाई चॅम्पियनशिपमध्ये भारताला कांस्यपदक

मुंबई : आशियाई टेबल टेनिस चॅम्पियनशिपमधून भारतासाठी एक मोठी आनंदाची बातमी आली आहे. हरमीत देसाई आणि यशस्विनी घोरपडे या भारतीय जोडीने कांस्यपदक जिंकून हरमीत-यशस्विनी जोडीने इतिहास रचला आहे. हरमीत देसाई आणि यशस्विनी घोरपडे यांनी ताश्कंद येथे झालेल्या आशियाई टेबल टेनिस चॅम्पियनशिप २०२६ मध्ये मिश्र दुहेरीमध्ये कांस्यपदक जिंकले आहे. ७२ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर भारताला आशियाई टेबल टेनिस चॅम्पियनशिपच्या मिश्र दुहेरी प्रकारात पदक मिळाले आहे. यासह, हरमीत आणि यशस्विनी या स्पर्धेत पदक जिंकणारी तिसरी भारतीय मिश्र दुहेरी जोडी ठरली आहे. आशियाई टेबल टेनिस २०२६ च्या चॅम्पियनशिपमध्ये भारतीय जोडी हरमीत देसाई आणि यशस्विनी घोरपडे यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.उपांत्य फेरीत जपानच्या जपानी जोडी सोरा मात्सुशिमा आणि मिवा हारिमोटोने ११-९, ११-९, ११-८ असे तिन्ही सेट जिंकून भारताला ३-३ ने पराभूत केले. जपानकडून पराभव झाल्याने भारतीय जोडीचा प्रवास संपुष्टात आला. मात्र, हरमीत आणि यशस्विनी यांनी उपांत्यपूर्व फेरीत दक्षिण आफ्रिकेला ३-२ ने हरवून उपांत्य फेरीत आपले स्थान आधीच निश्चित केले होते. उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात, हरमीत आणि यशस्विनी १-२ ने मागे होते. ही भारतीय जोडी स्पर्धेतून बाहेर पडण्याच्या धोक्यात होती. मात्र, भारतीय खेळाडूंनी शानदार पुनरागमन करत चित्र पालटले. या जोडीने निर्णायक गेममध्ये उत्कृष्ट समन्वय दाखवत दक्षिण कोरियाला ३-२ ने पराभूत केले.



भारताची झिम्बाब्वेवर एकतर्फी मात

मुंबई : भारत महिला क्रिकेट संघ आणि झिम्बाब्वे महिला क्रिकेट संघ यांच्यात तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना आज खेळला गेला. हा सामना कोटांबी येथील वडोदरा आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळण्यात आला. या सामन्यात झिम्बाब्वेची कर्णधार नोमवेलो सिबांडाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. झिम्बाब्वेच्या संपूर्ण संघ ५० षटकांमध्ये फक्त १९७ धावाच करु शकला. प्रत्युत्तरात भारताने २७.१ षटकांध्ये लक्ष्य गाठले. प्रतिका रावलच्या शानदार शतकाच्या जोरावर भारताने पहिल्या एकदिवसीय सामन्यात झिम्बाब्वेला ९ विकेट्सने पराभूत केले. या विजयासह टीम इंडियाने तीन सामन्यांच्या मालिकेत १-० ने आघाडी घेतली. भारताविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात झिम्बाब्वेचा संघ मोठी धावसंख्या उभारण्यात अपयशी ठरला. नाणेफेक जिंकून फलंदाजी करण्याचा निर्णय घेतलेल्या झिम्बाब्वेचा संघ १९७ धावांवर सर्वबाद झाला. भारतीय गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच झिम्बाब्वेच्या फलंदाजांवर दबाव कायम ठेवला. बिलव्हेड बिझाने शानदार फलंदाजी करत ९२ चेंडूमध्ये ६२ धावा करून सर्वाधिक धावा केल्या.

पीएनपीच्या विद्यार्थ्यांची मुंबई विभागीय सायकलिंग क्रीडा स्पर्धेसाठी निवड

अलिबाग : जिल्हा क्रीडा अधिकारी अलिबाग रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा क्रीडा संकुल नेहुली सायकलिंग क्रीडा स्पर्धात पीएनपी माध्यमिक शाळा वेश्वी अलिबाग शाळेतील विद्यार्थ्यांचे घवघवीत यश संपादन केले.

यामध्ये १४ वर्षा खालील मुले सोहम रमेश राठोड मास स्टार्ट प्रथम क्रमांक, १४ वर्षा खालील मुले शिवमकुमार अजित दास टाईम स्टार्ट प्रथम क्रमांक पटकावून त्यांची मुंबई विभागीय सायकलिंग क्रीडा स्पर्धेत निवड झाली आहे.



या नेत्रदीपक यशाबद्दल पीएनपी संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, पीएनपी माध्यमिक शाळा वेश्वी अलिबागचे मुख्याध्यापक निलेश मगर, क्रीडा मार्गदर्शक चेतन पाटील, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

आंतरमहाविद्यालयीन ॲथलेटिक्स स्पर्धा
स्वागत अन् प्रसन्नचे उल्लेखनीय यश

| अलिबाग | प्रतिनिधी |

आंतरमहाविद्यालयीन ॲथलेटिक्स स्पर्धा २०२६-२७ मध्ये प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, वेश्वी, अलिबाग येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. स्वागत पाटील आणि प्रसन्न पवार यांनी विविध क्रीडा प्रकारांत यश संपादन करून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.



एस. व्ही. जे. सी. टी. डेरवण, सावर्डे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी येथे आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत स्वागत पाटील याने १०,००० मीटर धावण्याच्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक, तर ५,००० मीटर धावण्याच्या स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला. तसेच, प्रसन्न पवार याने लांब उडीच्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवून महाविद्यालयाचा गौरव वाढविला.

या यशस्वी कामगिरीसाठी संघप्रशिक्षक प्रा. हर्षल काठे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, कॉलेजचे संचालक प्रा. विक्रांत वार्डे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे, कार्यालयीन समन्वयक गबाजी गीते, क्रीडा प्रशिक्षक प्रा. तेजस म्हात्रे, क्रीडा विभागप्रमुख प्रा. स्वराली ठाकूर, तसेच प्रा. लवेश पाटील व प्रा. जयश्री ठाकूर यांनी अभिनंदन केले.

भाविककुमारच्या अपात्रतेमुळे जपानच्या खेळाडूची चांदी

जपान : एशियन पॅरा गेम्समध्ये पुरुषांच्या ४०० मीटर टी-४७ फायनल धावण्याच्या शर्यतीत लेनच्या नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी भाविककुमार भरवाड याला अपात्र घोषित करण्यात आले. गुरुवारी जपानच्या नागोया सिटी मिजुहो पार्क एथलेटिक स्टेडियममध्ये भाविककुमार ४९.३१ सेकंदासह दुसऱ्या स्थानी राहिला होता.

त्याच्या पुढे आणखीन एक भारतीय दिलीप महादु गावित (टी-४६) राहिला, ज्याने ४८.२७ सेकंदासह सुवर्णपदकाची कमाई केली.दरम्यान, शर्यतीनंतर भाविककुमारला टीआर १८.२ () अंतर्गत नियमांचे उल्लंघन केल्यामुळे अपात्र घोषित करण्यात आले. ही अपात्रता त्याने आपल्या निर्धारित लेनच्या नियमांचा पालन न केल्यामुळे लावण्यात आली आहे. भाविककुमार अपात्र ठरल्याने आपसुकच जपानचा काकेरु इशिदा (४९.५८ सेकंद) दुसऱ्या स्थानी आला. त्याशिवाय उज्बेकिस्तानचा मारुफजोन मुरोडुलोए आणि श्रीलंकेचा सामन सुबासिंघे यांना संयुक्त रुपात तिसऱ्या स्थानाचे मान देण्यात आले.

स्वातीने जिंकले रौप्यपदक



जपान : जपानमध्ये एशियन पॅरा गेम्स स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेत भारताच्या खेळाडूंनी शानदार कामगिरी केली आहे. त्यातच आता स्वाती चौधरीने तिरंदाजीत सिल्व्हर मेडल जिंकले आहे. स्वातीने सिल्व्हर मेडल जिंकताच मुखमंत्री योगी आदित्यनाथ यांनी कौतुक केले आहे.

करांटे प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

| पाली/गोमाशी | प्रतिनिधी|

भाराई शिक्षण प्रसारक मंडळाचे संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, नांदगाव येथे विद्यार्थ्यांसाठी विशेष करांटे प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

करांटे प्रशिक्षक अमर यादव यांच्या सहकार्याने आणि शिवछत्रपती पुरस्कार विजेते करांटे चंद्रशेखर शेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी शेट्टी यांनी विद्यार्थ्यांना करांटेचे महत्त्व, आत्म रक्षणाचे तंत्र, शिस्त, आत्मविश्वास आणि शारीरिक तंदुरुस्ती याबाबत सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिकांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला.

शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये स्वसंरक्षणाविषयी जागृती निर्माण व्हावी आणि त्यांच्यात शिस्त व धैर्य गुण रुजावेत, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.या कार्यक्रमा दरम्यान पाली येथील करांटे स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली म्हणून क्रिशीव सावंत यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.विद्यालयाच्या वतीने प्राचार्य अशोक शिंदे यांनी अमर यादव आणि चंद्रशेखर शेट्टी, सचिन सावंत यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

एफ ४ इंडियन चॅम्पियनशिपमध्ये साम्बुडलाचा 'डबल धमाका'

| मुंबई | प्रतिनिधी |

एफ ४ इंडियन चॅम्पियनशिपच्या तिसऱ्या फेरीत गोवा एसेस जेए रेसिंगच्या लुविवे साम्बुडला याने दोन शर्यती जिंकत गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावले आहे. चेन्नईतील मद्रास इंटरनॅशनल सर्किटवर झालेल्या या स्पर्धेत कोलकाता रॉयल टायगर्सच्या १५ वर्षीय ॲरॉन मेहताने अंतिम शर्यत जिंकून स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात तरुण रेस विजेता होण्याचा मान मिळवला.

इंडियन रेसिंग फेस्टिव्हल २०२६ अंतर्गत २२ आणि २३ ऑक्टोबर रोजी झालेल्या या फेरीत तीन शर्यतींचा थरार पाहायला मिळाला. पावसामुळे ट्रॅकवर आव्हानात्मक परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र, साम्बुडलाने अचूक रणनीती आणि वेगाच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकले. त्याने पहिल्या दोन शर्यतींमध्ये सहाव्या स्थानावरून सुरुवात करून विजय मिळवला, तर तिसऱ्या शर्यतीत तिसरे स्थान पटकावले.

या कामगिरीमुळे साम्बुडलाच्या खात्यात १३८ गुण जमा झाले आहेत. किच्चाज किंग्स बेंगळुरूचा अरिस कायरियाको ११७ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. स्पर्धेच्या आधी पाच गुणांनी पिछाडीवर असलेल्या साम्बुडलाने आता २१ गुणांची आघाडी घेतली आहे.

पहिल्या शर्यतीत साम्बुडलाने पावसाचा आणि ट्रॅकवरील परिस्थितीचा फायदा घेत आघाडी मिळवली. त्याने ९.६०६ सेकंदांच्या फरकाने विजय मिळवला. स्पीड डेमन्स दिल्लीच्या न्तियिसो माबुंडाने दहाव्या स्थानावरून सुरुवात करून दुसरे स्थान मिळवले, तर गोवा एसेस जेए रेसिंगचा आर्यन नरोलाने तिसरे स्थान पटकावले.

दुसऱ्या शर्यतीतही साम्बुडलाने आपले वर्चस्व कायम ठेवले. त्याने १३ फेऱ्यांची शर्यत ३३ मिनिटे २२.५९० सेकंदांत पूर्ण केली. माबुंडाने पुन्हा दुसरे स्थान मिळवले, तर कायरियाकोने तिसऱ्या क्रमांकावर पुनरागमन केले.

तिसऱ्या शर्यतीत मात्र ॲरॉन मेहताने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. पोल पोझिशनवरून सुरुवात करणाऱ्या मेहताने लाल झेंडा आणि सेफ्टी कारमुळे निर्माण झालेल्या अडथळ्यांनंतरही आघाडी टिकवली. अखेरच्या फेरीत माबुंडाने त्याला मागे टाकण्याचा प्रयत्न केला.

अनाहत सिंहने विश्वविजेत्या नौर एलशेरबिनीचा केला पराभव

| अमेरिका | वृत्तसंस्था |

क्रीडा क्षेत्रात भारताने अभिमानास्पद आणि ऐतिहासिक कामगिरी केली आहे. युवा स्क्वॉशपटू अनाहत सिंहने अमेरिकेत सुरू असलेल्या स्पर्धेत मोठी कामगिरी केली आहे. तिने प्रतिष्ठित सिलिकॉन वॅली ओपन स्क्वॉश स्पर्धेत धमाकेदार कामगिरी करत थेट सेमीफायनलमध्ये प्रवेश केला आहे. अनाहतने आपल्या कारकिर्दीतील आतापर्यंतचा सर्वात मोठा विजय नोंदवला आहे.



अनाहत सिंहने मिस्रची आठ वेळा जागतिक अजिंक्यपद पटकावलेली दिग्गज खेळाडू नूर अल शेरबिनी हिचा या गेममध्ये पराभव केला आहे.

एशियन पॅरा गेम्समध्ये भारताचा डंका | अंतिम फेरीत शानदार कामगिरी
हाय जंपमध्ये भारताचा क्लीन स्वीप!

| जपान | वृत्तसंस्था |

एशियन पॅरा गेम्स २०२६ मध्ये भारतीय खेळाडूंनी पुरुषांच्या हाय जंप टी-६३ अंतिम फेरीत शानदार कामगिरी करत तिन्ही पदक भारताच्या नावे केली. गुरुवारी झालेल्या या स्पर्धेत शैलेश कुमारने सुवर्णपदक, वरुण भाटीने रौप्यपदक, तर राहुलने कांस्यपदक पटकावले. या कामगिरीमुळे भारताने या प्रकारात क्लीन स्वीप केलं आहे.शैलेश कुमारने १.८९ मीटरची उंच उडी मारत सुवर्णपदक जिंकले. वरुण भाटीने १.८४ मीटरची उडी मारून दुसरे स्थान मिळवले. तर राहुलने १.८१ मीटरची वैयक्तिक सर्वोत्तम उडी नोंदवत कांस्यपदकावर नाव कोरले.



यानंतर वरुणने २०१७ च्या जागतिक पॅरा ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक आणि २०१८ च्या एशियन पॅरा गेम्समध्ये १.८२ मीटरची उडी मारत रौप्यपदक जिंकले. अलीकडेच, नवी दिल्ली येथे झालेल्या २०२५ च्या जागतिक पॅरा ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत त्याने १.८५ मीटरची उडी मारून पुरुषांच्या हाय जंप टी-६३ प्रकारात कांस्यपदक मिळवले होते.

भारताने ४०० मीटर टी-४७ प्रकारातही दुहेरी यश मिळवले. अंजनाबेन बंबडियाने ५९.९७ सेकंदांत शर्यत पूर्ण करत सुवर्णपदक जिंकले. तर जयंती बेहेराने १ मिनिट ००.६५ सेकंदांची वेळ नोंदवत रौप्यपदक पटकावले. त्यामुळे खेळाडूंची पदकांची घोडदौड एशियन पॅरा गेम्समध्ये भारतीय कायम राहिली.

तिन्ही पदक जिंकण्याची तिसरी वेळ

भारताने पुरुषांच्या हाय जंप टी-४२/टी-६३ प्रकारात तिन्ही पदके जिंकत २०२२ मधील कामगिरीची पुनरावृत्ती केली. या स्पर्धांमध्ये भारताने तिन्ही पदके जिंकण्याची ही तिसरी वेळ ठरली. यापूर्वी पुरुषांच्या डिस्कस थ्रो एफ-४४ /एफ-६४ प्रकारात देवेंद्र कुमारच्या नेतृत्वाखाली, तर पुरुषांच्या शॉटपुट एफ-४६ अंतिम फेरीत सचिन खिलारीच्या नेतृत्वाखाली भारतीय खेळाडूंनी तिन्ही पदके जिंकली होती.

शैलेशला पॅरालम्पिकमध्ये कांस्यपदक

वरुण भाटी हा उत्तर प्रदेशातील ग्रेटर नोएडा येथील भारतीय पॅरा उंच उडीपटू आहे. २०१६ मध्ये रिओ पॅरालिम्पिकमध्ये त्याने १.८६ मीटरची उडी मारत पुरुषांच्या हाय जंप टी-४२ प्रकारात कांस्यपदक पटकावले होते. ही त्याच्या कारकिर्दीतील मोठी आंतरराष्ट्रीय कामगिरी ठरली.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)